ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४२ अंक ९ पाने ५६ एप्रिल २०१५ मूल्य १० रु.

## निर्मिती क्षेत्र : विकास आणि आव्हाने

पेट्रोलियम पदार्थांच्या भारतातील भूतकाळातील व वर्तमानातील किंमतींची उकल
शाईन जेकब

भारतीय निर्मिती क्षेत्र - नवीन दृष्टिकोन व आवश्यक बाबी
पी.एम मॅथ्यू

उत्पादनावर आधारीत वृद्धी, स्पर्धा आणि आव्हाने
अरुप मित्रा

**विशेष लेख**

**भारतातील कायदेविषयक सहाय्य आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची भूमिका**
मनोज कुमार सिन्हा



मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

**वर्गणीचे दर**

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४२ ❖ ❖ अंक ९ ❖ ❖ एप्रिल २०१५ ❖ ❖ मूल्य १० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कांचल**

संपादक
**भावना गोखले**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**


**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिति व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**योजना वर्गणीचे नवे दर**

| | |
|---|---|
| **वार्षिक** | : रू. १०० |
| **किरकोळ किंमत** | : रू. १० |
| **शेजारी राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ५३० |
| **युरोप व अन्य राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ७३० |

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **भारतातील कायदेविषयक सहाय्य आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची भूमिका** | - मनोज कुमार सिन्हा | ५ |
| **पेट्रोलियम पदार्थांच्या भारतातील भूतकाळातील व वर्तमानातील किंमतींची उकल** | - शाईन जेकब | ९ |
| **भारतीय निर्मिती क्षेत्र - नवीन दृष्टिकोन व आवश्यक बाबी** | - पी.एम मॅथ्यू | १३ |
| **भारतीय निर्मिती क्षेत्र - जागतिक उत्पादन केंद्र बनण्याची संभाव्यता** | - एक दृष्टीक्षेप | २१ |
| **उत्पादनावर आधारीत वृद्धी, स्पर्धा आणि आव्हाने** | - अरुप मित्रा | २४ |
| **''मेक इन इंडिया'' ची गरज** | - कस्तुरी चक्रवर्ती व नितीश मिश्रा | २९ |
| **राष्ट्रीय लेखा मालिका- सुधारित पायाभूत वर्ष व आकडेवारीत उत्पादन क्षेत्राची कामगिरी चांगली का ?** | - जितेंदर सिंह | ३६ |
| **उत्पादन क्षेत्र: आर्थिक विकासाचे इंजिन** | - डॉ.उमेश भा.घोडेस्वार | ३९ |
| **''मेक इन इंडिया'' साठी जागतिक उत्पादन साखळीत भारताचा सहभाग** | - सी वीरमणी | ४४ |
| **लोकसंख्याविषयक लाभासाठी आशादायी केंद्रीय अर्थसंकल्प** | - प्रा. डॉ. रूपा शहा | ४९ |



योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

# संपादकीय

## वृद्धीसाठी विशाल संधी

कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी उत्पादन क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. विकास आणि रोजगारासाठी भारतासारखे विकसनशील देश उत्पादन क्षेत्रावरच मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात.

पारंपरिक दृष्ट्या कृषीप्रधान असलेली भारतीय अर्थव्यवस्था उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने मोठी झेप घेत आहे, ज्या क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) १६ टक्के इतका वाटा आहे. मात्र रोजगारनिर्मितीचे क्षेत्र आणि विकासात उत्पादन क्षेत्राचे योगदान त्याच्या खऱ्या क्षमतेच्या कितीतरी कमी राहिले आहे. प्रतिबंधात्मक आणि कठोर कामगार कायदे, कुशल कामगारांपेक्षा अकुशल कामगारांची मोठी संख्या, तांत्रिक नाविन्यपूर्ण संशोधनाचा अभाव हे यासाठी जबाबदार असलेले काही घटक आहेत.

साधनसंपत्तीतील वैविध्य आणि उपलब्ध मनुष्यबळाचे कौशल्य आणि शैक्षणिक पात्रतेतील भिन्नता यामुळे लघु तसेच मोठ्या उद्योगांचे महत्व समजून घेणे अत्यावश्यक ठरते. आमचे पारंपरिक कौशल्य आणि ज्ञान यावर मोठ्या प्रमाणावर विसंबून असलेले लघु उद्योग क्षेत्र सर्वाधिक रोजगाराच्या संधी निर्माण करणारे असून याबाबतीत फक्त कृषी क्षेत्रच त्यापुढे आहे. गरीबीच्या निर्मूलनात ते साह्य करते तसेच संपत्ती व उत्पन्नाचे समन्यायी वाटप घडवून आणते. त्याचवेळेला मोठे उद्योग रोजगाराच्या संधी पुरवण्याशिवाय, निर्यातीला प्रोत्साहन देण्यात महत्वाची भूमिका बजावतात, ज्याच्या परिणामी देशाची परकीय चलनाची गंगाजळी वाढून तसेच देशांतर्गत उत्पादनांसाठी मागणीचा पाया विस्तारतो आणि समावेशक विकासात त्याची परिणती होते.

पुढील दशकात जीडीपीमधील उत्पादन क्षेत्राचा वाटा २५ टक्क्यांपर्यंत वाढवणे आणि १० कोटी रोजगार निर्माण करणे, या उद्देश्याने राष्ट्रीय उत्पादन धोरण तयार केले आहे. तसेच ग्रामीण भागातील युवकांना आवश्यक ते कौशल्य प्रदान करुन त्यांना रोजगारक्षम बनवण्याचा प्रयत्न त्यात आहे. सरकारने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात, देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय उत्पादन उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रक्रियांचे सुलभीकरण, व्यवहारीकरण आणि अंकरुपण करुन अनुकूल वातावरण आणि सुविधा पुरवण्याचे प्रयत्न केले आहेत. मेक इन इंडिया, स्किल इंडिया, मुद्रा यासारख्या योजनांचा उद्देश्य व्यावसायिकतेच्या प्रवृत्तीला प्रोत्साहन देऊन भारताला उत्पादन क्षेत्राचे जागतिक केंद्र बनवण्याचा आहे. मजबूत पायाभूत सुविधांचा अभाव, उर्जा पुरवठ्यावरील निर्बंध, नाविन्यपूर्ण संशोधन आणि तंत्रज्ञानाचे महत्व या मुद्द्यांवरही विचार करण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पाने केला आहे.

या मासिकातील लेखांमध्ये उत्पादन क्षेत्रासाठी आतापर्यंत काय उपाय योजले गेले आहेत आणि या क्षेत्राला अत्यावश्यक असलेली चालना देण्यासाठी काय करण्याची गरज आहे, याचा उहापोह केला आहे.

शेवटी असा निष्कर्ष काढता येईल की, जगातील सर्वाधिक झपाट्याने विकसित होणारी अर्थव्यवस्था हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अत्यंत महत्वाची भूमिका बजावण्याची क्षमता उत्पादन क्षेत्रात आहे. आणि सरकार तसेच उद्योगांकडून याबाबतीत ठोस कटिबद्धता यांच्या योग्य मिश्रणातूनच हे वास्तवात आणता येईल.

# भारतातील कायदेविषयक सहाय्य आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची भूमिका

- मनोज कुमार सिन्हा




**सरकारचा सर्वसामान्यांप्रति असलेला दृष्टीकोन हा नेहमीच उदारमतवादी राहिला आहे. तो गरिबांसाठी घोषित केलेल्या योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात असो, निधीची तरतुद करण्याबाबात असो किंवा नागरिक सुरक्षा व कायदेशीर कवच संदर्भातील असो. सरकारने उचललेच्या प्रत्येक महत्वपुर्ण निर्णयाची अंमलबजावणी होतेच असे नाही. यामुळे गरिब असाह्य जनता न्यायापासुन दूर राहते. ''भारतीय कायदे'' हा विषय ही यापासुन वेगळा नाही. अनेक विवादात्मक घटनांच्या पृथ्थकरणानंतर 'लोक अदालत' या संकल्पनेला योग्य न्याय देणाारी अशी सरस पर्यायी विवाद निवारण. यंत्रणा म्हणुन कायमस्वरुपी स्थान व कायदेशीर मान्यता मिळाली. लोक अदालती द्वारे सर्वसामान्य जनतेला कायदेविषयक मोफत सल्ला व सेवा देऊ करण्यात आल्या आहेत. योग्य मार्गदर्शन व योग्य निर्णय प्रक्रिया असल्यास मानवाधिकारण वकिलांकडूनंच न्याय मिळेल परंतु सर्वसामान्यांचे कायदे विषयक अज्ञान आणि वकिलांचे निर्णयावरिल स्वनियंत्रणच जनतेला योग्य न्याय देऊ शकेल.**

परिचय:

न्याय मिळणे हा एक मूलभूत मानवी अधिकार असून त्याच्या उपलब्धते शिवाय अनेक मानवी अधिकार फक्त कागदावरच राहून जातील. आंतरराष्ट्रीय स्तरावरील नागरी व राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय सनदी मधील १४ (३) (ड) हे कलम असे स्पष्ट करते की, एखाद्या व्यक्तिच्या उपस्थितीत, किंवा त्याने स्वत: वैयक्तिकरित्या बचावात्मक पवित्रा घेतल्यास किंवा एखाद्या विधीतज्ञांच्या मदतीने बचाव करीत असल्यास या सर्व बाबींसाठी त्याव्यक्तिला कायदेविषयक सहाय्य किंवा तरतुद विधी सेवेद्वारे पुरविण्यात येतो. त्याच्या जवळ पैसा असो किंवा नसो. न्याय विषयक प्रक्रियेत असे विधी सहाय्य त्याला उपलब्ध करुन देण्यात येते.[1]

कलम १४ (३) मधील कायदेविषयक सहाय्याच्या या व्यवस्थेमुळे सर्वांना कोणत्याही भेदभावाशिवाय फौजदारी गुन्हा निश्चित होई पर्यंत मूलभूत हमी मिळते. त्यामुळेच मोफत कायदेविषयक सल्ल्याचा अधिकार हा समतेच्या संकल्पनेत असला तरी हा फौजदारी न्याय व्यवस्थेच्या यंत्रणेबाबत सदर संकल्पनेचा विशेष उल्लेख केलेला आहे.

भारतीय संविधान मोफत कायदेविषयक मदतीचा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून स्पष्टपणे घोषित करत नाही. पण 'शासन धोरणांच्या निर्देशक तत्वांतर्गत' कलम ३९-क मध्ये गरजू आणि गरीब लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य उपलब्ध आहे. संविधानाच्या कलम ३९-क अनुसार:

राज्य, हे कायद्याची यंत्रणा राबवताना समान संधीच्या तत्वावर न्यायाची अभिवृध्दी होईल याची निश्चिती करील, आणि विशेषत: आर्थिक किंवा अन्य नि:समर्थतांमुळे कोणत्याही नागरीकाला न्याय मिळवण्याची संधी नाकारली जाणार नाही याची शाश्वती देण्यासाठी अनुरूप विधिविधानाद्वारे किंवा योजनांद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कायदेविषयक सहाय्य मोफत उपलब्ध करून देईल.

सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की, गरीबाला आणि गरजुंना कायदेविषयक मदत ही संविधानाने कलम २१ अंतर्गत नमूद केलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग आहे. एम.एच.हॉस्कॉट वि. महाराष्ट्र राज्य[2] या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण केले की, नागरीकांना मोफत कायदेविषयक मदत ही कलम २१ मध्ये अप्रत्यक्षपणे अंतर्भूत आहे आणि ती न्याय्य, उचित आणि वाजवी प्रक्रियेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. या खटल्या बाबत न्या. कृष्णा अय्यर यांनी खालील निरीक्षण केले:

जर एखादा कैदी ज्याला कारावास

झाला आहे पण प्रत्यक्षात तो त्याचा संविधानिक आणि वैधानिक असा अपील करण्याचा अधिकार केवळ कायदेविषयक सहाय्याच्या गरजेपोटी वापरू शकत नसल्यास परिपूर्ण न्याय मिळावा म्हणून कारावास झालेल्या व्यक्तीसाठी वकिल नेमण्याचा (न्यायलयास) अधिकार संविधानाच्या कलम १४, कलम २१ आणि ३९-क या अंतर्गत संयुक्तपणे संमत आहे.[3]

खत्री वि. बिहार सरकार[4] या आणखी एका खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने हे नमूद केले आहे की, मोफत कायदेविषयक सहाय्याचा अधिकार एखाद्या गुन्ह्यात आरोपी असलेल्या व्यक्तीसाठी योग्य, न्याय्य आणि वाजवी प्रक्रिया राबवण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे आणि हे कलम २१ अंतर्गत संमत आहे. आर्थिक वा प्रशासकीय असमर्थता दर्शवून राज्य सरकार एखाद्या गरीब आरोपीला मोफत कायदेविषयक सेवा देण्याचे आपले संविधानिक कर्तव्य टाळू शकत नाही. गरिबीमुळे कायदेविषयक सेवा मिळवण्यात असमर्थ असणाऱ्या एखाद्या आरोपीला मोफत कायदेशीर सहाय्य देणे हे राज्यांसाठी संविधानीकरीत्या बंधनकारक आहे आणि त्या दृष्टीने आवश्यक ती पावले राज्यांनी उचलणे गरजेचे आहे.[5]

शीला बोरसे वि. भारत सरकार[6] या वेळी सर्वोच्च न्यायालयाने हे मान्य केले की मोफत कायदेविषयक सहाय्य पुरवण्याच्या संविधानिक जबाबदारीचा उगम कलम १४, २१ आणि ३९क मधे होतो. या खटल्यात काही वकिलांच्या वृत्तीवर ही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आणि विवंचनेत असलेल्या लोकांना मदत करणे हे वकिलांचे कर्तव्य असल्याची जाणीव करून देत न्या. भगवती असे म्हणाले की :

समाजाचे गरीब, निरक्षर आणि दुर्लक्षित घटक जेंव्हा गुन्ह्याचा आरोप वा अटक वा तुरुंगवास अशा संकटात असतात आणि त्यांना काय करावे वा कुठे जावे वा कुणाकडे जावे हे कळत नाही तेंव्हा अशा घटकांपर्यंत वकिलांनी सकारात्मकतेने पोहचणे आवश्यक आहे. जर विवंचनेत असणाऱ्याच्या मदतीला जाण्याऐवजी वकिल त्यांना लुटू लागले तर वकिलीचा पेशा बदनाम होऊन देशातील जनतेचा वकिलांवरील विश्वास उडेल आणि कायद्याचे राज्य, लोकशाही यासाठी ते हानीकारक ठरेल. [7]

मोफत विधी सहाय्य देण्याच्या संविधानिक कर्तव्याची जाणीव राज्यांना करून देताना सुख दास वि. अरूणाचल प्रदेश[8] या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने एक पाऊल पुढे टाकले आणि या सगळ्याचा तर्कशुद्ध शेवट केला. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की एखाद्या गरीब व्यक्तीला मोफत विधी सहाय्य हे त्याने मागीतले नसले तरी अस्तित्वात असते. एखाद्या आरोपीला मोफत कायदेविषयक मदत देण्यात अपयश आल्यास ते न्यायालयीन प्रक्रियेस बाधक ठरते मग जरी त्या व्यक्तीने कायदेविषयक सहाय्य मागितले नसले तरीही.

एखादी व्यक्ती आर्थिक गुन्हा वा वेश्यव्यवसाय वा बाल शोषणाशी संबंधित गुन्ह्याच्या बाबतीत आरोपी असल्यास विधी सहाय्य दिले जाऊ नये हा वादाचा मुद्दाही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. न्यायालयाला असे वाटले की जर असे गृहीत धरले की गुन्हा सिद्ध होईपर्यंत कोणीही निर्दोष आहे आणि हे जर सर्व आरोपींना लागू होत असल्यास अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी असलेल्या गरीब लोकांना सुद्धा मोफत कायदेविषयक सहाय्य दिले जावे.[9] हे आता पूर्णपणे सिद्ध झाले आहे की कायदेविषयक सहाय्याचा अधिकार आणि जलद न्यायालयीन प्रक्रीया ही भारतीय संविधानाच्या कलम २१ ने

1. मोफत कायदेविषयक सहाय्य बेचाळीसावा घटनादुरुस्ती कायदा १९७६ नुसार शासन धोरणांच्या निर्देशक तत्वांमध्ये ३९-क अंतर्गत तरतुद केला गेला.

2. एम.एच. होसकोट वि. महाराष्ट्र राज्य AIR 1978 SC 1548

3. Ibid., p.1556

4. खत्री वि. बिहार सरकार AIR 1981 SC 928

5. Ibid., p.928

6. शीला बोरसे वि. भारत सरकार AIR 1983 SC 378. सदर याचिका महिला कैदी तुरुंगात असताना तुरुंगातील महिला कैद्यावंर होणार्या अत्याचारांबाबत होती. याचिकाकर्त्यांनी हे स्पष्ट केले की बॉंबे सेंट्रल जेल मधिल १५ महिला कैद्यांची मुलाखत घेतली तेंव्हा ५ महिला कैद्यांनी पोलिसांनी तुरुंगात मारहाण केल्याची तक्रार केली.

7. Ibid., p.380, para 2.

8. (1986)2 SCC 401.

अधोरेखित केलेल्या मानवी अधिकारांच्या हमीचा भाग आहे. [10]

## विधी सेवा प्राधिकरण कायदा

कलम ३९क च्या अनुषंगाने विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ (कायदा) पारीत झाला. देशभरातील विधी सहाय्य कार्यक्रमाला वैधानिक आधार देण्यासाठी हा कायदा पारीत करण्यात आला. अखेर हा कायदा ९ नोव्हेंबर, १९९५ रोजी अंमलात आला. ५ डिसेंबर, १९९५ रोजी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (एनएएसएल) हे वैधानिक मंडळ अस्तित्वात आले. एनएएसएल ची स्थापना सदर कायद्यातील तरतुदींच्या अंतर्गत विधी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धोरणे आणि नियम तयार करणे आणि विधी सेवेसाठी जास्त प्रभावी आणि वाजवी योजना तयार करण्यासाठी करण्यात आली. सदर कायदा राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवर विधी सहाय्य प्राधिकरणे स्थापन करतो. सदर कायद्याचे कलम ३(२)(क) असे म्हणते की, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश हे एनएएसएल चे मुख्य आश्रयदाते असतील आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सेवेतील किंवा निवृत्त न्यायाधिश एनएएसएलचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित केले जावेत.[11] एनएएसएल ची धोरणे आणि निर्देशांना प्रभावीपणे लागू करण्यासाठी आणि जनतेला विधी सेवा देण्यासाठी आणि लोक अदालत आयोजित करण्यासाठी राज्य विधी सेवा प्राधिकरणे प्रत्येक राज्यात स्थापन केली जावीत.[12] राज्य विधी सेवा प्राधिकरणाची धुरा राज्यातील उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांकडे असावी जे प्राधिकरणाचे मुख्य आश्रयदाते असतील.[13] उच्च न्यायालयाच्या सेवेतील किंवा निवृत्त न्यायमूर्ती कार्यकारी अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित केले जावेत. जिल्हास्तरावर योजनांच्या आणि विधी सहाय्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणी साठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण स्थापन केले जावे ज्याचा जिल्हा न्यायाधिश पदसिद्ध अध्यक्ष असेल.[14] [15] तालुका स्तरावर विधी सेवेच्या कार्यक्रमांच्या समन्वयासाठी आणि लोक अदालत भरवण्यासाठी तालुका विधी सेवा समिती प्रत्येक तालुका वा मंडळ स्तरावर स्थापित केली असेल.[16] तालुका विधी सेवा समितीच्या कार्यकक्षेतील वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

या कायद्याचा मुख्य उद्देश समाजाच्या दुर्बल घटकांना मोफत आणि सक्षम अशी विधी सेवा देणे आणि ते आर्थिक आणि इतर कमतरतांपासून वंचित राहणार नाहीत हे पाहणे आवश्यक आहे. 'विधी सेवेची' व्याख्या कायद्याच्या कलम २(१) (ग) मध्ये समाविष्ट आहे ज्या अनुसार त्यात कोणत्याही न्यायालयात वा कोणत्याही प्राधिकरणा समोर वा लवादापुढे कोणत्याही खटल्यात वा न्यायालयीन कामकाजात सहभाग आणि कायदेशीर सल्ला देणे यांचा समावेश होतो. एनएएसएल समाजाच्या गरीब आणि दुर्बल घटकांना मोफत विधी सहाय्य देण्यासाठी जबाबदार आहे. यानुसार यात विधी सेवा शिबिरांचे आयोजन करणे आणि लोक अदालतों - मार्फत विवाद मिटवण्यावर भर दिला गेला आहे. सदर कायदा केंद्रीय यंत्रणेवर समाजातील दुर्बल घटकांसाठी सामाजिक कृती खटल्या द्वारे आवश्यक ती पाऊले उचलण्या बरोबरच सामाजिक कार्यकर्त्यांना कायदेविषयक कौशल्याचे प्रशिक्षण देणे या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत. यात कायदेविषयक शैक्षणिक कार्यक्रम आणि कायदेविषयक सहाय्य शिबिरे विद्यापीठे, विधी महाविद्यालये आणि इतर संस्थां यांमध्ये आयोजित करण्याची तरतूद आहे. केंद्रीय, राज्य आणि जिल्हा यंत्रणा राज्य सरकार, बिगर सरकारी संस्था आणि विद्यापीठांच्या मदतीने विधी सहाय्य कार्यक्रमांचा प्रचार करण्यासाठी समनव्य करत आहेत. विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या कलम १२ मध्ये विधी सेवेसाठी पात्र व्यक्तींचा निकष समाविष्ट आहे. विधी सेवा प्राधिकरण अर्जदाराचे पात्रता निकष आणि खटला प्रथम दर्शनी त्यांच्या बाजूने असल्याचे पडताळल्या नंतर त्याला सरकारी खर्चाने वकील, आवश्यक ती न्यायालयीन फी आणि याबाबतचा सर्व अनुषंगिक खर्च करते. ज्याला विधी सेवा देण्यात आली आहे त्या व्यक्तीला एकदा विधी सेवा प्राधिकरणरणाने पुरस्कृत

9. विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ नुसार कायदेविषयक सहाय्य विशिष्ठ उत्पन्न पातळीच्या खालिल (कायदेविषयक सहाय्याची आर्थिक मर्यादा राज्याराज्यांत वेगळी आहे) गरीब लोकांना आणि महिलांना, मुलांना, कलम १२ नुसार अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमातींना कोणत्याही उत्पन्नाचा विचार न करता उपलब्ध असेल.
मोफत कायदेविषयक सहाय्य हे यांनाही उपलब्ध आहे:

(1) मानवी तस्करीचा बळी वा संविधानाच्या कलम २३ नुसार उल्लेखित भिक्षेकरी
(2) मानसीक दृष्ट्या विकलांग वा अपंग व्यक्ती
(3) मोठ्या आपत्तीचे, वांशिक हिंसाचार, जातीय हिंसाचार, पूर, दुष्काळ, भूकंप वा औद्योगिक दुर्घटनेचे बळी
(4) औद्योगिक कामगार; आणि
(5) अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंध कायदा १९५६ मधील कलम २ च्या उपकलम (च) अनुसार सुधारगृहात असलेली व्यक्ती वा बालगुन्हेगारीचा कायदा, १९८६ च्या उपकलम (च) च्या प्रभावात बालसुधार गृहात असलेली व्यक्ती वा मानसिक आरोग्य कायदा, १९८७ च्या कलम २ च्या उपकलम (च) च्या प्रभावात मनो रुग्णालयात वा नर्सिंग होम मध्ये असलेली व्यक्ती).

केल्यावर खटल्याबाबत कोणताही खर्च करण्यास सांगीतले जाणार नाही. मोफत आणि सक्षम विधी सेवा देण्यासाठी एनएएसएल ने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (मोफत आणि सक्षम विधी सेवा) नियमावली तयार केली आहे. याचे ठळक वैशिष्ठ्य म्हणजे एखाद्या खटल्यात जर एखाद्याचे आयुष्य आणि वैयक्तिक स्वातंत्र्य धोक्यात असल्यास वरिष्ठ आणि सक्षम वकिलाची नेमणूक नियमित शुल्क देऊन करता येते.

विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ मुळे कायदेविषयक सेवा देण्याची यंत्रणा आता सक्षमपणे प्रस्थापित झाली आहे यात शंका नाही. एनएएसएल ने तिच्या स्थापनेपासून विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ ची ध्येय साध्य करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. न्यायालयीन विधी सेवा देण्याबरोबरच एनएएसएल ने विवाद निवारणाचा पर्यायी मार्ग म्हणून देशभर लोक अदालत आयोजित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एनएएसएल ने जनजागृती कार्यक्रमाचा भाग म्हणून राष्ट्रीय विभागीय परिषदा, कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम देशभर मोठ्या प्रमाणावर आयोजित केले आहेत. निरक्षरतेने आपल्या अधिकारांविषयी जाणीव नसणार्या लोकसंख्येच्या मोठ्या भागापर्यंत पोहचण्याचे मोठे आव्हान एनएएसएल पुढे होते. त्यामुळे एनएएसएल ने स्वयंस्फुर्तीने कार्य करणे आवश्यक आहे आणि अशा सर्वांच्या दाराशी विधी सेवा घेऊन जाणे ही आवश्यक आहे. हे जवळपासच्या विधी महाविद्यालये आणि बिगर सरकारी संस्थांच्या सहभागानंतरच साध्य होणे शक्य आहे. कायद्याबाबतच्या नियमांची माहिती कायद्याने प्रभावित होत असलेल्यांना सुद्धा माहिती नसते.

**निष्कर्ष :**

सदर कायदयाद्वारे लोक अदालत या संकल्पनेला नैसर्गिक न्याय, समता आणि सद्सद्विवेक बुद्धी या तंत्वांवर आधारीत योग्य न्याय देणारी अशी सरस पर्यायी विवाद निवारण यंत्रणा म्हणून कायमस्वरुपी स्थान आणि कायदेशीर मान्यता मिळाली. विविध मानव अधिकार संस्थांनी विकसित केलेल्या सर्व आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक मानवी अधिकारांची साधने आणि विधीशास्त्रांनुसार गरीब आणि वंचितांना न्याय मिळण्यासाठी सार्वजनिकरीत्या पुरस्कृत केलेले कायदेविषयक सहाय्य मिळणे हा महत्त्वाचा मानव अधिकार आहे. हक्कांच्या बाबतीत असलेल्या वादात गरीब पक्षकारांना जर राज्य मोफत विधी सेवा देऊ शकत नसतील तर हक्क हे फसवे ठरतात. सोप्या शब्दात सांगायचे तर सरकारांनी हक्कांच्या सुरक्षेची हमी देण्याकरीता कायदेविषयक सेवा देण्यासाठी आवश्यक ती वित्त पुरवठ्याची तरतूद करणे आावश्यक आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेने 'गुन्हेगारी न्याय यंत्रणेत मोफत कायदेविषयक सहाय्याच्या उपलब्धतेबाबत संयुक्त राष्ट्रांचे नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे' यांचा २०१२ मध्ये अवलंब केला आहे. हे नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे ही या मान्यतेवर आधारीत आहेत की राज्यांनी आवश्यकते नुसार व्यवस्थित कार्य करू शकणाऱ्या कायदेविषयक सहाय्य यंत्रणेबाबत आवश्यक ती पाऊले उचलली पाहिजेत. कायदेविषयक सहायाशी निगडीत अंगिकारण्यात आलेले हे पहिले आयुध आहे. कायदेविषयक सहाय्याचा अधिकार न्यायापर्यंत घेऊन जाणारी ही प्राथमिक गोष्ट आहे. संविधानातील कलम २१ हा मर्यादित न करता येणारा असा संविधानातील मानवी अधिकार म्हणून ओळखला गेला असून त्याच्या विस्तारित कक्षेत सर्व गोष्टी समाविष्ट आहेत. भारतीय न्यायव्यवस्थेने गरीब आणि विवंचनेत असलेल्याच्या सेवेत कायदा आणण्याचा प्रयत्न केला आहे.

***मनोज कुमार सिन्हा** हे इंडियान लॉ इंस्टीट्युटचे संचालक असुन त्यांनी विवीध नावाजलेल्या राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय पत्रिकांमध्ये मानव अधिकार, मानवी आणि निर्वासीतांच्या कायद्यां बाबात मोठ्या प्रमाणावर लेखन केले आहे. ते विविध पत्रिकांच्या संपादकीय मंडळावर सदस्य म्हणून काम पहात आहेत. प्राध्यापक सिन्हा न्याय विज्ञान राष्ट्रीय विद्यापीठ, कलकत्ता येथे कायम स्वरुपी कायद्याचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.*

***संपर्कासाठी ईमेल** -* **manoj_kumarsinha@yahoo.com**

10. महाराष्ट्र सरकार वि. मनुभाई प्रगाजी वाशी AIR 1996 SC1. या खटल्यातील आदेशानुसार महाराष्ट्र सरकारला अनुदान मदत योजना राज्यातील सर्व बिगर सरकारी विधी महाविद्यालयाना अवलोकन करुन एप्रिल, १९८२ पासुन लागु करण्याचे आदेश देण्यात आले.
11. सध्या भारताचे सरन्यायाधिश मा. न्यायमूर्ती एच.एल. दत्तु हे मुख्य आश्रय दाता तर सर्वोच्य न्यायालयाचे न्यायाधिश मा. न्यायमूर्ती टी.एस. ठाकुर हे प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष आहेत.
12. सदर कायद्याच्या कलम ६(१) अन्वये
13. सदर कायद्याच्या कलम ६(२) अन्वये
14. सदर कायद्याच्या कलम ९(१) अन्वये
15. सदर कायद्याच्या कलम ६(२) अन्वये
16. सदर कायद्याच्या कलम ११(क) अन्वये

# पेट्रोलियम पदार्थांच्या भारतातील भूतकाळातील व वर्तमानातील किंमतींची उकल

**- शाईन जेकब**



**खनिज तेल, खनिज तेल उत्पादन, शुद्धीकरण प्रक्रिया, शुद्धीकरणाच्या जागतिक पातळीवर अवलंबिण्यात येणाऱ्या पद्धती, भारतीय तेल शुद्धीकरणाची पद्धत, खनिज तेल किंमत निर्धारण या सर्व बाबींचा सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन जिवनाशी वर वर जरी संबंध दिसत नसला तरी आधुनिक युगातील मानवाला पेट्रोलियम उत्पादनांबाबत उदासिन राहुन चालणार नाही.**

**प्रस्तुत लेखात खनिज तेल आणि पेट्रोलियम पदार्थांना भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व सांगितले आहे. अर्थसंकल्पीय तूट, चलनवाढ, ग्राहक किंमत निर्देशांक काढतांना या क्षेत्राचा विचार प्राधान्याने करण्यात येतो. कारण अंतरराष्ट्रीय तेल किंमतींचा प्रभाव देशी बाजार पेठांवर होतो. खनिज तेल किंवा पेट्रोलियम उत्पादनाचे मुख्य निर्धारणाच्या विविध पद्धतीही आयात निर्यात मुल्ये या संदर्भातील माहिती या लेखात सांगितली आहे.**

अर्थसंकल्पीय तूट असो की ग्राहक किंमत निर्देशांक आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील खनिज तेलाच्या किंमतीचा भारतातील जवळपास सर्वच गोष्टींवर परिणाम होतो. पेट्रोलियम पदार्थांची आपल्या देशातील किंमत निर्धारण आणि खनिज कच्च्या तेलाच्या किंमतीचे जागतिक स्तरावरील निर्धारण यातील परस्परसंबंध हे सामान्य माणसासाठी नेहमीच एक कोडे राहिले आहे. एवढेच काय पेट्रोलियम उत्पादनांची शुद्धीकरणानंतरची किंमत ठरवण्यासाठी सध्या भारताकडून वापरात असलेल्या, भारतातील एकूण खनिज तेलाची आयात (Indian Basket Crude Oil) आणि वस्तू विनिमयातील समान किंमत निर्धारण यंत्रणा (Trade Parity Pricing System) यासारख्या संज्ञा अधिकच गोंधळात टाकणाऱ्या आहेत.

## पेट्रोलियम क्षेत्र प्रामुख्याने दोन गटात विभागले गेलेले आहे -

१) जगरहाटीच्याविरूद्ध म्हणजे खनिज तेल आणि वायू यांचे उत्खनन व उत्पादन करणे; आणि २) प्रवाहाबरोबर जात केवळ शुद्धीकरण आणि विपणन (marketing) करणे. गेल्या आर्थिक वर्षात देशात ३७.७८८ दशलक्ष टन इतके खनिज तेलाचे उत्पादन झाले होते, ज्यामध्ये २०१२-१३ या आर्थिक वर्षातील ३७.८६२ दशलक्ष टन उत्पादनापेक्षा किंचितशी म्हणजे ०.२० टक्के घट दिसून आली आहे. यासंदर्भात भारताची फार मोठी चिंता आहे ती म्हणजे तेलाच्या विहिरींची घटत चाललेली गुणवत्ता आणि तंत्रज्ञानाचा असलेला अभाव. तर दुसरीकडे, राजस्थान आणि कृष्णा-गोदावरीच्या खोऱ्यातील अतिखोलवर असलेली नवीन उत्खनन क्षेत्रे ही उत्पादनासाठी आशेचा किरण आहेत. दरम्यान, गेल्या आर्थिक वर्षात शुद्धीकरण क्षमता प्रतिवर्षाला २१५.०६६ दशलक्ष टनापर्यंत पोहोचली होती आणि २०१७ सालपर्यंत ती प्रतिवर्षाला सुमारे ३०७ दशलक्ष टनापर्यंत पोहोचेल अशी अपेक्षा आहे.

पेट्रोलियम उत्पादनांच्या किंमती निश्चित करणारे आपल्या देशातील महत्त्वाचे घटक म्हणजे खनिज तेलाची किंमत, मागणी आणि पुरवठा यातील असंतुलन, कर आणि शुल्क, बाजारपेठेची स्थिती, उत्पादन आणि खप, राखीव साठे, आयात, आंतरराष्ट्रीय किंमती, अनुदान आणि स्थानिक परिणाम. सध्याच्या किंमत निर्धारण यंत्रणेतील बारकावे समजून घेण्यासाठी खनिज क्षेत्रातील उलाढाली तसेच भारतातील इंधनाच्या किंमत निर्धारणाचा इतिहास जाणून घेतला पाहिजे.

## भारताने आयात केलेले एकूण खनिज तेल (Indian Basket Crude Oil)

इतिहासपूर्वकाळापासूनचे प्राणिज घटक आणि शेवाळे यांच्या प्राणवायूच्या अभावामुळे तयार झालेल्या अवशेषांपासून

लक्षावधी वर्षांनी खनिज तेल तयार झाले आहे. त्याच्या मूळ ठिकाणाच्या आधारे खनिजाचे वेस्ट टेक्सास इंटरमिजीएट, डब्ल्यूटी, ब्रेंट, दुबई किंवा मिनास असे वर्गीकरण करण्यात आले आहे. दुसरीकडे, शुद्धीकरण प्रकल्पदेखील वजन आणि दाटपणा यांच्या आधारे 'स्वीट' (गंधकाचा अंश कमी असणारे) किंवा "सोर"(२.५ टक्क्यांपेक्षा गंधकाचा अंश जास्त असलेले आणि त्यामुळे उत्पादनाचे निकष पूर्ण करण्यासाठी अधिक प्रमाणात शुद्धीकरणाची गरज भासणारे) असे त्यांचे वर्गीकरण करतात.

देशात ''स्वीट'' आणि 'सोर' खनिज तेलावर झालेल्या एकूण प्रक्रियेनुसार 'इंडियन क्रूड बास्केट'ची रचना ठरते. अगदी अगोदरच्याच वर्षात 'स्वीट' खनिज आणि 'सोर' खनिज यांच्यावर प्रत्यक्षात झालेल्या प्रक्रियेच्या प्रमाणात भारतातील शुद्धीकरण प्रकल्पांनी प्रक्रिया केलेल्या खनिज तेलाची सरासरी ती दाखवते. 'स्वीट' खनिजाच्या किंमतीसाठी 'ब्रेन्ट' खनिज तेलाचा मानदंड मानला जातो. 'सोर' खनिजासाठी 'दुबई' आणि 'ओमान' यांचा मानदंड मानण्यात येतो. गेल्या आर्थिक वर्षादरम्यान 'इंडियन क्रूड बास्केट' चे 'ब्रेन्ट' तसेच 'दुबई' आणि 'ओमान' दर्जाच्या खनिज तेलासाठीचे सरासरी दैनंदिन मूल्यमापन ३०.१ : ६९.९ अशा प्रमाणात होते.

भारतीय तेल शुद्धीकरण कारखान्यांनी 'सोर' खनिजे अधिक प्रमाणात वापरण्यास सुरवात केल्यामुळे 'इंडियन क्रूड बास्केट' मधील 'ओमान' आणि 'दुबई' खनिजाचा हिस्सा गेल्या काही वर्षात वाढला आहे. अगदी आत्तापर्यंत म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारात अलिकडील काळात मंदी येईपर्यंत भारतातील तेलाच्या किंमती कायमच वाढत होत्या. भारताने आयात केलेल्या एकूण खनिज तेलाच्या सरासरी किंमतींमध्ये तिपटीने म्हणजे २००३-०४ मध्ये असलेल्या प्रतिबॅरल २७.९७ डॉलरवरून २०१३-१४ मधील प्रति बॅरल १०५.५२ डॉलरपर्यंत वाढ झालेली दिसून आली. (तक्ता खाली दिला आहे.)

असे असले तरी, भारताने आयात केलेले एकूण खनिज तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या किंमती यांचा कोणताही परस्परसंबंध नाही. पेट्रोलियम उत्पादनांच्या किंमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठ आणि प्रत्येक उत्पादनासंदर्भातील मागणी-पुरवठ्याची स्थिती यावर अवलंबून असते. पेट्रोलच्या किंमती सिंगापूरच्या क्षेत्रातील किंमतीवर अवलंबून असतात तर डिझेल, केरोसीन आणि एलपीजी यांच्या किंमतींसाठी अरब-आखाती क्षेत्रातील किंमत कारणीभूत असते.

## किंमत निर्धारण आणि भूतकाळ

भारतातील तेलाच्या किंमतींचा इतिहास लक्षात घेतला तर, असे दिसून येते की, १९४८ मध्ये मुल्य साठा लेखा पद्धती अर्थात व्हॅल्यू स्टॉक अकाऊंट (VSA) यंत्रणेच्या माध्यमातून बर्माह शेलशी करार करून सरकारने सर्वात प्रथम किंमत नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. VSA यंत्रणा ही पुरवठादाराने वाहतुकीसाठी केलेला खर्च (FOB) किंमत, सागरी वाहतूक खर्च, विमा, सागरी वाहतुकीमध्ये होणारे नुकसान, आयात शुल्क, व्याज आणि इतर शुल्क यांची बेरीज असलेल्या सूत्रावर आधारित होता.

किंमत निर्धारणाच्या संपूर्ण प्रक्रियेचे नियमन करण्याबाबत अतिशय सखोल चर्चा केल्यानंतर सरकारने जुलै १९७५ मध्ये नियंत्रित किंमत यंत्रणा (APM) अस्तित्त्वात आणली. मात्र, तेल कंपन्या ऊर्जा सुरक्षेसाठी आवश्यक असलेली गुंतवणूक करण्यासाठी पुरेसे आर्थिक स्रोत निर्माण करू शकल्या नसल्यानं त्या गोगलगाईच्या गतीनं वाढत असल्याची टिका झाल्यानंतर एप्रिल २००२ मध्ये ही यंत्रणा मोडीत काढण्यात आली. त्यानंतर एप्रिल २००२ ते जानेवारी २००४ या अल्प कालावधीसाठी देशाने नियंत्रणमुक्त व्यवस्था स्वीकारली, ज्यामध्ये तेल कंपन्या पेट्रोल, डिझेल आणि घरगुती वापरासाठीचा एलपीजी यांच्या देशांतर्गत किंमतीमध्ये बाजारपेठेतील घटकांच्या आधारे बदल करत असत पण केरोसीनच्या किंमतीमध्ये कोणताही बदल केला जात नसे. यादरम्यानच्या काळात किंमतपट्टा व्यवस्थादेखील आजमावून बघण्यात आली, ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय किंमती आणि वाहतूक खर्च यावर आधारित विशिष्ट मर्यादेत किरकोळ दरांमध्ये सुधारणा करण्याचे मर्यादित स्वातंत्र्य सरकारने तेल वितरण कंपन्यांना दिले होते.

## जागतिक बाजारपेठेशी सुसंगत किंमत निश्चिती (Trade Parity Pricing - TPP )

किंमत निश्चितीची सर्वंकष संरचना सुचविण्यासाठी केंद्र सरकारने ऑक्टोबर २००५ मध्ये सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीने पेट्रोल आणि डिझेलसाठी शुद्धीकरण प्रकल्पाच्या पातळीवर आणि त्याचबरोबर किरकोळ बाजाराच्या स्तरावर जागतिक बाजारपेठेशी सुसंगत

अशा किंमत निश्चितीच्या सूत्राची शिफारस केली. आयात समानता किंमत निश्चिती (IPP) आणि निर्यात समानता किंमत निश्चिती (EPP) यांच्या सरासरीचे अनुक्रमे ८०:२० गुणोत्तर या सूत्रात मांडण्यात आले होते. देशाने १६ जून २००६ रोजी व्यापार समानतेची व्यवस्था स्वीकारली. त्यानुसार तेल विपणन कंपनीच्या विपणन विभागाला शुद्धीकरण प्रकल्पाकडून उत्पादन ज्या किंमतीला विकण्यात येते ती किंमत म्हणजेच रिफायनरी गेट प्राईस (RGP) ठरविण्यात आली.

## आयात समानता किंमत निश्चिती आणि निर्यात समानता किंमत निश्चिती म्हणजे काय?

आयात समानता व्यवस्थेचा संदर्भ आयातदार भारतीय बंदरांवर देत असलेल्या किंमतीशी येतो, जी पुरवठादाराने वाहतुकीसाठी केलेला खर्च (FOB) किंमत, सागरी वाहतूक खर्च, विमा, सागरी वाहतुकीमध्ये होणारे नुकसान, आयात शुल्क, व्याज आणि इतर शुल्क यांच्या बेरजेइतकी असते. दुसरीकडे निर्यात समानता व्यवस्था म्हणजे तेल कंपन्यांना त्यांच्या विक्रीयोग्य पेट्रोलियम उत्पादनांच्या निर्यातीतून प्रत्यक्षात मिळणारी किंमत. EPP च्या घटकांमध्ये FOB ची किंमत आणि अग्रीम परवाना फायदा यांचा समावेश असतो. पेट्रोलियम उत्पादनांच्या निर्यातीतील देशाचा हिस्सा वाढल्यानंतर निर्यात समानता हा किंमत निश्चितीचा एक भाग बनतो. गेल्या आर्थिक वर्षात भारताने ६७.८६४ मेट्रीक टन पेट्रोलियम उत्पादनांची निर्यात केली होती, ज्याचे मूल्य ३,६८,२७९ कोटी रूपये इतके होते.

या व्यवस्थेनुसार, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन यासारख्या सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी (OMCs) दर पंधरवड्याला डिझेल आणि पेट्रोल खरेदी करताना शुद्धीकरण प्रकल्पांना व्यापार समानता किंमत दिली. दरम्यान, एलपीजी आणि केरोसीनच्या किंमती आयात समानतेच्या आधारे आणि प्रत्येक महिन्याच्या प्रारंभी ठरवल्या जातात तर अन्य पेट्रोलियम उत्पादनांच्या किंमती निश्चित करण्यावर कोणतेही बंधन नाही.

## सध्याचे प्रवाह

या क्षेत्रातील सुधारणा पुढे नेण्यासाठी आंतरराष्ट्रीय किंमती आणि विनिमय दरानुसार पेट्रोलच्या किंमतींमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्याची मुभा जून २०१० मध्ये तेल कंपन्यांना देण्यात आली. डिझेलवरील निर्बंध देखील टप्प्याटप्प्याने दूर करण्यास जानेवारी २०१३ मध्ये सुरवात करण्यात आली. त्यामागे तेलाच्या व्यवहारात वेगाने वाढणारी वसुलीमधील तूट (under recovery) भरून काढण्याचा उद्देश होता. (व्यापार समानता / आयात समानता यावर आधारित आवश्यक किंमत आणि प्रत्यक्षातील विक्रीची किंमत यांच्यातील तफावत यामधून OMCs ना होणारा वसुलीमधील तूट). मात्र, त्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या किंमतींमध्ये अतिशय झपाट्याने वाढ झाल्यामुळे हे प्रयत्न कमी पडले. गेल्या वर्षाच्या अखेरीला या किंमती कोसळू लागल्यानंतर सरकारने ऑक्टोबर २०१४ मध्ये डिझेलच्या किंमती पूर्णपणे नियंत्रणमुक्त करण्याचा पर्याय स्वीकारला.

डिझेलची किंमत नियंत्रणमुक्त करण्याच्या माध्यमातून वसुलीतील तूट (under recovery) संपुष्टात आणत असताना आंतरराष्ट्रीय बाजारातील किफायतशीर किंमती आणि मजबूत झालेला रूपया यामुळे आर्थिक वर्षातील एप्रिल ते डिसेंबर या पहिल्या नऊ महिन्यातील संवेदनशील पेट्रोलियम उत्पादनांच्या वसुलीतील एकूण तूट ६७,०९१ कोटी रूपयांपर्यंत कमी झाली. अनुदानाच्या रकमेचा आकडा २०१३-१४ मध्ये १,३९,८६९ कोटी रूपये आणि २०१२-१३ या आर्थिक वर्षात १,६१,०२९ कोटी रूपयांच्या आसपास घोंघावत होता. (खालील तक्ता क्र. २ बघा).

पेट्रोलियम नियोजन आणि विश्लेषण विभागाच्या (पेट्रोलियम प्लॅनिंग अँड ॲनॅलिसीस सेल PPAC च्या) नुसार, २७ फेब्रुवारी रोजी भारताने एकूण आयात केलेल्या खनिज तेलाची किंमत प्रति बॅरल ५९.१९ डॉलर होती. त्यापूर्वी त्याच महिन्यात ही किंमत प्रति बॅरल ४३ डॉलरपर्यंत घसरल्याने सहा वर्षातील निचांक गाठला गेला होता. केरोसिनच्या वसुलीतील फेब्रुवारी महिन्यातील तोटा प्रति लिटर १३.३२ रूपये होता. आज देखील भारतासाठी ही समाधानाची बाब आहे कारण जून २०१४ पर्यंत ब्रेंट खनिज तेलाचे भाव प्रति बॅरल ११५ डॉलरपर्यंत पोहोचले होते. खनिज तेलाची आपली गरज भागवण्यासाठी आयातीवर ८० टक्के अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशासाठी ही अजूनही आनंदाची बातमी आहे.

२०१३-१४ या वर्षात खनिज तेलाची आयात १८९.२३८ मेट्रिक टन इतकी होती, ज्याची किंमत ८,६४,८७५ कोटी रूपये होती. २०१२-१३ मध्ये ७,८४,६५२ कोटी रूपये खर्च करून

आयात करण्यात आलेल्या १८४.७९५ मेट्रिक टन खनिज तेलाच्या तुलनेत ही वाढ आकारमानाच्यादृष्टीने २.४० टक्के तर किंमतीच्या दृष्टीने १०.२२ टक्के इतकी नोंदवली गेली. आयातदार देश असल्याने, तेलाच्या किंमतींमध्ये झालेल्या या घसरणीचा फायदा सरकारला आपला अनुदानावरील खर्चाचा बोजा कमी करण्यासाठी झाला त्याचबरोबर चालू खात्यावरील तूट नियंत्रणात ठेवता आल्याने दिलासाही मिळाला आणि रूपयाच्या मूल्यावरील दबाव कमी झाला. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किंमतीत झालेल्या घसरणीचे मागील कारण हे मुख्यत्वे अमेरिका आणि कॅनडामध्ये शेल तेलाच्या अपारंपरिक तेल उत्पादनात झालेली प्रचंड वाढ हे होते.

जेव्हा किंमती घसरल्या तेव्हा त्या पुन्हा वाढाव्यात यासाठी जगातील सर्वाधिक तेल उत्पादक देशांची संघटना असलेली (ओपेक) उत्पादन कमी करेल अशी अपेक्षा होती. मात्र, किंमती कमी झाल्यामुळे अमेरिकेतील शेल तेलाच्या उत्पादनातील प्रचंड वाढ रोखली जाईल या आशेने त्यातील सर्वाधिक उत्पादन करणारा देश असलेल्या सौदी अरेबियाने देखील बाजारातील आपला हिस्सा कमी करण्यात स्वारस्य दाखवले नाही. त्याचा परिणाम म्हणजे तेलाच्या किंमती सहा वर्षातील निचांकी पातळीवर पोहोचल्या.

रशिया, सौदी अरेबिया आणि व्हेनेझुएला यासारख्या बड्या तेल उत्पादक देशांसाठी हा कालखंड खडतर असला तरी भारत आणि जपान या सारख्या ग्राहकांसाठी कठीण परिस्थितीत असलेल्या अर्थव्यवस्थेला वरदान देणारा ठरला. परिणामी, भारतात आयात केल्या जाणाऱ्या एकूण खनिज तेलाच्या सरासरी किंमतींमध्ये ५६ टक्के घट झाली. एप्रिल महिन्यात प्रति बॅरल १०५.५६ डॉलर असलेला दर पुढील वर्षीच्या जानेवारी महिन्यात ४६.५९ डॉलर प्रति बॅरलपर्यंत घसरला होता. (खालील तक्ता क्र. ३ बघा.)

असे असले तरी, डिझेल आणि पेट्रोलच्या किंमती नियंत्रममुक्त केल्या असल्याने आंतरराष्ट्रीय किंमतीतील अस्थिरता आणि वाढ यांचा परिणाम पेट्रोलियम उत्पादनांच्या देशातील किंमतींवर होऊ शकतो अशी चिंता तज्ञ व्यक्त करतात. त्यासाठी, अर्थमंत्र्यांनी संपूर्ण वर्षासाठीचा आपला पहिला अर्थसंकल्प सादर केल्यानंतर काही तासातच पेट्रोलच्या किंमतीत दर लिटरमागे ३.१८ रूपये तर डिझेलच्या किंमतीत दर लिटरमागे ३.०९ रूपये वाढ करण्यात आल्याचा दाखला ते देतात.

तरीदेखील, भारतीय अर्थव्यवस्था आणि तेल कंपन्यांसाठी हा कालखंड जागतिक किंमतींमध्ये आलेल्या मंदीचा पुरेपुर फायदा घेण्याचा आहे.

**तक्ता क्र. १**

**भारतातील एकूण आयातीत खनिज तेलाची किंमत (डॉलर प्रति बॅरल)**

| वर्ष | सरासरी |
|---|---|
| २००३-०४ | २७.९७ |
| २००४-०५ | ३९.२१ |
| २००५-०६ | ५५.७२ |
| २००६-०७ | ६२.४६ |
| २००७-०८ | ७९.२५ |
| २००८-०९ | ८३.५७ |
| २००९-१० | ६९.७६ |
| २०१०-११ | ८५.०९ |
| २०११-१२ | १११.८९ |
| २०१२-१३ | १०७.९७ |
| २०१३-१४ | १०५.५२ |

**तक्ता क्र. २**

| वर्ष | वसुलीतील तूट (रू./कोटी) |
|---|---|
| २००५-०६ | ४०००० |
| २००६-०७ | ४९३८७ |
| २००७-०८ | ७७१२३ |
| २००८-०९ | १०३२९२ |
| २००९-१० | ४६०५१ |
| २०१०-११ | ७८१९० |
| २०११-१२ | १३८५४१ |
| २०१२-१३ | १६१०२९ |
| २०१३-१४ | १३९८६९ |
| २०१२-१३ | १०७.९७ |
| २०१३-१४ | १०५.५२ |

**तक्ता क्र. ३**

**भारताने एकूण आयात केलेले खनिज तेल २०१४-१५**

| वर्ष | सरासरी |
|---|---|
| महिना | खनिज तेलाची सरासरी किंमत (डॉलर प्रति बॅरल) |
| एप्रिल | १०५.५६ |
| मे | १०६.८५ |
| जून | १०९.०५ |
| जुलै | १०६.३० |
| ऑगस्ट | १०१.८९ |
| सप्टेंबर | ९६.९६ |
| ऑक्टोबर | ८६.८३ |
| नोव्हेंबर | ७७.५८ |
| डिसेंबर | ६१.२१ |
| जानेवारी | ४६.५९ |

(स्त्रोत : तेल मंत्रालय आणि पीपीएसी)

# भारतीय निर्मिती क्षेत्र - नवीन दृष्टिकोन व आवश्यक बाबी

- पी.एम मॅथ्यू



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'मेक इन इंडिया' आणि ''स्कीलींग इंडिया'' हे दूरदृष्टीने पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात येण्यास सुरुवात झाली कारण या अंदाजपत्रकात निर्मिती क्षेत्राला जास्त प्राधान्य देण्यात आले असुन उत्पादन / निर्मिती क्षेत्रातील सर्वच उद्योगांना यामुळे प्रोत्साहन मिळाले आहे. याचा अर्थ असा नाही की, या क्षेत्राची कामगिरी उल्लेखनीय नव्हती परंतु जागतिक स्पर्धेचा विचार, स्पर्धेमधिल देश, त्यांचे एकुण ढोबळ उत्पन्न आणि क्षेत्रानिहाय उत्पन्न यांचा अभ्यास केल्यास भारताला जागरुकतेने नवीन उद्यमशीलता धोरण अवलंबिणे गरजेचे होते. यासाठी उत्पादन स्पर्धात्मकते बरोबरचं, कौशल्याधारित रोजगार वाढविणे, प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादींचा समावेश आहे. तसेचं बौध्दिक संपदा हक्क जपणे गरजेचे आहे या पार्श्वभूमीवर भारतीय नवउद्योजकांना पाठिंबा देण्याच्या दृष्टीने अवलंबिलेले स्कीलींग इंडिया हे धोरण परिणाम कारक ठरेल.**

## १.० - पार्श्वभूमी

उत्पादन क्षेत्रातील अपुऱ्या वाढीचा भारतातील रोजगार निर्मितीवर परिणाम होत आहे. विविध क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण व कृषी क्षेत्रातील मूल्यवर्धन यात मेळ नाही. कृषी क्षेत्रातील मूल्यवर्धन हे देशात गरीब लोक जास्त असण्याचे प्रमुख कारण आहे. त्यात तातडीने दुरूस्तीची गरज आहे. उत्पादन क्षेत्र हे कामगारांना सामावून घेणाऱ्या स्पंजासारखे असले पाहिजे. कृषी क्षेत्रातून बाहेर पडून जास्त उत्पन्न मिळवू पाहणाऱ्यांसाठी तो एक मार्ग असला पाहिजे.

जागतिकीकरण झालेल्या अर्थव्यवस्थेत निर्यात स्पर्धात्मकता वाढविणे हे भारताला आवश्यक आहे कारण चीनशी उत्पादन क्षेत्रात स्पर्धा करायची असेल तर त्याला पर्याय नाही चीनने कमी खर्चात जास्त चांगली कौशल्ये असलेले मनुष्यबळ वापरून ते साध्य केले. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात चीनच्या उत्पादन क्षेत्राचा वाटा ३३ टक्के, कोरियाचा २९ टक्के, ब्राझीलचा २५ टक्के तर थायलंडचा २७ टक्के आहे भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात उत्पादन क्षेत्राचा वाटा केवळ १७ टक्के आहे. आपल्याकडे इतर साधने व पायाभूत सुविधांची कमतरता आहे त्यामुळे कौशल्याधारित उत्पादन क्षेत्रात बाहेरून गुंतवणुकीचा ओघ कमी आहे.. काही क्षेत्रातील अलिकडचा कल पाहिला तर स्वयंचलित वाहने व सुटे भाग, विशेष रसायने व जेनरिक औषधे तसेच अभियांत्रिकी यात जागतिक गुंतवणूकदारांना उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करण्यास बराच वाव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया' व 'स्कीलिंग इंडिया' म्हणजे भारतात उत्पादन करा व भारतीय लोकांची कौशल्ये वाढवा या दोन योजनांवर भर दिला आहे, त्यांचे महत्व या पार्श्वभूमीवर लक्षात घेतले पाहिजे.

काळजीचे कारण म्हणजे या योजनांकडे आपण गांभीर्याने किंवा खोलात जाऊन पाहण्याचे सोडून दिले आहे. चीनचे एकूण देशांतर्गत उत्पन्न हे भारतापेक्षा ३.८ पट अधिक आहे, यंत्रसाधने हा उत्पादन क्षेत्राचा पाया मानला जातो त्याचे उत्पादन चीनमध्ये आपल्यापेक्षा ५५ टक्के जास्त होते. भारताला उत्पादन क्षेत्र वार्षिक १२ ते १४ टक्क्यांनी वाढवायचे असेल तर त्यासाठी धोरण पाहिजे. येत्या पंधरा वर्षात उत्पादन क्षेत्रात १० कोटी रोजगार निर्माण झाले तरच आपल्याला लोकसंख्या लाभांश प्राप्त करता आला असे म्हणता येईल किंवा वाढत्या लोकसंख्येचा योग्य फायदा घेता आला असे म्हणता येईल, तसेच भांडवली वस्तूंच्या उद्योगात व नवप्रवर्तनात (इनोव्हेशन) स्पर्धात्मकता

व शाश्वतता गाठता येईल. नवप्रवर्तनाच्या धोरणाचा वापर हा उत्पादन धोरणाबरोबरच एकात्म पद्धतीने केला पाहिजे , त्यासाठी आतापर्यंत आपण जी धोरणे आपण राबवत आले आहे त्यात बदल करायला पाहिजे. त्यामुळे आधीच्या धोरणांचा आढावा घ्यायला पाहिजे.

## २.० सर्वंकष स्पर्धात्मकता- अर्थ व विस्तार

स्पर्धात्मक अर्थव्यवस्था या त्या अर्थव्यवस्था आहेत ज्या उत्पादनवाढीला चालना देतात व वर्तमान व भविष्यकाळासाठी भरभराट निर्माण करतात. स्पर्धात्मक अर्थव्यवस्था व पाठबळ असलेले आर्थिक वातावरण हे कुठल्याही देशाच्या अर्थव्यवस्थेला उद्योगांतील परिणाम करणारे घटक, उतारचढाव यापासून तर वाचवतेच पण मजबूत आर्थिक स्थिती भविष्यकाळासाठी निर्माण करून देते.

जागतिक आर्थिक मंच म्हणजे डब्ल्यूईएफ या संघटनेच्या मते स्पर्धात्मकता ही संस्था, धोरणे व देशातील उत्पादकता वाढवणाऱ्या इतर घटकांचा संच आहे.. उत्पादनाची पातळी ही शाश्वत भरभराटीची पातळी ठरवित असते व ती अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून ठरते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर अर्थव्यवस्था जेवढी जास्त स्पर्धात्मक असेल तेवढ्या प्रमाणात उत्पादन वाढून नागरिकांची आर्थिक उत्पन्न पातळी वाढते.

## ३.० उद्योजकतेचा आकार व स्पर्धात्मकता

आतापर्यंत उत्पादकतेवर ज्या मुख्य प्रवाहातील चर्चा झाल्या आहेत त्यात उच्च तंत्रज्ञान, उद्योग व मोठ्या उद्योगांचा समावेश आहे. लघु व मध्यम उद्योगातील उत्पादकतेचा विचार त्यात केवळ पार्श्वभूमी पातळीवर केला गेला आहे. त्यामुळे उदयोन्मुख अर्थव्यवस्थांनी केंद्र स्थानी येऊन लघु व मध्यम उद्योगांकडेही लक्ष वळवले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय संख्यात्मक अभ्यासाच्या मते किमान ५० टक्के लघु उद्योग हे सुरू होताच पहिल्या वर्षातच अपयशी ठरतात, तर ९५ टक्के उद्योग हे पहिल्या पाच वर्षात मान टाकतात. उद्योजकतेचा अनुभव नसणे, फार चांगली ठिकाणे नसणे, भांडवलाची वाढ नसणे या कारणांबरोबरच उद्योगांची आत्मसंतुष्टता हे प्रमुख कारण आहे. अनेक वेळा जे उद्योग त्यांच्या गुणवत्तेवर टिकतात व प्रथम मध्यम यश मिळतात ते पुढे उत्पादकतेच्या पातळीवर टिकत नाहीत व स्पर्धात्मकतेत त्यांना हार मानावी लागते. त्यातून विक्री कमी होते त्यामुळे उत्पादकता व स्पर्धात्मकता वाढवणे आवश्यक आहे त्यामुळे कदाचित पहिल्यांदा विक्रीला फटका बसेल पण त्यात हार मानता कामा नये. त्यामुळे उत्पादकता वाढवणे व उद्योगाचा पर्यायाने उत्पादनाचा दर्जा वाढवणे हे दोनच पर्याय यात महत्वाचे मानले जातात.

उत्पादकतेतील स्पर्धात्मकता ही आधुनिक जगात चर्चेला आली पाहिजे पण ती चर्चा जागतिकीकरण, उदारीकरण यांच्याच संदर्भातून होणे आवश्यक आहे. लवचिक विशेषीकरणाची पहाट क्षितिजावर असताना स्पर्धात्मकतेला एक नवा पैलूही आहे. उत्पादनात जागेशी मर्यादित राहिलेले . सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही परिणाम आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन सुरू असते त्यामुळे स्थानिक फायदे म्हणजे तुलनात्मक कमी किंमत, बाजारपेठेचे चांगले ठिकाण याबाबींचा त्यात अंतर्भाव असतो.विक्रीचे एक असे एक वातावरण तयार होते की, ज्यामुळे स्पर्धात्मकता वाढीस लागते त्यामुळे बाजारपेठेचा विस्तार व स्थान वाढते. बाजारपेठ स्पर्धात्मकतेत त्याला फार महत्व असते.

उत्पादनात स्पर्धात्मकता आणण्यासाठी सतत नवीन बदल करावे लागतात त्याला नवप्रवर्तन असे म्हणतात. उत्पादकतेतील स्पर्धात्मकतेसाठी इतर आवश्यक गोष्टींचाही विचार करावा लागतो. एखाद्या उद्योगाला बाजारपेठेवर स्वार व्हायचे आहे की, कमी मुदतीच्या काळात फायदा मिळवायचा आहे यावरही बरेच काही अवलंबून आहे. एखाद्या उद्योगाला बाजारपेठेत विस्तार करायचा असू शकतो, काहींचा उद्देश रोजगार संरक्षण हा असू शकतो या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळवणे हे उत्पादकतेविषयी कुठलीही चर्चा करतांना मिळवणे आवश्यक असते. जागतिक स्पर्धेमुळे बाजारपेठ समावेश, तांत्रिक बदल व नवप्रवर्तन लवकर घडून येते. कौशल्य सुधारणाही वेगाने होते.

## ४.०- उत्पादनातील स्पर्धात्मकतेचा मुद्दा

लघु व मध्यम उद्योग हे विकसीत

नव्हे तर विकसीत देशांच्या उत्पादन क्षेत्राचा पाया आहे. त्यामुळे या उद्योगांमध्ये स्पर्धात्मकता आली तर ते एकूणच उत्पादन क्षेत्राच्या वाढीला अनुकूल ठरू शकेल. पर्यायाने त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेलाही चांगला फायदा होऊ शकेल. सामूहिक जबाबदारीच्या प्रारूपाच्या एक दशकाच्या प्रयोगात असे दिसते की, हे प्रयोग एकूण उत्पादनशीलतेला फायद्याचे ठरले व काही उद्योगांचे छोटे समूह त्यामुळे उत्पादन वाढवू शकले. पण देशाची उत्पादन क्षमता वाढली नाही . त्या पार्श्वभूमीवर एनएमसीपी योजना राबवण्यात आली. जे लघु व मध्यम उद्योग स्वतंत्रपणे वस्तूंची निर्मिती करून त्यांची स्पर्धात्मक बाजारपेठेतील त्यांचे स्थान समजून घेऊन त्यांच्या कंपनीचा फेरविचार करू शकले त्यांची गोष्ट वेगळी आहे. त्यामुळे अशा उद्योग एककांशी संबंधित घटकांचा विचार जागतिक पातळीवर करणे अवघड असते. त्यांनी स्वत:चा पुन:र्शोध घेऊन रचानात्मक बदल केले. तर ते स्पर्धेत टिकू शकतील व काही उपायांची अंमलबजावणी करू शकतील. लघु व मध्यम उद्योग नव निर्मितीत मोठी शृंखला परिणाम घडवून आणू शकते. नवप्रवर्तन व तंत्रज्ञान विकासासाठी ते एक मोठे माध्यम आहे. एखादा उद्योग हा मोठ्या कंपनीसाठी तंत्रज्ञानाचा स्त्रोत ठरू शकतो.त्यामुळे अशा आस्थापनांना तंत्रज्ञान विकासाला उत्तेजित केले पाहिजे त्यामुळे वाढत्या स्पर्धात्मकतेत हे उद्योग उभे राहू शकतील. द इन्स्टिट्यूट ऑफ स्मॉल एंटरप्रायझेस अँड डेव्हलपमेंट या संस्थेने असे म्हटले आहे की, अनेक लोक कार्यक्रम व संबंधित मंत्रालयातील विभाग लघु उद्योजक व मध्यम उद्योजकांचे प्रश्न समजून घेण्यात सक्षम नाहीत. त्यासाठी मूलभूत बदलांची गरज आहे.

तंत्रज्ञानाचा सर्वसमावेशक समुच्चय, व्यवस्थापन व आरेखन यांचा उपयोग स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी केला पाहिजे, तथापि लघु व मध्यम उद्योगात हे लगेच शक्य नसते, तेथे डिझायनर म्हणजे आरेखकाची भूमिका महत्वाची ठरते. छोट्या व मध्यम लघुउद्योकांना हे शक्य असतेच असे नाही. त्यासाठी त्यांना आरेखनातील बाहेरचा तज्ञ आवश्यक आहे. बाहेरील तज्ञ व्यक्ती शोध घेणे सध्यातरी त्यांना शक्य होतेच असे नाही. उपादनाची संकल्पना तयार झाल्यापासून ते बाजारपेठेत स्थानापन्न करण्यार्पयंत म्हणजे ''माइंड टू मार्केट'' हे अंतर व वेळ कमी करण्याची गरज आहे त्यासाठी आरेखकाचा दृष्टिकोन पद्धतशीर असला पाहिजे, तो लघु व मध्यम उद्योजकांपर्यंत पोहोचला पाहिजे व नंतर प्रत्यक्षात उतरला पाहिजे.

## ४.१ तंत्रज्ञान व नवप्रवर्तन

नवीन सहस्त्रकाचा विचार केला तर उद्योगाच्या विकासासाठी दोन आकृतीबंध सांगता येतात. अनेक विकसनशील देशात जो आकृतीबंध वापरला जातो तो त्या भागातील सरकार, उत्तेजनाठी क्षेत्रे व विकास यात सरकारची भूमिका महत्वाची आहे, तथापि अनेक औद्योगिक प्रगत देशात नवप्रवर्तनावर म्हणजे इनोव्हेशनवर भर आहे.

कुठल्याही देशाच्या नवप्रवर्तनशीलतेचा निदर्शक हा पायाभूत सुविधा व विकासावर एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या किती टक्के खर्च होतो हा आहे. भारताच्या संदर्भात सांगायचे तर यावर बरीच चर्चा झाली आहे. असा युक्तीवाद केला जातो की, ज्यात भारताची विज्ञान व तंत्रज्ञानातील क्षमता वाढली आहे, तथापि सरासरी आकड्यांच्या आधारे त्यातील पूर्ण चित्र उभे राहत नाही. पायाभूत विकासाच्या खर्चात व नवप्रवर्तनात जो खर्च केला जातो त्यात भारत अजून खूप मागे आहे. जागतिक पातळीवर केवळ चार भारतीय कंपन्या पहिल्या दहा व्यापारी कंपन्यांमध्ये आहेत. या दहा व्यापारी कंपन्या या पायाभूत विकास व संशोधनात जास्त पैसा खर्च करतात.

सर्वसाधारण परिस्थिती अशी असेल तर लघु व मध्यम उद्योगांची भारतातील स्थिती फारशी चांगली असण्याची शक्यता नाही. लघु व मध्यम उद्योगात विविध प्रकारच्या वस्तू तयार होत असतात तरीही त्यांचे पायाभूत संशोधन व विकास फारसा उत्तेजक म्हणावा असा नाही. आयएसईडीच्या आयपीआर म्हणजे बौद्धिक संपदा हक्क कायदा या विषयावरील अभ्यासातून ही बाब ठळकपणे निदर्शनास येते. (आयएसइडी-२००९)

नवीन उत्पादने व प्रक्रिया जगात रोजच्या रोज आकारास येत असतात त्याचे कारण तंत्रज्ञानातील क्रांती हे आहे. परंतु प्रक्रिया व उत्पादनातील हे बदल आस्थापने स्वीकारतात की नाही हा

व्यापक प्रश्न असून तो काही महत्त्वाच्या घटकांवर अवलंबून आहे. हे महत्वाचे घटक दोन भागात रूपांतरित करण्यात येतात ते म्हणजे १)सक्तीची क्रमवारी व २) समावेशक क्रमवारी.

## ४.२ - कौशल्य वाढवण्यासाठी पुढाकार

प्रत्येक राज्य व केंद्र सरकारची सर्व मंत्रालये ही वेळोवेळी कौशल्य सुधारणा कार्यक्रम वेगवेगळ्या प्रकारे राबवित असतात. तथापि या कार्यक्रमांची कौशल्यांची गरज पाहता हे खंडित स्वरूपात कामगारांपर्यंत पोहोचवले जात असल्याने त्याचा फारसा उपयोग उत्पादन वाढीसाठी होत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना विभागीय व उपविभागीय पातळीवरील प्रशिक्षण दिले जात असले तरी त्याचा परिणाम साध्य होत नाही. एखादी अर्थव्यवस्था उत्पादक, नवप्रवर्तनशील व स्पर्धात्मक बनवण्यासाठी जास्त चांगली कौशल्ये असलेले सक्षम मनुष्यबळ लागते. रोजगाराचा दर्जा, त्याची रचना व रोजगार संधीतील वाढ हे कुठल्याही अर्थव्यवस्थेच्या वाढीचे निदर्शक आहेत.जागतिकीकरणाचा वाढता वेग व तंत्रज्ञानातील बदल हे एकाचवेळी आव्हान व आर्थिक विस्तारासाठी व रोजगारनिर्मितीसाठी संधी निर्माण करीत असतात. अशा संधींचा फायदा घेत असताना व सामाजिक किंमत व स्थलांतर कमी करीत असताना देशातील कामगारांमध्ये कौशल्ये असणे गरजेचे असते. मुक्त अर्थव्यवस्थेत हे स्थित्यंतर नेहमी घडतच असते. ज्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ असते ते देश जागतिकीकरणाची आव्हाने व संधी या दोन्ही गोष्टी चांगल्या ताकदीने पेलू शकतात.

भारतात रोजगाराचा प्रश्न आहे पण कौशल्याधिष्ठित मनुष्यबळ नाही. भारतात नोकऱ्यांचा प्रश्न फार बिकट आहे पण जर लोकांनी व्यावसायिक अभ्यासक्रम चांगल्या प्रकारे आत्मसात केले तर त्यांना रोजगार मिळण्यास मदत होईल. दीड वर्षांपूर्वी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी एक योजना राबवण्यात आली त्यात अर्ध कुशल असलेल्या ९३ टक्के भारतीयांचा समावेश करण्यात आला होता त्याचबरोबर असंघटित कामगार क्षेत्रातील कमी किंवा नगण्य प्रशिक्षण असलेल्यांचा समावेश करण्यात आला होता. कौशल्ये शिकवणाऱ्या आस्थापनांची संख्या वाढली आहे. २५ लाख विद्यार्थी किंवा कर्मचारी देशातील व्यावसायिक अभ्यासक्रमात उपलब्ध असलेल्या जागांचा फायदा घेऊ शकतात. २०२० पर्यंत या जागा उपलब्ध होतील व दरवर्षी १२.८ दशलक्ष लोक दरवर्षी विविध कौशल्ये असलेले कामगार बाजारपेठेत येतील. इ.स. २०२० मध्ये ५४० दशलक्ष कुशल कामगारांची आवश्यकता आहे, यात उच्च कौशल्य व साधी कौशल्ये असलेल्या कामगारांचा समावेश आहे. त्यात डॉक्टर्स, अभियंते, व्यवस्थापक यांचा त्याचबरोबर अर्ध कुशल कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. या कामगार किंवा कर्मचाऱ्यांपैकी ५० टक्के कर्मचारी हे भारतातील असतील. देशातून होणारे स्थलांतर बघता प्रत्येक पातळीवर कौशल्याधारित मनुष्यबळाची कमतरता दिसणार आहे. असे असले तरी त्याचा प्रतिकूल परिणाम हा मध्यम व लघु उद्योगांवर दिसणार आहे. एकीकडे सर्वसाधारण कौशल्ये असलेल्या मनुष्यबळाच्या उपलब्धतेचा अभाव हा स्थलांतराने दिसणार आहे. मध्यम व लघु उद्योग तसेच इतर सक्षम कर्मचारीही स्थलांतर करू शकतात त्यामुळे त्याचा परिणाम हा लघु व मध्यम उद्योगांवर दिसणार आहे. त्यामुळे लघु व मध्यम उद्योगात रोजगाराचे दरही वाढणार आहेत, त्यामुळे त्यांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह लागू शकते. त्यामुळे कौशल्याची उणीव भरून काढण्यासाठी कायमस्वरूपी मंचाची गरज आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात कौशल्याधारित विकासासाठी एकात्मिक तसेचं २०१४ च्या अर्थसंकल्पातही राष्ट्रीय बहुकौशल्य कार्यर्क्रमाचा उल्लेख केला होता त्यालाच नंतर स्कील इंडिया म्हणजे ''कौशल्यक्षम भारत'' असे नाव देण्यात आले. युवकांना कौशल्ये शिकवून त्यांच्यासाठी रोजगार निर्मिती करणे हा कार्यक्रमाचा हेतू आहे. त्यात कौशल्य प्रशिक्षण व पारंपारिक कौशल्येही शिकवली जाणार आहेत. जुळारी, सुतार, गवंडी, लोहार,विणकर यासारख्या उद्योगात लागणारी कौशल्ये स्कील इंडियामध्ये तरूणांना देण्याचा विचार असून त्यामुळे सार्वजनिक

धोरणाच्या माध्यमातून हस्तक्षेप करून स्कील इंडिया म्हणजे कौशल्यक्षम भारत योजना साकारण्यात आली आहे. कामगार बाजारपेठेत संधी निर्माण करून त्यांचा लाभ घेणे हा त्यामागचा हेतू आहे. वाढत्या अर्थव्यवस्थेत संधी मोठ्या असतात पण कामगारांच्या क्षमतेचा वापर करून घेण्यात सार्वजनिक धोरणाची मदत झाली पाहिजे, या कार्यक्रमात तसे घडत आहे. प्रेरणात्मक व इतर कौशल्यांच्या समुच्चयाने कामगारांची क्षमता वाढवली जात आहे. खासगी क्षेत्राच्या विकासातील धोरणात एक मोठा संकल्पनात्मक बदल त्यामुळे घडून येत आहे.केंद्रीय अर्थसंकल्प २०१५ मध्ये जे प्रस्ताव आहेत त्यांच्यामुळे कौशल्याधारित कामांना वेग मिळाला आहे. अर्थसंकल्पातील तरतुदींचा चांगला परिणाम शिक्षण क्षेत्रात पाहायला मिळणार आहे. पिरॅमिडच्या तळापासून रोजगार निर्मिती झाली पाहिजे. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, उर्जा व उत्पादन या क्षेत्रातील गुंतवणुकीवर भर दिला आहे. स्वच्छ भारत, गंगा स्वच्छता मोहीम व डिजीटल भारत या योजनांवरही भर दिला आहे याचा उद्योगांना कामासाठी तयार मनुष्यबळ निर्माण करता येणार आहे. कौशल्यक्षम भारत व राष्ट्रीय कौशल्य कार्यक्रम यामुळे ३१ क्षेत्रात कौशल्ये विकसित असलेले कर्मचारी तयार होतील.

व्यवस्थापन बदल व संघटनात्मक रचना बदलून, धोरणात्मक वातावरण नवप्रवर्तनाला (इनोव्हेशन) तसेच बौद्धिक संपदा हक्कांना अनुकूल करीत ज्ञानाच्या हस्तांतरासाठी व एकात्मतेसाठी प्रयत्न करता येतील, ज्ञानाधिष्ठित उद्योगात नेटवर्क प्रारूपाचा उपयोग केला पाहिजे तर नवप्रवर्तन व पायाभूत सुविधांचा विकास घडवता येईल त्यात संशोधन संस्था, विद्यापीठे व संबंधितांची मदत घ्यावी लागेल. या प्रयत्नांना सतत पाठिंबा व उत्तेजन मिळणे उत्पादन क्षेत्राच्या फायद्यासाठी आवश्यक आहे. बौद्धिक संपदा हक्कांविषयी लोकांची जागरूकता दाखवली पाहिजे विशेष करून मध्यम व लघु उद्योगांना त्याचे शिक्षण दिले पाहिजे म्हणजे ते त्यांच्या कल्पनांना बौद्धिक संपदा हक्काचे कोंदणं देऊन माहितीवर आधारित निर्णय घेतील.

बौद्धिक संपदा हक्काचे महत्व फार आहे. लहान व मध्यम उद्योगांनी त्याकडे पुरेसे लक्ष दिले नाही याचे कारण हा विषय किचकट आहे व सामान्य उद्योजकांना तो कळत नाही. याशिवाय अगदी लहान आस्थापनांचा छोटा आकार, त्यांची स्थानिक बाजारपेठ यामुळे बौद्धिक संपदा हक्कांकडे ते फार लक्ष देत नाहीत. त्यामुळे बौद्धिक संपदा संरक्षण ही काळाची गरज आहे हे समजून घेतले पाहिजे कारण छोट्या व मध्यम उद्योगांची अनेक पारंपरिक क्षेत्रे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आक्रमिली आहेत. त्यामुळे बौद्धिक संपदेची काही मूलभूत क्षेत्रे ही महत्वाची आहेत.

### ४.३ उद्योजकता धोरण

रोजगार निर्मिती धोरणात स्वयंरोजगार योजनांचा समावेश होतो ज्या छोट्या मध्यम उद्योगांशी निगडित आहेत. ही धोरणे म्हणजे लघु उद्योजकांना मोठ्या कंपन्यांकडून बसणाऱ्या फटक्यांपासून वाचण्यासाठी केलेली आर्थिक उपायांची डागडुजी आहे त्यामुळे काही प्रमाणात लघु व मध्यम उद्योगांना फायदा होईल. लघु व मध्यम उद्योगांच्या धोरणाचा भर प्रामुख्याने छोटे उद्योग निर्माण करण्यावर असतो पण छोटे उद्योजकही तयार झाले पाहिजेत. हे उद्योजक त्यांन बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास अनिश्चित काळातही उद्योग वाढवू शकतात, वाढते तंत्रज्ञान बदल व सामाजिक, आर्थिक वातावरण यांना ते तोंड देऊ शकतात. जगात सगळीकडे हे मान्य होऊ लागले आहे की, वाढीस पोषक उद्योजकता निर्माण करण्यासाठी केवळ स्वयंरोजगार योजना व लघुउद्योगांसाठी अनुकूल वातावरण असून भागणार नाही. स्वयंरोजगार योजना व चांगले वातावरण यामुळे जास्त रोजगार निर्माण होतो किंवा शाश्वत स्पर्धात्मकता निर्माण होतेच असे नाही.उद्योजकांना बाजारपेठेकडून जर काही संदेश मिळाले, माहिती मिळाली तर त्यामुळे ते अनिश्चित काळात, बदलते तंत्रज्ञान व सामाजिक-राजकीय वातावरणात उद्योग वाढवू शकतात.

भारतीय अर्थव्यवस्था उद्यमशीलतेकडे वळत असताना तिची प्रगती कशी होते हे पाहणे लक्षणीय ठरेल, त्यासाठी काही व्यवस्था तयार करावी लागेल. राष्ट्रीय उद्यमशीलता धोरण हे एका मंत्रालयावर सोडून चालणार नाही. आंतर मंत्री पातळीवरील कार्यकारी गट

हे अग्रक्रम ठरवण्यासाठी तयार करावे लागतील.

स्थानिक पातळीवर त्याचे रूपांतर हे शिक्षण, आर्थिक व सामाजिक व सांस्कृतिक संघटनांच्या सहकार्यातून होणे अपेक्षित आहे. खासगी व सरकारी अशा दोन्ही क्षेत्रात हेच अपेक्षित आहे. खंबीर राजकीय नेतृत्वाशिवाय स्थानिक पातळीवर हे बदल घडवणे शक्य नाही. तरूण नेतृत्व असेल तर ते उद्यमशील अर्थव्यवस्था अधिक व्यापक दृष्टिकोनातून समजून घेऊ शकेल व व्यावसायिक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांना हाताशी घेऊन हे काम जास्त चांगल्या प्रकारे करू शकेल त्यामुळे तरूण नेतृत्व हे या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जास्त सुयोग्य आहे. देशाताल उद्मशीलतेकडे नेण्यासाठी तरूण नेतृत्व हवे. स्पर्धात्मकता आणण्यासाठी आपला कार्यक्रम ठरलेला हवा . राष्ट्रीय उद्यमशीलता धोरण लागू करण्यासाठी भारताला हीच सुयोग्य वेळ आहे.

जागतिकीकरणाच्या वाढत्या वेगाने लघु व मध्यम उद्योगांना आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत स्थान मिळाले आहे. या गतीशील बाजारपेठेत उद्योगांना, व्यापाराला महत्व देणे हेच महत्वाचे आहे. त्यामुळे स्थानिक उद्योग त्यांची नवीन उत्पादने ब्रँड म्हणून विकसित करतील किंवा आंतरराष्ट्रीय उद्योगांबरोबर सहकार्य करून संयुक्त प्रकल्प उभारतील. स्थानिक लघु व मध्यम उद्योग हे सध्या जुनाट दुकाने व प्रकल्प या पद्धतीने काम करीत आहेत त्यांचीही काम करण्याची व सादरीकरणाची शैली बदलेल. उद्योग व्यापारातील बदललेल्या प्रत्येक संधीचा ते फायदा घेतील व आपले ब्रँड वेगळे बनवतील व स्पर्धात्मकतेतही पुरून उतरतील.

## ज्ञान व्यवस्थेची उभारणी

आतापर्यंतच्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, उद्योजकता विकास व लघु-मध्यम उद्योगांची वाढ यांनी उद्यमशील उपक्रमांच्या विकसनातील ज्ञानात मोठी भर टाकली आहे.सध्याची अर्थव्यवस्था ही ज्ञानाधिष्ठित आहे, त्यामुळे लघु व मध्यम उद्योगांच्या प्रगत स्वरूपातील उभारणीतून मिळालेले ज्ञान महत्वाचे आहे. अनेक विकासात्मक स्त्रोतात ज्ञान हे महत्वाचे असते व त्यामुळे भारताचा विकास वेगाने होईल. ज्ञान निर्मिती व ज्ञानाचा वापर यात भारतातील दरी वाढत चालली आहे ती मिटवावी लागेल

आर्थिक विकासाची प्रक्रिया ही ज्ञान केंद्री होत चालली आहे, एका अंदाजानुसार ५०-६० टक्के उद्योग हे माहितीवर आधारित आहेत. आधुनिक उत्पादन उद्योग हे माहिती निगडित दर्जाशी संबंधित आहेत. किंमत, वेळ यांच्याबाबतच्या ज्ञानाचा वापरही उत्पादन प्रक्रियेच्या व्यवस्थापनावर होत आहे. सेवा क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी आहेत व जागतिक अर्थव्यवस्थेच्याही वाढीला त्यामुळे उत्तेजन मिळते, पण ही अर्थव्यवस्था ज्ञानाधिष्ठित आहे. त्यामुळे माहिती व्यवस्थापन व ज्ञान व्यवस्थापन हे दोन्ही दृष्टिकोन यात महत्वाचे आहेत

माहिती व्यवस्थापन हे माहितीच्या सुसंघटनाशी संबंधित असते. त्याचा डेटा बेस (माहिती साठा) महत्वाचा असतो. ज्ञान व्यवस्थापन हे व्यक्त व अव्यक्त ज्ञानाचा समुच्चय असते. काही कमी पायऱ्यांच्या पद्धतीने सगळा उद्योगच बदलून जाऊ शकतो, पण माहिती व ज्ञान व्यवस्थापन हे एकमेकांना पूरक असतात, माहिती व्यवस्थापनाने ज्ञान व्यवस्थापनाचा पुरेसा वापर केला नाही तर त्याचा काही फायदा नाही. रचनात्मक पद्धती व प्रक्रिया यात शाश्वततेसाठी आवश्यक असतात.

## विकासाची कार्यक्रम सूची चार ज्ञान प्रक्रियांवर आधारित असते

१. ज्ञान निर्मिती व अधिग्रहण- हे वैज्ञानिक शोधांमुळे, पायाभूत सोयी, सुविधांमुळे व तंत्रज्ञान हस्तांतरामुळे, संघटना व सांस्कृतिक पद्धतींमुळे घडून येते
२. ज्ञानाचा स्वीकार किंवा वापर- नवप्रवर्तन काही क्षेत्रात गरजेनुसार झाले पाहिजे व त्याला कार्यात्मक वातावरणाची जोड मिळाली पाहिजे.
३. ज्ञानाचा प्रसार- औपचारिक व अनौपचारिक माध्यमातून ज्ञानाचा प्रसार करता येतो. ज्ञान निर्माते व स्वीकारकर्ते हे समाजात ज्ञानाचा वापर करण्यास जबाबदार असतात.
४. ज्ञानाचा वापर- कौशल्यपूर्ण कृतीने ज्ञानाचा वापर शेती, उद्योग, शाळा, रूग्णालये व इतर अनेक क्षेत्रात करता येतो.

याच्याशी संबंधित अनेक घटक

महत्वाची भूमिका पार पाडत असतात. सांस्कृतिक प्रथा व अनिवार्य दर्जा यांचा त्यात महत्वाचा वाटा असतो. हे ज्ञान सार्वजिक व खासगी क्षेत्रात तयार होत असते ते जलद विकासासाठी वापरता येते पण ते एक आव्हान आहे.

व्यावहारिक पातळीवर विविध मंत्रालये व खात्यांच्या योजना व कार्यक्रमांचा आढावा घेतला पाहिजे, त्यातील अनेक योजना संदर्भहीन व कालबाह्य झालेल्या दिसतात. खासगी क्षेत्रातील तज्ञांची मदत घेऊन खासगी व सरकारी अशी भागीदारी केली पाहिजे. त्यामुळे परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. आता निती आयोगाने त्यासाठी नवीन योजना आराख़डा तयार शिक्षित केला पाहिजे, त्यामुळे खरे प्रश्न समजून घेऊन नवीन फेररचनात्मक आराखडा तयार करता येईल.

## ४.५ पायाभूत सुविधांची भूमिका

एक आधुनिक, सुसंघटित व विस्तारित पायाभूत सुविधा ही देशाच्या आर्थिक विकासाची खरी गरज आहे. अर्थ मंत्रालयाने केलेल्या अंदाजानुसार १ लाख कोटी रूपये किंमतीचे पायाभूत प्रकल्प रखडले आहेत. वेळ व पैसा यात पायाभूत प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील दिरंगाईमुळे वाढ झाली आहे. त्यामुळे आपण आर्थिक क्षेत्रात फार प्रगती करू शकलो नाही. उत्पादन क्षेत्रात वाढीचा दर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १५ ते २५ टक्के असायला हवा तरच १० कोटी रोजगार तयार होऊ शकतात. सरकारने गेल्या दोन महिन्यात उत्पादन क्षेत्र व पायाभूत विकास यावर भर देण्याचे ठरवले आहे. परदेशी गुंतवणूक व नवीन परदेशी तंत्रज्ञान यात महत्वाचे आहे त्यातून रोजगार तयार होतील, नवप्रवर्तन म्हणजे इनोव्हेशन होईल. देशाची उत्पादन क्षमता वाढेल. परदेशी तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी आपल्यासारख्या विकसनशील देशाने सक्षमता दाखवली पाहिजे. जे लोक हे तंत्रज्ञान स्वीकारणार आहेत ते त्याचा वापर करून देशात लागणाऱ्या वस्तू व परदेशात लागणाऱ्या वस्तू तयार करतील. केवळ पायाभूत सुविधा प्रयोगशाळा उभारून पाश्चात्यांची नक्कल करूनही चालणार नाही. देशातील पायाभूत सुविधा प्रयोगशाळांना कल्पना या प्रत्यक्ष नवप्रवर्तनात रूपांतरित करता आल्या पाहिजेत.

स्थानिक भागीदारांचे उद्योगांविषयीचे ज्ञान केवळ व्यापारापुरते मर्यादित असून चालणार नाही तर सखोल तंत्रज्ञानाची जोड असलेले उद्योग तयार करण्याची त्यांची तयारी हवी. केवळ वस्तू विकून झटपट नफा मिळवण्याचे त्यांचे उद्दिष्ट नसावे. त्यामुळे खासगी कंपन्या काही करून दाखवण्याच्या जिद्दीने या सगळ्या चांगल्या गोष्टी आत्मसात करतात आपल्या देशात हे अधिक चांगल्या प्रकारे करता येईल.

चीनमध्ये बौद्धिक संपदा हक्क कायदे त्यांच्या हिताचे आहेत. चीन त्यांच्या देशात सरकारी खरेदी धोरणात स्वदेशी तंत्रज्ञानाला महत्व देतो त्यामुळे पूर्वी असे वाटत होते की, ते परदेशी कंपन्यांचे हित जपतात तर तशातला भाग नाही. बौद्धिक संपदेबाबत त्यांचे कायदे स्वागतशील नाहीत तरीही चीनची बाजारपेठ मोठी असल्याने हे सहन करूनही उद्योग तेथे राहतात. चीन आपले बौद्धिक संपदा हक्क हिरावून घेईल अशी भीती परदेशी कंपन्यांना तिथे वाटते. राष्ट्रीय मानकांचा वापर करूनही त्यांनी देशी उद्योगांना मदत केली आहे व परदेशी उद्योगांना स्पर्धेत गुंतवले आहे. भारतात परिस्थिती वेगळी आहे, बौद्धिक संपदा कायदा हा जास्त सक्षम असयाला हवा पण तो इतरांच्या अपेक्षांवर आधारित न ठेवता त्यात आपल्या देशातील उद्योजकांच्या संकल्पनांना कसे संरक्षण मिळेल हे पाहिले पाहिजे. जागतिक समर्थक जे सांगतात ते जसेच्या तसे स्वीकारण्याची गरज नाही. भारताने बौद्धिक संपदा हक्कांबाबत नवप्रवर्तनाला उत्तेजन दिले पाहिजे व शिवाय त्यात मक्तेदारी नसली पाहिजे.

राष्ट्रीय उत्पादकता धोरण अधिक स्वच्छ व टोकदार करण्याची गरज आहे जागतिक अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांमुळे ही बाब गरजेची आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीची शाश्वतता ही केवळ त्यावर अवलंबून नाही तर पायाभूत सुविधा व प्रशासन यातील कमतरता दूर केल्या पाहिजेत. भारतीय उद्योजकांना पाठिंबा देण्याचे आपले धोरण असले पाहिजे. योजनाबद्ध अर्थव्यवस्थेच्या धोरणांकडे पुन्हा झुकून चालणार नाही. चीनची नक्कल करूनही चालणार नाही

हे भारतीय धोरणकर्त्यांसमोरचे मोठे आव्हान आहे. भारतीयांची क्षमता वाढवणे व मागणीप्रमाणे पुरवठा करण्यास सज्ज असणे तसेच वैज्ञानिक व तांत्रिक पायाभूत सुविधात वाढ करणे गरजेचे आहे.

## भविष्यातील विकास मार्ग

पायाभूत सुविधा व उत्पादन क्षेत्राला प्राधान्य देऊन सरकार देशाच्या आर्थिक प्रगतीत गती आणू पाहात आहे त्यासाठी २०१५ च्या अर्थसंकल्पात तरतुदीही करण्यात आल्या आहेत. कर सुटीसाठी उर्जा निर्मिती उद्योगांना लागू असलेले सनसेट क्लॉज म्हणजे कलम ८०आयए हे ११ मार्च २०१४ पर्यत लागू होते ते पाच वर्षांसाठी वाढवले आहे. किमान पर्यायी करातून सूट दिली आहे अन्यथा करसुटीच्या सवलतीचा काही फायदा झाला नसता, त्यामुळे उर्जा व पुनर्नवीकरणीय उर्जा क्षेत्राला फायदा होणार आहे. मॅटच्या तरतुदीनुसार अगोदरच्या एसइझेड म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्रांना मॅट कर भरावा लागत होता तो आता विकसकांना भरावा लागणार नाही. सध्याच्या एसइझेड विकसकांनी त्याचे स्वागत केले आहे त्यांनी एसइझेडमध्ये सरकारच्या अगोदरच्या आश्वासनानुसार गुंतवणूक केली होती. त्यामुळे मॅट करातून सूट पुन्हा लागू करण्यात आली आहे त्यामुळे गुंतवणूकदारात पुन्हा उत्साह निर्माण होईल. कलम १४ ए चा जो अर्थ लावला गेला आहे त्यामुळे पायाभूत प्रकल्पांवर परिणाम होत आहे, ते प्रकल्प निविदा पद्धतीने दिले जातात त्यासाठी स्पेशल पर्पज व्हेइकल्स (एसपीव्ही) असावी लागतात. ही अट विशिष्ट तेवढेच समभाग असलेल्या उद्योगांसाठी आहे. एसपीव्हीसाठी समभाग व कर्ज यातून पैसे पुरवता येतो. कलम १४ ए अन्वये कर्ज निधीवरचे व्याज एसपीव्ही संबंधित कंपनीला उत्पन्न किंवा लाभांश सुरू करू लागल्यानंतर ते दिले जात नाही. कर्ज नधी हा प्रमुख घटक असल्याने ही अट जाचक आहे, त्यामुळे काही तरतुदींमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.

आरोग्य, शिक्षण व इतर काही क्षेत्रांना पायाभूत सुविधांचा दर्जा देण्याची मागणी जुनीच आहे त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. अर्थपुरवठादार कंपन्या किंवा बँका पायाभूत क्षेत्रात गुंतवणूक करीत असतात. त्यांनी कलम १० (२३ जी) पुनरूज्जीवित करण्याची मागणी केली आहे. हे कलम पूर्वी रद्द करण्यात आले होते. पायाभूत सुविधातील अर्थसाह्यावर मिळणाऱ्या व्याजाच्या उत्पन्नातून वजावट मिळावी असे ते कलम आहे. ते मान्य झाले तर पायाभूत प्रकल्पांसाठी कर्जे घेणाऱ्या कंपन्यांना फायदा होईल. कलम ३२ एसी हे नवीन प्रकल्प व यंत्रणेच्या निव्वळ किंमतीवर १५ टक्के वजावट घेणारे आहे, ते ३१ मार्च २०१३ नंतर लागू केले पण १ एप्रिल २०१५ मध्ये एकूण रक्कम १०० कोटींपेक्षा जास्त झाली. यात तीन वर्षे किमान गुंतवणुकीची रक्कम कमी केली व वजावट २५ टक्क्यांपर्यंत वाढवली तर फायदा होईल. प्रत्यक्ष करात सरकारने गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल असे धोरण ठेवले पाहिजे. प्रकल्प मंजुरीच्यावेळी करदात्याला सुलभ प्रक्रिया दिली पाहिजे. शुल्क कमी केले पाहिजे व वजावट तसेच इतर फायदे जाहीर केले पाहिजेत.

सर्व पायाभूत उद्योगांना समान वागणूक हा एक वेगळा विषय आहे. समजा काही व्यवसायावर उदा. विमानतळे, रेल्वे व बंदरे सेवा कर नाही पण पाणी, वीज व वाहतूक, मैलापाणी यावर तो सेवा कर आहे हा दुहेरी न्याय आहे.

उत्पादन क्षेत्रात सेनव्हॅट कर्ज व्यवस्था अधिक खुली करण्याची मागणी आहे त्यामुळे एकावर दुसरा अशी जी करांची साखळी निर्माण होते तशी होणार नाही व देशांतर्गत उद्योगांवर अकारण ताण येणार नाही. कंपन्यांसाठी खरेदी किंमत वाढवणे हा दुहेरी कराचा प्रकार झाला आहे. हा दुहेरी कर व्हॅट व सीएसटीमधील अनुसूचित यादीतील सेवांसाठी आकारला जातो.

*(**पी.एम. मॅथ्यू** हे कोचीन येथे लघु उद्योग व विकास संस्थेचे संचालक आहेत. त्यांना अर्थशास्त्र विषयासाठी बिर्ला राष्ट्रीय फेलोशिप मिळाली असुन ते योजना आयोगाच्या लघुउपक्रम विकासासाठी डॉ. एस.पी. गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीचे सदस्य होते ते भारतीय सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अहवाल मालिकेचे सदस्य आहेत.)* ***संपर्कासाठी ईमेल*** -
director@isedonline.org

# भारतीय निर्मिती क्षेत्र - जागतिक उत्पादन केंद्र बनण्याची संभाव्यता

**एक दृष्टीक्षेप**

अलिकेडेच केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्रीमती निर्मला सितारामन यांनी नवीन परदेशी व्यापार धोरणाची घोषणा करुन भारतीय नव उद्योजकांना उद्योगाच्या जागतिक संधी प्राप्त करुन दिल्यात. एफ. टी. पी. बद्दल बोलतांना सितारामन म्हणाल्या की, भारताने अवलंबिलेल्या मुक्त व्यापार दृष्टीकोनााचा फायदा देशातील निर्यात वाढविण्यावर होईल. पंतप्रधान मोदी यांचा व्यापारातील अडथळे कमी करणे, डिजीटल भारताची निर्मिती हे मोंदीच्या 'मेक इन इंडिया' धोरणाना पाठिंबा देणारे आहे. सरकारने कपडा निर्यात, अभियांत्रिकी उत्पादन, इलेक्ट्रानिक वस्तु उत्पादन निर्यातीचा आढावा घेऊन हे क्षेत्र सुदृढ सक्षम बनविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्नांची शाश्वती दिली आहे. मोदी सरकारच्या 'मेक इन इंडिया' या योजनेद्वारे भारताच्या महत्वाकांक्षी लक्षामध्ये उत्पादित केलेल्या मालाच्या योगदानाची टक्केवारी १६ टक्यांवरुन २५ टक्के ठरविली आहे. वर्ष २०१४-१५ मध्ये भारताची वाढ ७.४ टक्यांनी वाढेल असा अंदाज वर्तविला होता. प्रत्यक्षात ऑक्टोबर ते डिसेंबर २०१४ पर्यंत ही वाढ ७.५ टक्के नोंदविण्यात आली (सुधारित आकडेवारी नुसार) केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी अलिकडेचं भारतीय अर्थव्यवस्था ही अति जलद गतीने विकसीत होणारी अर्थव्यवस्था



असुन भारत भविष्यात जागतिक उत्पादन केंद्र बनु शकेल अशी ग्वाही त्यांनी दिली यामागे गेल्या २० वर्षातील व्यापार उदारीकरण, आर्थिक उदारीकरण आणि सामाजिक विकासाचे उद्दिष्ट होय.

## जागतिक उत्पादन केंद्र बनण्याची शक्यता

चीन एकमेव अतिवेगवान विकसीत अर्थव्यवस्था असलेला भारताचा स्पर्धक देश आहे. चीनचा मागील १० वर्षातील वृद्धीदर बघितला तर असे लक्षात येईल की चलन वाढ नियंत्रणापसुन, आर्थिक वृद्धी दर उद्दिष्ठ गाठण्यात चीन यशस्वी झाला असला तरी सध्या चीनला वाढीव रोजगार मुल्य आणि उच्च वेतन समस्या भेडसावित आहे. यामुळे सहाजिकच या घटकांचा परिणाम चीनच्या अर्थव्यवस्थेवर झाला आहे. वित्तमंत्री अरुण जेटली यांच्या मते, भारताने या संधीचा फायदा घेतला पाहिजे या संधीचे रुपांतर उत्पादन केंद्रात करायला हवे तेव्हाचं भारत जागतिक उत्पादन / निर्मिती केंद्र बनु शकेल.

**बाजारपेठेची व्याप्ती -** उत्पादन क्षेत्रातील तीव्र वाढ, विपणन, एच.एस.बी. सी. चा खरेदि व्यवस्थापकीय निर्देशांकात (पीएमआय) सलग तिसऱ्या महिन्यातील वाढ, डिसेंबर २०१४ मधल्या ५१.४ वरुन जानेवारी २०१५ पर्यंत पीएमआय ५२.४ टक्यांपर्यंत उंचावला. सेवा आणि उत्पादन क्षेत्राचा खरेदि व्यवस्थापकीय निर्देशांक सुद्धा याचं कालावधीत ५३.३ गुणांनी उंचावला आहे.

मार्किझे कंपनीच्या एका अहवालानुसार भारतीय औद्योगिक क्षेत्राची वाढ २०२५ पर्यंत एक लाख कोटी अमेरिकन डॉलर पर्यंत पोहोचेल. या क्षेत्रात

भारताच्या वार्षिक सकल उत्पादनामध्ये २५-३०% वाढ होण्याची क्षमता आहे. तसेच २०२५ पर्यंत देशांतर्गत ९० दशलक्ष रोजगार निर्मितीची क्षमता आहे.

टाटा स्त्रेतेजिक मॅनेजमेंट समूहाच्या अहवालानुसार देशांतर्गत रासायनिक उद्योगाची बाजारपेठ साधारण ११८ दशलक्ष यु .एस $ अशी आहे आणि राष्ट्रीय रासायनिक  बाजारपेठेच्या ती जवळ जवळ ३३% आहे. जवळ जवळ ८० हजारहून अधिक रसायनांचा अंतरभाव असलेले हे वैविध्यपूर्ण क्षेत्र आहे. सध्या उत्पादन क्षेत्रातील जी डी पी च्या १५% त्याचा वाटा आहे, त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात ह्या क्षेत्राला फार महत्व आहे.


## गुंतवणूक

१. २०१५ - २०१६मध्ये इलेक्ट्रोनिक उत्पादनांचा १८,०००कोटी ( युएस डॉलर २.८९ अब्ज) किंमतीचा गुंतवणूक प्रस्ताव भारत सरकारकडे आहे. हा आकडा दोन वर्षात दुप्पट होण्याची अपेक्षा आहे. युएसची पहिली सौर उर्जा कंपनी व चीनची ट्रीना उर्जा कंपनी द्वारे उर्जा निर्मितीच्या योजना विचाराधीन आहे.

२. सॅमसंग, मर्सिडीज बेंझ, बीएमडब्ल्यु या नावाजलेल्या मोबाईल व कार कंपन्यांनी मोठयाप्रमाणात भाारतात गुंतवणुक केली आहे. यासाठीचे लागत मुल्य ५९० कोटी रुपये ठरविण्यात आले आहे.

भारतातील इलेक्ट्रोनिक हार्डवेअर वस्तूंचे उत्पादन सन २०२० पर्यंत १०४ युएेस $ होण्याची शक्यता आहे. तर २०१३ साली भारतातील इलेक्ट्रोनिक

भारतातील एकुण उत्पादनांत इलेक्ट्रानिक वस्तुंचा किंवा मालाचा सहभाग - वर्ष २०१३ मध्ये एकुण उत्पादनात संदेशवहन आणि प्रसारण अवजारे, यंत्रे यांच्या एकुण उत्पादनात ३१ टक्के वाटा होता.




उत्पादित वस्तूंच्या एकूण उत्पादनातील ३१% वाटा हा दळणवळण आणि प्रसारण क्षेत्राचा आहे.

१. सरकारी पुढाकार - जर्मनीतील हनोव्हर येथे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार परिषेदत, 'मेक इन इंडीया' धोरणांतर्गत विनियम व्यापार वाढीसाठी सरकार प्रयत्न करणार.

२. नवी दिल्ली स्थित १६० दुतावासांसह आर्थिक वाटाघाटी करुन 'मेक इन इंडिया' धोरणाअंतर्गत व्यापार वृद्धीच्या सिमा वाढविण्यासाठी पुढाकार.

३. राज्यनिहाय उद्योग व व्यापार राज्यमंत्र्यांची 'परदेशी गुंतवणुक आणि मेक इन इंडिया' वाढी साठ बैठक व अभिप्रेरण

४. महाराष्ट्र सरकार तर्फे राज्यभरात २६६ कोटी रुपये गुंतवणुक अभिप्रेत असलेल्या १३० उद्योगांना भुखंड आवंटनाचे प्रस्तावांना मंजुरी

## पुढील वाटचाल :-

भारत सरकारची देशांतर्गत १८० वस्तू उत्पादन करण्याची महत्वाकांशी योजना आहे. यामुळे दीर्घ गुंतवणुकीची आवशकता असणाऱ्या पायाभुत उद्योगांना उदा :- वीज , तेल व नैसर्गिक वायू , वाहन उद्योग ह्यांना मदत होईल आणि ( १.८५ लाख कोटी) (२९.७४ अब्ज युएस $ ) रुपये १.८५ लाख कोटी गुंतवणुकीच्या भांडवली उद्योगांना संजीवनी मिळेल.

देशाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सरकारचा औद्योगिक वसाहती स्मार्ट सिटीज निर्माण करण्यावर भर आहे.या वसाहतींमुळे एकत्रित पद्धतीने व्यवस्थित देखरेख ठेऊन औद्योगिक प्रगतीला पोषक वातावरण निर्माण होईल. तसेच उत्पादन क्षेत्रात आधुनिक पद्धतींचा वापर होईल.

आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन तज्ञ मेकन्सी आणि कंपनीच्या अभ्यास अहवालानुसार भारतीय उत्पादन क्षेत्र २०२५ पर्यंत युएस $ १ लाख कोटींचा टप्पा गाठेल. ह्या वाढीसाठी उद्योगातील तज्ञानुसार उत्पादन

क्षेत्रातल्या युनिटची वाढीव मागणी आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा कमी लागत असलेले उद्योग सुरु करण्यावरचा भर ही प्रमुख कारणे असणार आहेत.

**रोजगार निर्मितीच्या शक्यता :-**

भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी उत्पादन क्षेत्र हा महत्वाचा घटक आहे. देशाच्या औद्यगिक प्रगतीसाठी या क्षेत्राचे महत्व सरकारच्या लक्षात आले आहे आणि त्या अनुषंगाने सरकारने महत्वाची पाऊले उचललेली आहेत. विदेशी कंपन्यांना देशातील उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूक लाभदायक ठरण्यबाबत पूर्ण जाणीव आहे.

ॲसोचॅमच्या अभ्यासानुसार भारतातील उत्पादन क्षेत्र २०१२ - २०१७ दरम्यान ३.२ दशलक्ष लोकांसाठी रोजगार निर्मिती करू शकेल. उत्पादन क्षेत्राशी निगडीत व्यवसायीकांसाठी हे एक आशादायक चित्र आहे . ॲसोचॅमच्या अभ्यासानुसार भारतीय उत्पादन क्षेत्राची गेल्या काही वर्षातील कामगिरी उत्साहवर्धक नसली तरी १२व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत (२०१२-२०१७) गाडी परत रुळावर येईल आणि हे क्षेत्र ३.२ दशलक्ष रोजगार निर्मिती करु शकेल अशी अपेक्षा आहे.

अहवालानुसार११ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी (२००७-२०१२) या क्षेत्राने २८.५% एवढी रोजगार निर्मितीत वाढ केली. ॲसोचॅम अहवाल उद्धृत केल्यास आदीच्या १०.४५ दशलक्ष रोजगार निर्मितीच्या तुलनेत २००७ - २००८ ते २०११-२०१२ याकालावधीत २.९ दशलक्ष आदिक रोजगार निर्मिती झाली.

भारतातील उत्पादन क्षेत्रामध्ये रोजगार निर्मितीत तामिळनाडूचा प्रथम क्रमांक लागतो. तामिळनाडूचे योगदान १४.५% इतके आहे. महाराष्ट्र राज्य दुसऱ्या क्रमांकावर असून त्याचे योगदान १४% आहे तर १०% गुजरातचे आहे.

११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत अशी नोंद करण्यात आली की, उत्पादन क्षेत्रात रोजगार निर्मिती संदर्भात उत्तराखंड राज्याला उच्चांक दिलेला आहे. रोजगार निर्मिती वाढीची गती सर्वाधिक असणाऱ्या राज्यांमध्ये बिहार ७१.८% हिमाचल प्रदेश (७०%) ओडीसा (५४%) आणि महाराष्ट्र (३८.८%) असे प्रमाण आहे.


## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. **व्हर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी)**
₹ ९०/-

२. **तिलक का मुकदमा (हिंदी)**
₹ ३३५/-

३. **राजभाषा (हिंदी)**
₹ १००/-

१. **एक देश एक हृदय (हिंदी)**

२. **उपभोक्ता संरक्षण (हिंदी)**

३. **पऱ्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान**


## आगामी अंक


**मे २०१५**
**'पर्यटन क्षेत्र'**
**या विषयावर असेल.**

**जुन २०१५**
**'पर्यायी (पुरक) औषधे**
**या विषयावर असेल.**

**जुलै २०१५**
**'---------'**
**या विषयावर असेल.**

# उत्पादनावर आधारीत वृध्दी, स्पर्धा आणि आव्हाने

**- अरुप मित्रा**



**प्रत्येक दशकानंतर निर्मिती, उत्पादक क्षेत्राचा केवळ उत्पादकेतील वाढी साठी नव्हे तर इतर संबंधित घटकांच्या (नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक आणि जागतिक पातळीवरील बदलांचा अभ्यास करावयास हवा कारण प्रत्येक दशकांनंतरच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीत जसे बदल घडतात तसेचं बदल ग्राहकांच्या रूची आणि क्रय शक्तीमध्ये ही होत असतात. मुल्य निर्धारणाबरोबर उत्पादन क्षेत्रातील स्पर्धा, जागतिक आव्हानांवर विचार करणे गरजेचे आहे. उत्पादना, स्थिती, लय हा निसर्गाचा नियम आहे त्यासाठी जुने कर विषयक, सेवा शुल्काशी निगडीत बाबींवर विचार करायला हवा तेव्हाचं नवीन समुहांना निर्मिती प्रोत्साहन मिळेल व कौशल्याधारित कामगारांकडून दर्जेदार उत्पादन निर्मिती होऊ शकेल.**

सध्याच्या विकसित देशांचा ऐतिहासिक अनुभव असे दर्शवतो की, औद्योगीकरण हा आर्थिक विकासाचा एक महत्वाचा निर्धारक आहे. झिमाई आणि वेर्स्पागेन (२०११) हे विकसनशील देशांबाबतच्या एका बाबीकडे लक्ष वेधतात की, १९९० पासून उत्पादन क्षेत्र आधी पेक्षा विकासाचा जास्त असा किचकट मार्ग ठरत आहे. त्यांना उत्पादन क्षेत्राचे शिक्षण आणि उत्पन्नातील तफावत यांच्याशी निगडीत महत्वपूर्ण परिणाम ही दिसून आले. डेल्लास आणि कौबी (२०११) हे असा दावा करतात की, श्रमिकतेचा पुरेपुर वापर सुरवातीच्या काळात हे आर्थिक विकासाच्या वृद्धीचे मुख्य कारण होते. अलिकडे उपकरणांमधील गुंतवणुकीद्वारे औद्योगीकरण होत असल्याच्या दाव्यांऐवजी त्यांनी गुंतवणुकीमुळे श्रमिकतेच्या रचनेवर होणाऱ्या परिणामांवर भर देतानां, विकसनशील देशात रोजगारावर आधारीत औद्योगीकरणाची धोरणे ही यशाची गुरुकिल्ली ठरु शकतात असे सुचिवले आहे.

जागतिकीकरणाने देशांना विकासाच्या वृद्धीकडे लक्ष द्यायला भाग पाडले आहे. विकासासाठी खुला व्यापार, परकीय गुंतवणुकीचा ओघ, भांडवलाची गतिमानता, तंत्रज्ञानाचे हस्तांतरण अशी धोरणे मोठ्या प्रमाणावर अवलंबली गेली. तंत्रज्ञान हस्तांतरणाच्या बाजूने साधारणत: अशी सबब दिली जाते की, जर देशांना किंमतीच्या दृष्टीने कार्यक्षम व्हायचे असल्यास त्यांनी याआधी टाकलेले पाऊल पुन्हा टाकण्याची गरज नाही. पण औद्योगिक क्षेत्रातील अडखळत्या रोजगार वाढीमागे मांडले जाणारे गृहीतक विदेशातून आयात केलेल्या भांडवल सधन तंत्रज्ञानाशी संबंधित आहे. नविन तंत्रज्ञानाची आयात ही मुख्यत्वे भांडवल आणि कुशलता केंद्रीत असल्यामुळे त्याची परिणिती कमी कुशल कामगारांच्या ऐवजी कुशल कामगारांच्या मागणीत वाढ होण्यात होते.

आणखी एक चर्चा ही श्रमिकांच्या बाजारपेठेवरील नियंत्रणाच्या भोवताली आहे. धोरण विश्वात असे मानले जाते की, भारतातील कामगार कायदे हे कालबाह्य आणि कामगारांच्या बाजूने आहेत ज्यामुळे श्रमिकांना सामावून घेण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. श्रमिकांच्या बाजारपेठेच्या लवचिकते अभावी आर्थिक विकास आणि रोजगार निर्मितीला म्हणावी तशी चालना मिळू शकत नाही असे मानले जाते. आर्थिक सुधारणांचे पुरस्कर्ते श्रमिकांच्या बाजारापेठेवरील नियंत्रण काढून टाकण्यावर भर देतात. कारण जागतिकीकरण आणि उत्पादन उपक्रमातील बदल यांमुळे श्रमिकांच्या बाजारपेठेत वेतन आणि कामगार उत्पादकता अशा घटकांवर परिणाम होत असतो. दुसरी आणि महत्वाची बाब म्हणजे व्यापारा सारख्या इतर क्षेत्रातील

सुधारणांमध्ये यशस्वी होण्यासाठी श्रमिकांच्या बाजारपेठेतील सुधारणा ही पुर्वावश्यकता मानली जाते. तज्ञ असे मानतात की, विकसनशील देशातील श्रमिकांच्या बाजारपेठा या कार्य पद्धती, वेतन, भरती आणि कामावरुन काढून टाकण्याची धोरणे अशा बाबींबाबत फार ताठर असतात आणि यामागे अस्तित्वात असलेले कायदे कारणीभूत मानले जातात(फालोन आणि लुकास,१९९१). पण जमिनीची उपलब्धता, पायाभूत सुविधा, कुशल कामगार अशा गोष्टीही गुंतवणूकीवर परिणाम करीत असतातचं.

तिसरा चर्चेचा मुद्दा हा खासकरुन पुरवठ्याच्या बाबत असलेला कुशलतेचा अभाव जो कामगार क्षेत्रातील विविध स्तरात असलेल्या कमी रोजगाराभिमुखते बाबत लक्ष्य वेधतो. कुशल मन्यष्यबळाच्या अभावामुळे अनेकांना उरलेल्या कमी उत्पादन क्षमतेच्या कामात सहभागी व्हावे लागते.[२] त्यामुळे धोरणाच्या दृष्टीने रोजगाराभिमुखतेत सुधारणा ही महत्वाची बाब आहे. यासाठी कौशल्य निर्मिती ही महत्वाची पुर्वावश्यकता असून ती चांगल्या दर्जाचे शिक्षण उपलब्ध करुन आणि कौशल्य निर्मितीचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये सहभागा द्वारे ते मिळवता येऊ शकते. पण अशा तंत्रविषयक संस्था खासकरुन ज्या पदविका उपलब्ध करतात त्या फार कमी आहेत त्यामुळे सरकारचा पुढाकार आवश्यक आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या बाबत जास्त मेहनतीची गरज आहे. याबरोबरच नोकरीतच संबंधित प्रशिक्षण हा ही कौशल्याची तफावत दूर करण्याचा एक पर्याय आहे.

विविध प्रकारची कौशल्ये आणि पात्रता असलेल्या लोकसंख्येच्या मोठ्या भागासाठी भारताला आगामी दशकात रोजगार निर्मिती करायची आहे ही बाब लक्षात घेतल्यास उत्पादन क्षेत्र हे रोजगार निर्मितीचे इंजिन असेल असे मानले जात आहे. रोजगाराच्या आवश्यकते बरोबरच उत्पादन क्षेत्र हे शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीनेही भारतासाठी आवश्यक आहे. त्यामुळेच भारतीय उत्पादन क्षेत्राचा विकास होऊन खऱ्या अर्थाने त्याची क्षमता दिसून यावी यादृष्टीने औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन (डीआयपीपी) विभाग, वाणिज्य आणि औद्योगिक मंत्रालयाने उत्पादन क्षेत्राच्या जलद वाढीला पोषक ठरतील असे धोरणात्मक वातावरण निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. वर म्हटल्या प्रमाणे रोजगाराभिमुख औद्योगिक धोरणाचे महत्व लक्षात घेऊन आणि भारताला संघटीत/औपचारीक उत्पादन क्षेत्रात मोठ्याप्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यात आलेले अपयश लक्षात घेतल्यास राष्ट्रीय उत्पादन धोरण ही दिलासा देणारी बाब ठरली आहे.

जागतिक मंदी आणि रोजगराच्या संधी या मध्ये झालेली मोठ्या प्रमाणावरील घट लक्षात घेऊन वेळीच सुधारणात्मक उपाय केले नाहीत तर भारताची परिस्थिती बिकट होऊ शकते. यादृष्टीकोनातुनच राष्ट्रीय उत्पादन धोरण (एनएमपी) १०० दशलक्षापेक्षाही जास्त रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे आणि दशक भरात सकल राष्ट्रीय उत्पदनात एकूण २५% योगदान देण्याचे लक्ष्य ठेवते. घसरती मागणी आणि भांडवलाची वाढती किंमत लक्षात घेता धोरण विश्वातील तज्ञांच्या मते यामुळे भारतीय उत्पादन क्षेत्राचा चेहरामोहरा बदलू शकतो आणि अर्थव्यवस्थेचा सर्वंकश कायापालट होऊ शकतो. सदर धोरण यासंबंधातील वातावरण आणि नियमनात्मक बाबी, कामगार कायदे आणि कर आकारणी बाबत भाष्य करतेच पण त्याबरोबरच राष्ट्रीय उत्पादन गुंतवणूक क्षेत्र वा सामुहीक उत्पादन क्षेत्राची प्रस्तावीत निर्मिती ही औद्योगिक पायभूत सोयींसुविधांचे एकत्रीकरण आणि यामुळे परिमाणानुसारी मितव्यय लाभ साध्य करणे शक्य होणार आहे. राष्ट्रीय उत्पादन गुंतवणुक क्षेत्र ही जागतिक दर्जाच्या पायाभुत सुविधा असलेल्या एकात्मिक औद्योगिक वसाहती असतील आणि त्यात क्षेत्रानूसार जमिनीचा वापर, स्वच्छ आणि उर्जानुकुल तंत्रज्ञान वापरलेले असेल. सदर वसाहती या अकृषीक जमिनीवर असतील ज्याची मालकी सरकारकडे असेल आणि जेथे मुबलक पाणी उपलब्ध असेल. सदर धोरण मालकांना नेमणुका आणि बडतर्फी बाबत जास्त अधिकार देऊन श्रमिकांच्या बाजारपेठेत लवचिकता आणण्याचे लक्ष ठेवते. आजारी उद्योगांनाही बाहेर पडण्यासाठी सोपा मार्गही यात उपलब्ध करण्यात आला आहे. पण त्याचबरोबर कामगारांच्या हक्कांवरही यात भर देण्यात आला असून लवचिकतेच्या नावाखाली

---

१ असा दावा केला जातो की जर असे मानले की गरीब देशात श्रिमंत देशांच्या पेक्षा नाविन्यतेचा खर्च जास्त असतो असे मानल्यास विकसनशील देशात (फ्रंटीअर नेशन्स) संशोधन आणि विकसावर कमी परतावा मिळतो. त्यामुळे उशिरा आलेल्या देशाला इतर देशांनी शोध लावलेल्या तंत्रज्ञानाचा शोध पुन्हा लावण्यापेक्षा ती विकत घेणे स्वस्त असते पण आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान काही स्वस्त नसते याची नोंद घेणे आवश्यक आहे.

२ २२ एप्रिल, २०१३ चा टाईम्स ऑफ इंडिया पहा

त्याच्याबरोबर तडजोड होण्याचा धोका असतो.

उत्पादन धोरणाचे महत्वाचे वैशिष्ठ्य म्हणजे लघु आणि मध्यम उद्योगांना देण्यात आलेले आर्थिक आणि विकासात्मक प्रोत्साहन. एकुणच तसे बघितले तर सदर धोरण सकल राष्ट्रीय उत्पादनात उत्पादन क्षेत्राचे योगदान २५% नेण्याचे आश्वासन देते जे सध्या १६% टक्के आहे. पण औद्योगिक रोजगार अनपेक्षित अशा पातळीवर नेण्याचे राष्ट्रीय उत्पादन धोरणाचे लक्ष्य मात्र कदाचित साध्य होऊ शकणार नाही कारण संघटीत रोजगाराचे उत्पादन क्षेत्रातील एकूण रोजगारातील प्रमाण अत्यल्प आहे.

त्यामुळे उत्पादनातील असंघटीत रोजगाराची क्षमता लक्षात घेतांना या क्षेत्रात चांगल्या दर्जाची रोजगार निर्मिती करणे फायदेशीर ठरु शकते. लघु आणि मध्यम उद्योगांनी कार्यक्षमतेचे प्रमाण, तंत्रज्ञान, वित्तपुरवठा आणि कामगारांच्या कौशल्याच्या आधुनिकतेचे मार्ग यात अनोखी क्रांती आणण्याची गरज आहे. अन्न प्रक्रीया, तयार कपडे आणि वस्त्रोद्योग, चामडे आणि पादत्राणे अशा कामगार श्रमिक केंद्रीत क्षेत्राचे लघु आणि मध्यम उद्योगामध्ये एकुण रोजगारात ६०% प्रमाण आहे(कांट,२०१३). या क्षेत्रांवर भर दिला गेल्यास अतिरिक्त अकुशल श्रमिक शक्तीला उत्पादनतेने सामावून घेणे शक्य होऊ शकेल. धोरणात्मक पुढाकार घेताना श्रमिक केंद्रीत उत्पादनावर अवलंबून अशा अकुशल श्रमिक शक्ती आणि दुर्लक्षित अशा औद्योगिकरणाला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे.

पायाभुत सुविधांची कमतरता, उर्जेच्या मर्यादा, निर्यातीतील अडखळती वाढ, निर्यातक्षम श्रमिक केंद्रीत उत्पादनांची खराब कामगिरी, योग्य तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी आवश्यक नविन कल्पनांचा अभाव आणि नोकरशाहीतील लवचिकतेचा अभाव ज्यामुळे विकास वा रोजगार वा परकीय गुंतवणुक आकर्षित करण्यावर परिणाम होतो या बाबतच्या समस्याही महत्वाच्या आहेत.

आर्थिक विकासात वृद्धी होण्यासाठी निर्यातीलाही प्रचंड महत्व आहे. परकीय चलन वाढवण्याचे आणि त्याचबरोबर स्वदेशात उत्पादीत मालाची मागणी वाढवण्याचे दुहेरी लक्ष्य निर्यातीत वाढ करुन साध्य करता येऊ शकते. सेवा क्षेत्रातील निर्यातीने अकुशल श्रमिक शक्तीसाठी रोजगार निर्मितीत उल्लेखनीय भर पडू शकत नाही(मित्रा २०११). त्यामुळे उत्पादीत मालाच्या निर्याती द्वारेच सर्वंकश विकास साध्य करता येऊ शकतो.

खासकरुन श्रमिक केंद्रीत उत्पादनांच्या आयातीद्वारे अशा मालाचे उत्पादन वाढवून श्रमिकांना रोजगार उपलब्ध करुन देऊन त्यांचे कृषी क्षेत्रातून उत्पादन क्षेत्रात स्थानांतरण होऊ शकते. कुशलतेचा अभाव असल्यामुळे उच्च उत्पादन क्षेत्रात श्रमिकांचे स्थानांतरण करता येण्याची शक्यता कमी आहे. तर दुसरीकडे जोपर्यंत उत्पादन क्षेत्रात श्रमिक शक्तीला सामावुन घेणयाच्या प्रक्रीयेला मालाच्या वाढत्या मागणीची जोड मिळत नाही तोपर्यंत वेतनाच्या उत्पनात वाढ होऊ शकणार नाही. यापुढील उच्च उत्पन्नासहित रोजगारातील वाढ ही उत्पादकता समांतरपणे वाढल्यावरच शक्य होईल. या दृष्टीने भांडवल स्तरातील सुधारणा आणि तंत्रज्ञानातील प्रगती आवश्यक आहे. साधारणत: असे मानले जाते की तंत्रज्ञानातील प्रगती ही भांडवल केंद्रीत असल्याने श्रमिक शक्तीला सामावण्याची क्षमता कमी होते. अभ्यासात हे सिद्ध झाले आहे की नविन कल्पनांची परिणती उत्पादन क्षेत्राच्या सर्व प्रक्रियांमध्ये भांडवलाच्या केंद्रीकरणात होते असे नाही (विवारेली,२०११). यामुळे काही क्षेत्रात जरी रोजगार कमी झाला तरी इतर पातळ्यांवर तो वाढण्याची शक्यता असते. यापलीकडे, नवीन तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर लागू करता येते आणि अनेक नविन युनिट्सची सुरवात होऊन मोठ्या स्तरावर उत्पादनाच्यापातळीत वाढ होऊ शकते.

आणखी एक मुद्दा उच्च मुल्याच्या उत्पादनांच्या निर्याती बाबत आहे. अनेक उच्च मूल्य उत्पादने ही कामगार केंद्रीत आहेत. अशा गोष्टींच्या उत्पादनाची पातळी जास्त किंमत असल्यामुळे कमी असते. पण विकसित देशांच्या बाजारपेठेत अशा उत्पादनांची विक्री क्षमता जास्त असते. पाश्चात्य आवडी आणि गरजांनुसार तयार वस्तुंच्या उत्पादनासाठी पुढाकार घेतल्यास उच्च मूल्य वस्तुंची निर्यात वाढून त्याचा रोजगार आणि परकीय चलनाच्या कमाईवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

३ डब्ल्युटीओ इश्युज कंसर्निंग इंडिया : http://www.slideshare.net/yashshah007/wto-issues-concerning-india
http://www.slideshare.net/yashshah007/wto-issues-concerning-india

२०१३-१४ दरम्यान भारताच्या निर्यातीतील महत्वाच्या विक्रेय वस्तु पुढील प्रमाणे आहेत: उत्पादीत वस्तु (६३.७%), खनिज तेल, नैसर्गिक तेल आणि उत्पादने (२०.१%), शेती आणि त्यावर अवलंबून उत्पादने (१३.८%), कोळसा वगळता इतर धातु आणि खनिजे (१.८%) (आर्थिक सर्वेक्षण २०१३-१४). भारतात उत्पादीत झालेल्या वस्तूंचे जागतिक निर्यातीत एकूण प्रमाण हे अत्यल्प आहे आणि अनेक देशांपासून इथे धोका आहे. उदा. भारतातुन होणाऱ्या कपड्यांच्या निर्यातीला बांग्लादेशातील स्पर्धात्मक निर्याती कडून आव्हान आहे. कापसापासून होणाऱ्या उत्पादनांने ज्यांचा भारताच्या आयातीत महत्वाचा वाटा आहे आणि याबाबतीत भारताला स्पर्धात्मक फायदा आहे असे मानले जाते तेथेही चीन आणि बांगलादेश कडून टॉवेल आणि टेबलाशी संबंधित उत्पादने सोडल्यास या उत्पादनांना धोका आहे (वर्मा,२००२).

१९९० च्या दरम्यान भारतातील प्रशुल्कांची रचना ही किचकट होती. १९९१-९२ मध्ये प्रशुल्क १२८% होते ते २००५ च्या अंतरीम अर्थसंकल्पात २२.४% पर्यंत कमी झाले. या काळात सरासरी भारीत करांचे दर ७२.५% वरुन १८.२% पर्यंत कमी झाले. जरी सरासरी करांचे दर घसरले असले तरी दुसरीकडे अनेक प्रशुल्क २००४-०५ दरम्यान शुन्य ते १५०% एवढे चालू राहीले. २००४-०५ दरम्यान १००% वा जास्त दर असलेले उत्पादनाचे गट हे कॉफी, चहा, मद्यपेये, अर्क, अत्तरे, साखरेचे पदार्थ, द्राक्ष आणि रस, मोटर गाड्या आणि मोटर सायकल हे होते. ५०% ते १००% च्या पातळीत खाण्याची तेल, गहू, तांदुळ आणि इतर कृषीजन्य पदार्थ होते. निर्यात प्रशुक्लाची प्रभावी पातळी अजुन खाली आली. २०१० मध्ये विद्युत निर्मिती उपकरणे, विद्युत उत्पादने आणि वाहतुकीच्या गोष्टी अशा उत्पादनांच्या गटासांठी प्रशुल्काची अत्युच्च पातळी १०% होती आणि सर्वाधिक प्राधान्य असलेल्या देशांसाठीची प्रशुल्क रुपरेखा ही इतर देशांशी तुलना करण्यासारखी होती. तरीही भारताच्या अकृषीक प्रशुल्कात अनेक त्रुटी राहील्या आहेत(होंडा आणि रे, २०१४). भारतीय निर्यातदारांना पत संबंधित पत्र, आगाऊ भरणा केला असल्याच्या पुराव्याची प्रत, अर्जाची छापिल प्रत, परदेशात पैसे आवक केल्याचे प्रमाणपत्र अशी अनेक कागदपत्रे सरकारी कार्यलयात द्यावी लागतात आणि त्याचबरोबर तेथे अनेक वेळा भेट द्यावी लागते जे त्यांच्यासाठी मोठे आव्हान आहे. (शर्मा,२०१४).

मुल्यकपात विरोधी कृती मुळे भारताच्या व्यापाराचे नुकसान झाले आहे: जानेवारी १९९५ ते जून २०१० दरम्यान भारताविरोधात घेण्यात आलेल्या एकूण मुल्याकपात विरोधी ९० निर्णयांपैकी २२ ही रसायन, १९ प्लॅस्टीक, ११ वस्त्रोद्योगाबाबत आणि २६ ही धातु उत्पादनांबाबत (मुख्यत्वे लोखंड आणि स्टील) होती आणि ही अशी क्षेत्रे आहेत ज्यात भारताने जास्त स्पर्धात्मक लाभ मिळवला आहे (ट्रेड पॉलिसी रिव्ह्यु रिपोर्ट बाय इंडिया, २०११).

२००९-१४ साठीचे विदेश वाणिज्य धोरण २००९ मध्ये जाहीर केले गेले जेंव्हा निर्यातीत जागतिक स्तरावर मंदी होती (ट्रेड पॉलिसी रिव्ह्यु रिपोर्ट बाय इंडिया,२०११). २०२० पर्यंत जागतिक व्यापारातील भारताचा वाटा दुप्पट करण्याचे दिर्घकालीन धोरणात्मक ध्येय यात होते ज्यासाठी रोजगार केंद्रीत वस्त्रोद्योग, चामडे, हस्तकला अशा क्षेत्रांवर भर आहे. यासाठी चांगल्या दर्जाची विविध प्रकारची उत्पादने उत्पादीत होणे गरजचे आहे. निर्यातीसाठी नविन स्थळे शोधणे आवश्यक आहे कारण भारतीय व्यापाराची दिशात्मक रचना २००७-०८ पासून काही विशेष बदलेली नाही आणि १५ व्यापाराच्या रचना एकूण व्यापारातील ६०% वाट्यासाठी कारणीभूत आहेत.

उच्च व्यवहार खर्च आणि व्यापाराच्या व्यवहारातील लागणाऱ्या वेळेबाबतच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी व्यवहार खर्चांवरील कृतिदल २००९ मध्ये नेमण्यात आले. सदर कृतिदलाने व्यवहार खर्च कमी करण्यासाठी एकूण ४४ मुद्दे समोर आणले ज्यातील एकूण २१ समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे (ट्रेड पॉलिसी रिव्ह्यु रिपोर्ट बाय इंडिया, २०११).

सर्वंकश आर्थिक विकास दर वाढवण्याच्या दृष्टीने निर्यातक्षम उद्योगांमध्ये वा खासकरुन एकूण निर्यातीत वाढ करुन एकूण घटक उत्पादकतेत महत्वपूर्ण वाढ होणे गरजेचे आहे. एकूण घटक उत्पादकते शिवाय भारताच्या उत्पादनांची स्पर्धात्मकता वाढू शकणार नाही. एकूण घटक उत्पादकतेसाठी महत्वाचे घटक हे पायाभूत सुविधा(भौतिक, वित्तीय आणि सामाजिक), आणि व्यापारातील खुलेपणा हे आहेत. माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानाला युनिट्सची उपलब्धता खासकरुन लघु आणि मध्यम क्षेत्रात मिळू शकल्यास घटक उत्पादकतेत आणि एकूण घटक उत्पादकतेत वाढ होऊ शकेल.

एकत्रीतपणे होणाऱ्या लाभांचा फायदा घेऊन भारतीय उत्पादनांची स्पर्धात्मकता वाढवता येऊ शकेल. संचित लाभ अनेक वेळा कंपन्यांसाठी उत्पादकतेच्या बाबतीत प्रोत्साहनपर ठरतात आणि म्हणून उत्पादन कार्यांचे समुह निर्माण करण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. जेंव्हा केंद्रीत झालेली जुनी क्षेत्रे संतृप्ती बिंदूवर पोहोचतात तेंव्हा नविन समुह निर्माण होणे आवश्यक आहे ज्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक हा कळीचा मुद्दा आहे. खासकरुन जेथे शहरीकरण हे संथ आहे अशा भागात नविन समुहांना वाट मोकळी करुन देण्यासाठी उद्योगधंद्याचा जागेबाबतचा विस्तार बदलणे आवश्यक आहे. अशा नविन प्रकारे किमतीचा फायदा घेता येऊ शकतो. एकुण भारतीय उत्पादन निर्याती समोर आव्हाने अनुल्लंघनीय आहेत पण सर्वकंश विकास हवा असेल तर भारतापुढे दुसरा पर्याय नाही. उत्पादनावर आधारीत विकास हाच प्रमुख मार्ग असुन त्याबदल्यात उत्पादनांच्या निर्याती द्वारे यात सुधार करता येऊ शकतो.

**संदर्भ :**


देल्लास, हॅरीस आणि कॉबी, व्हॅली, २००१. ''इंडस्ट्रीअल एंप्लॉयमेंट, इंव्हेसमेंट इक्विपमेंट, आणि इकॉनॉमिक ग्रोथ,'' इकॉनॉमिक डेव्हलपमेंट एँड कल्चरल चेंज, युन्हीवर्सिटी ऑफ शिकागो प्रेस, वॉल. ४९ (४), पान ८६७.८१, जुलै

फाल्लॉन, पी.आर आणि लुकास, आर.ई.भ. (१९९१). द इंपॅक्ट ऑफ चेंजेस इन जॉब सिक्युरिटी रेग्युलेशन्स इन इंडिया एँड झिंबाब्वे, द वर्ल्ड इकॉनॉमिक रिव्ह्यु, ५(३), ३९५-४१३

हसन, आर.(२००३). द इंपॅक्ट ऑफ ट्रेड एँड लेबर मार्केट रेग्युलेशन्स ऑन एंप्लॉयमेंट आण वेजेस:एव्हिडन्स फ्रॉम डेव्हलपिंग कंट्रीज. आर. हसन आणि डी. मित्रा (सं.), द इंपॅक्ट ऑफ ट्रेड न

लेबर: इश्युज, पर्स्पेक्टीव्हज आणि एक्सपिरिअन्सेस फ्रॉम डेव्हलपिंग एशिया. ॲमस्टरडॅम नॉर्थ हॉलंड, एल्सविअर

होडा, अ. आणि डी.के.राय (२०१४), ट्रेड आणि इंव्हेसमेंट बॅरीअर्स ॲफेक्टींग इंटरनॅशनल प्रॉडक्शन नेटवर्क्स इन इंडीया, आयसीआरआयइर वर्कींग पेपर न.२८१.

कांत, अमिताभ (२०१३), फॉर अ मॅनिफॅक्चरींग रिव्हॉल्युशन, द टाइम्स ऑफ इंडिया, ११ जुलै.

मित्रा, ए. (२०११) ट्रेड इन सर्विसेस:इंपॅक्ट ऑन एंप्लॉयमेंट इंन इंडिया, द सोशल सायंस जर्नल, व्हॉल.४८(१), पीपी, ७२-९३

मित्रा, अरुप (२०१३), ''कॅन इंडस्ट्री बी द की टू प्रो-पुअर ग्रोथ? ॲन एक्सप्लोरॅटरी ॲनालिसिस फॉर इंडिया, आएलओ-एशिया पॅसिफिक वर्किंग पेपर, डिसेंबर

शर्मा, एस.एन, (२०१४), ''टन्स ऑफ प्रॉब्लेम्स हॅंपर ग्रोथ ऑफ इंडियाझ एक्सपोर्टर्स;रिसेंट रिफॉर्म्स ऑन्ली बेबी स्टेप्स, इटी ब्युरो, २ फेब्रुअरी.

झिमाई, ए आणि बी. वेर्स्पागेन(२०११), मॅन्युफॅक्चरींग एँड इकॉनॉमिक ग्रोथ इन डेव्हलपिंग कंट्रीज, युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटी, युएनयु-मेरीट, वर्कींग पेपर सिरीज, २०११-०६९

ट्रेड पॉलिसी रिव्ह्यु रिपॉर्ट बाय इंडीया, वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशम, ट्रेड पॉलिसी रिव्ह्यु बॉडी, टीपीआर/ जी/२४९, ऑगस्ट १०.

युएनआयडीओ, २००५, प्रॉडक्टीव्हीटी इन डेवलपिंग कंट्रीज:ट्रेंड्स एँड पॉलिसीक.व्हिएना:युनायटेड नैसन्स इंडस्ट्रीअल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन

वर्मा, समर (२००२), ''एक्सपोर्ट कॉंपिटिटीव्हनेस ऑफ इंडीयन टेक्सटाइल एँड गार्मेंट इंडस्ट्री, आयसीआरआयइआर वर्कींग पेपर,९४, नोव्हेंबर

विव्हरेली, एम. (२०१३), टेक्नॉलॉजी, एंप्लॉयमेंट एँड स्किल्स: ॲन इंटरप्रिटेटीव्ह फ्रेमवर्क. युरेशियन बिझनेस रिव्ह्यु, ३. पीपी ६६-८९

वुड, ए. (१९९७). ऑपननेस एँड वेज इनएक्वॅलिटी इन डेव्हलपिंग कंट्रीज: द लॅटीन अमेरीकन चॅलेंज टू इस्ट एशियन कंव्हेशनल विस्डम. वर्ल्ड बॅंक रिव्ह्यु, व्हॉल.३३, पीपी ३३-५७



*(**अरुप मित्रा** दिल्ली येथिल आर्थिक वृद्धी संस्थेत अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक असुन त्यांना संख्यात्मक अर्थशास्त्रातील त्यांच्या योगदानाबद्दल महालनोबिस स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहेत. त्यांनी अमेरिकेच्या केलोग येथिल नॉर्थ वेस्टर्न विद्यापिठात प्रा. एडविन एस मिल्स यांच्या बरोबर काम केले आहे.)*

# "मेक इन इंडिया" ची गरज

- कस्तुरी चक्रवर्ती व नितीश मिश्रा



**सामाजिक परिवर्तनांतर्गत विकसनशील अर्थव्यवस्थेला क्षेत्र निहाय अभिवृद्धी चा लेखाजोखा ठेवतांना त्या त्या क्षेत्रांच्या समस्यांचा विचार करुन भविष्यातील मागोवा घ्यावा लागतो. भारताच्या लोकसंख्या लाभांशामध्ये बहुतांश नागरिक हे कार्यक्षम वयोगटात मोडतात त्यामुळे धोरणकर्ते व शासनाला उपरोक्त वर्तमान स्थितीचा अभ्यास करण्याची गरज होती. क्षेत्र निहाय आवश्यक असलेला कामगार वर्ग आणि वाढती बेरोजगारी लक्षात घेऊन जागतिक उदारीकरणाच्या आणि जागतिक स्पर्धेत समाविष्ठ झालेल्या भारताने कौशल्या धारित रोजगार वाढविण्यावर भर दिला यामध्ये उद्योग क्षेत्राने बेरोजगारीची समस्या खुपशा प्रमाणात सोडविली आणि भारतीय उद्योजकांना जागतिक उद्योगांची दालने खुली करुन दिली.**

गेल्या काही वर्षांपासून जेव्हा जगातील बहुतेक विकसित देश आर्थिक मंदीचे परिणाम व सर्वव्यापी कर्ज अरिष्ट यांमधून बाहेर पडण्यासाठी संघर्ष करत होते, तेव्हा भारताची अर्थव्यवस्था मात्र सर्वाधिक गतीने वाढत होती. सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने अलिकडे दि.३१ जानेवारी २०१५ रोजी विमोचित केलेल्या स्थूल देशीय उत्पादनाची परिगणना करण्याच्या नवीन पद्धतीनुसार, आपली अर्थव्यवस्था देश हा जगातील सर्वाधिक गतीने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. तथापि आपण या उपलब्धीवर संतुष्ट राहू शकतो का?.... बहुतेक नाही, कारण या आर्थिक अभिवृद्धीचे लाभ संपूर्ण समाजात वितरित करणे आवश्यक आहे आणि तेथे आपण अजूनही कमी पडत आहोत. अर्थव्यवस्थेचा विकास हा तिने निश्चित केलेल्या अभिवृद्धीच्या दरांवरच अवलंबून असतो असे नाही. त्याही पुढे जाऊन त्या अभिवृद्धीचे आकडे समाजाच्या खालच्या स्तरांपर्यंत कितपत पोचले आहेत यावरही आर्थिक विकासाचा दर अवलंबून आहे.

भारत हा असा देश आहे की, ज्याने गेल्या काही दशकांपासून सेवा क्षेत्रातील स्थूल देशीय उत्पादनाच्या अभिवृद्धीचा अनुभव घेतला आहे, तथापि सेवा क्षेत्रातील अभिवृद्धीचा परिणाम मोठ्या प्रमाणात बेरोजगारीवर झाला, त्यामुळे बेरोजगारांची संख्या वाढली. भारताचा लोकसंख्या लाभांश अशा प्रकारचा आहे की ज्यात बहुसंख्य नागरिक हे कार्यक्षम वयोगटात मोडतात. त्यामुळे शासन व धोरणकर्ते यांनी आर्थिक अभिवृद्धीचा पुनर्विचार व त्यातील दोषांचा बारकाईने अभ्यास करण्यास सुरुवात केली आहे. भारतातील वस्तुनिर्माण क्षेत्राची भूमिका व महत्त्व दोन बाबतीत आहे, एक स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था निर्माण करणे व दुसरे अत्यावश्यक रोजगार निर्मितीची प्रक्रिया.

## सैद्धांतिक दृष्टिकोन

अभिवृद्धीचे टप्पे व पाठोपाठ विकासाच्या मार्गाने येणारी अर्थव्यवस्था यांचे ढोबळ मानाने तीन टप्प्यात वर्गीकरण करता येते असे इतिहासात मानले गेले आहे. पहिला टप्पा म्हणजे कृषिविषयक क्रियाकलापांमध्ये गुंतलेल्या कामगार वर्गाची बहुसंख्या असलेला पारंपरिक समाज, दुसरा टप्पा म्हणजे अभिवृद्धीची व्याख्या करणारे वस्तुनिर्मिती क्षेत्राचे नेतृत्व असलेला औद्योगिकीकरणाचा टप्पा व तिसरा टप्पा म्हणजे आपापल्या सेवा क्षेत्रांच्या अभिवृद्धीमुळे पुढे गेलेल्या विकसित अर्थव्यवस्था. आज ज्याला आपण विकसित विश्व म्हणतो त्यामध्ये, मुख्यत: संयुक्त संस्थाने, ब्रिटन व जर्मनी ह्या देशात अभिवृद्धीचा हाच आकृतीबंध अनुसरण्यात येत आहे. दक्षिण कोरिया, चीन, तैवान व व्हिएतनाम यांसारख्या

उदयोन्मुख आशियायी व आग्नेय आशियायी बाजार अर्थव्यवस्थादेखील आज अशाच प्रकारची अभिवृद्धी करत आहेत.

### भारतात वस्तुनिर्माणाची गरज कशासाठी आहे?

### भारतातील क्षेत्रीय अभिवृद्धीचा आकृतीबंध

भारताने पारंपरिक अभिवृद्धी सिद्धांतांपासून फारकत घेऊन स्वत:चा एक वेगळा अभिवृद्धीचा मार्ग स्वीकारला आहे. योजना काळातील अभिवृद्धीचे दर सतत वाढत राहिले आहेत, त्यामध्ये फारच कमी व तात्कालिक चढउतार झाले. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही वर्षांत कृषी विभागाने भारताच्या स्थूल देशीय उत्पादामध्ये पन्नास टक्क्यांहून अधिक अंशदान दिले. सेवा क्षेत्राने सुमारे तीस टक्के तर औद्योगिक क्षेत्राने वीस टक्के स्थुल देशीय उत्पादानामध्ये अंशदान दिले. इ.स.१९९० पासून अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रातील अभिवृद्धीकडे झुकल्यानंतर क्षेत्रीय वितरणात मोठा बदल घडून आला.

कृषी क्षेत्राचे अंशदान सतत खाली घसरत असून सेवा क्षेत्र मात्र झपाट्याने वाढत जाऊन अलिकडच्या काळात जीडीपीच्या साठ टक्क्यांपर्यंत आले आहे. भारतातील अभिवृद्धीचा मार्ग वेगळा आहे. कृषी क्षेत्रावरून स्थूल देशीय उत्पादाचा प्रमुख अंशदाता पूर्वी कृषी क्षेत्र होते. त्याचे स्थान (औद्योगिक क्षेत्राच्या प्रभुत्वाचा टप्पा वगळून) थेट सेवा क्षेत्रला घेणे हे भारताचे इतर विकसित देशापासूनचे वेगळेपण आहे. इ.स. १९५१ ते २०१४ पर्यंत एकूण जीडीपीमधील औद्योगिक क्षेत्राच्या अंशदानामध्ये कमीतकमी बदल झाला आहे व तो केवळ १६ ते २६ टक्के ह्या मर्यादेत राहिला आहे. औद्योगिक क्षेत्रातील हा पायंडा अनेकांच्या काळजीचा विषय बनला आहे. कारण उद्योग आणि वस्तूनिर्माण हे वस्तूंचे उत्पादन व रोजगारनिर्मिती या दोन्ही बाबतीत अर्थव्यवस्थेच्या वास्तविक अभिवृद्धीचा पाया आहेत. अभिवृद्धीचा परिणाम आणि जीडीपीच्या क्षेत्रीय अंशदानांमधील बदल जाणून घेण्यासाठी आपल्याला रोजगार-बेरोजगारीच्या चित्राकडे नजर टाकली पाहिजे. कारण समाजाच्या सर्व भागांपर्यंत आर्थिक अभिवृद्धीचे चांगले परिणाम पोहचत आहेत याची खातरजमा करण्याचा तो एक अत्यावश्यक मार्ग आहे.

### बेरोजगारीचे चित्र

इकोनोमिक सर्वे २०१४-१५

भारतातील बेरोजगारीचे चित्र अजूनही गंभीरच आहे. शिवाय कृषी क्षेत्र ज्यामधून सध्या जीडीपीमध्ये केवळ १४ टक्के अंशदान दिले जाते आणि ज्यामध्ये पन्नास टक्क्यांहून अधिक कामगारांना रोजगार मिळालेला आहे, त्यामधून आपल्या देशातील मोठ्या प्रमाणातील छुपा कामगार वर्ग व कामगारांची निम्नउत्पादकता त्यात प्रतिबिंबित होतात. जीडीपीमध्ये साठ टक्के अंशदान देणारे सेवा क्षेत्र हे केवळ २५ टक्के कामगारांना रोजगार पुरवते.

### सेवेतून होणारी अभिवृद्धी

सेवा क्षेत्रात भारताला तुलनात्मकदृष्ट्या नैसर्गिक लाभ आहेत. ज्याचे वर्णन श्री. भगवती यांनी ''विकेंद्रीत यशस्वीता आणि मार्गक्रमण'' असा केला आहे, या संकल्पनेनुसार अर्थव्यवस्था परिपक्व होताच निरनिराळे उद्योग आपले कायदेविषयक व सुरक्षा सेवा संशोधन व विकास इत्यादी क्रियाकलाप त्यातील तज्ज्ञ व्यक्तींमार्फत करून घेतात यामधून जीडीपीमधील सेवा क्षेत्राची वाढ होत जाते. त्याशिवाय भारतात माहिती-तंत्रज्ञान-सक्षम सेवेसाठी योग्य असे मनुष्यबळ कमी किमतीत उपलब्ध आहे, तेही सेवा क्षेत्रासाठी लाभदायक आहे. परकीय कंपन्या त्यांची बॅक ऑफिसेस आपल्या देशात उघडतात आणि भारतीय कंपन्यांकडून सेवा घेतात शिवाय दर डोई उत्पन्नाच्या पातळीत वाढ झाल्यामुळे आता शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय सेवा, संवादन यांसारख्या सेवा क्षेत्रांवर अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

### क्षेत्रीय रोजगार आकृतीबंधातील बदल

भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगार रचना ही विभिन्न क्षेत्रांच्या अंशदानांना अनुसरून बदलेली नाही. जीडीपीमधील क्षेत्रीय अंशदानाचे आणि संबंधित काळातील क्षेत्रीय रोजगार आकृतीबंधाचे हे विश्लेषण आपल्याला अशा मुद्द्यावर घेऊन येते की भारताच्या विकासातील सेवेतून अभिवृद्धीच्या मार्गामुळे अभिवृद्धीचा वेग वाढला असला, तरी ती रोजगार निर्माण न करणारी अभिवृद्धी आहे. त्याने समान विकासाचे उत्तुंग ध्येय साध्य झाले नाही.

आतापर्यंत आपला दृष्टिकोन बाजारनिर्धारित सेवा क्षेत्राने झालेल्या अभिवृद्धीवर भर देण्याचा होता. परंतु आता आपण वस्तुनिर्माण क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी राज्याने हस्तक्षेप करण्याची गरज लक्षात घेतली पाहिजे. अभिवृद्धीमधून होणाऱ्या असमान लाभांमधील विसंगती

दूर करण्याचा हाच मार्ग आहे.

### वस्तुनिर्माण क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्याची गरज

भारतातील लोकसंख्या व मागणीचे आकृतीबंध रेखीव आहेत. भारताच्या माननीय पंतप्रधानांनी नुकतेच असे विधान केले की लोकसंख्या, मागणी व लोकसंख्याशास्त्र ह्या तीनही बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण असलेले भारत हे एकमेव राष्ट्र आहे. येथे देशांतर्गत ग्राहकांचा खूप मोठा भरणा आहे. दरडोई उत्पन्नात चांगली वाढ झाल्यामुळे मागण्या योग्य प्रमाणात प्रलंबित होत आहेत. पुरवठा बाजुबद्दल बोलायचे झाले तर भारतातील अर्थशास्त्रीयदृष्ट्या सक्रीय लोकसंख्या १९९१ ते २०१३ या काळात ५७.७ टक्क्यांवरून ६३.३ टक्क्यांपर्यंत गेल्यामुळे (इको सर्व्हे २०१४-१५), भारताची मागणी पुरवठा संयुति इष्टतम असल्याचे दिसते आणि त्यामुळे भारत हा वस्तुनिर्माण क्षेत्रातील महासत्ता होण्याची संभाव्यता निर्माण होते. या वस्तुनिर्माण क्रियेचा काही भाग निर्यात क्षेत्रात जाईल तेव्हा याचे लाभ आणखी वाढतील.

### भारतीय वस्तुनिर्माणाचे आरोग्य

इ.स.१९९०च्या दशकाच्या सुरुवातीच्या खुल्या अर्थव्यवस्थेपर्यंतचा भारताचा स्वातंत्र्योत्तर कालखंड, हा सर्वसाधारणपणे औद्योगिक क्षेत्राच्या कामगिरीवरून तीन कालखंडात विभागला गेला आहे. त्यातील पहिला म्हणजे (महालानोबिस प्रतिमानावर आधारित) १९५१ ते ६५ पर्यंतचा औद्योगिक उत्पादनाच्या त्वरणाचा साक्षीदार असलेला कालखंड. दुसरा म्हणजे १९६५ ते ८० औद्योगिक अवतरणाचा साक्षीदार असलेला कालखंड आणि तिसरा म्हणजे १९८१ ते ९१ पर्यंतचा उद्योगांचे पुनरुत्थान घडून आले तो कालखंड. त्यानंतरचा अकराव्या योजनेपर्यंतचा काळ हा सर्वसामान्यपणे उद्योगांसाठी व विशेषत्वाने वस्तुनिर्माणासाठी ५ ते ७ टक्के सरासरी अभिवृद्धीचा दर असलेला सरमिसळीचा कालखंड राहिलेला आहे. बाराव्या योजनेपासूनचा काळ मात्र (२०१२ नंतरचा) वस्तुनिर्माणासाठी कुंठिततेचा कालखंड राहिलेला आहे. आर्थिक सर्वेक्षण २०१३-१४ मध्ये असे नमूद केले आहे की २०१२-१३ व २०१३-१४ ही दोन वर्षे अभिवृद्धीचा दर केवळ दरसाल ०.२ टक्के असल्यामुळे


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ________________ date ________________

Name (in block letters) : ________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.
P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**DD किंवा MO Editor Yojana च्या नावे काढावा.**

वस्तुनिर्माणाच्या क्षेत्रात विशेषत्वाने निराशाजनक होती.

मात्र या आर्थिक सर्वेक्षणाने असा इशारा दिला होता की केंद्रीय सांख्यिकी संघटनाने पुनर्विलोकन केले असल्याची शक्यता असल्यामुळे गेल्या दोन वर्षांतील वस्तुनिर्माण क्षेत्रातील अभिवृद्धीच्या आधारसामग्रीची काळजीपूर्वक अर्थउकल केली पाहिजे. असे घडण्याचे कारण म्हणजे वस्तुनिर्माण क्षेत्रात भर पडलेल्या मूल्याचे प्राथमिक अंदाज हे औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशांकावर आधारलेले आहेत. तर दुसरे व तिसरे सुधारित अंदाज हे वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणाच्या सविस्तर आधारसामग्रीवर आधारलेले आहेत. वस्तुनिर्माण क्षेत्रातील अभिवृद्धीचा अंदाज केलेली वर उल्लेखलेली समस्या ही नवीन आलेल्या आधारसामग्री मालिकेतील डेटामुळे अधिक गुंतागुंतीची झाली आहे.

**नवीन आधार घेऊन वस्तुनिर्माण क्षेत्रातील अभिवृद्धी प्रगणित करणे :**

नवीन व जुन्या पद्धतींने काढलेल्या वस्तुनिर्माण क्षेत्रातील अभिवृद्धींमध्ये मोठमोठ्या तफावती (२०१२-१३ व २०१३-१४ मध्ये पाच टक्क्यांहून अधिक) आढळून आल्या आहेत. ह्या तफावती वास्तविक नसून सांख्यिकी आहेत. त्या काही प्रमाणात निगमनिकाय व्यवहार मंत्रालयाने एमसीए २१ अंतर्गत घेतलेल्या इ-प्रशासन उपक्रमामधून प्राप्त झालेल्या अधिक समावेशक व विस्तृत आकडेवारीचा परिणाम म्हणून आलेल्या आहेत. वस्तुनिर्माण क्षेत्रातील कंपन्यांनी केलेला व्यापार पूर्वी सेवा क्षेत्रामध्ये नोंदविला जात होता, तोदेखील त्यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. वस्तुनिर्माण क्षेत्रातील खरी अभिवृद्धी वस्त्रनिर्माण, तयार कपडे व चामड्याची उत्पादने या व्यवसायात आढळून आली. इ.स. २०१२-१३ व २०१३-१४मध्ये त्यांची सरासरी १७.७ टक्के इतकी होती (आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५).

भारतामधील उच्च उत्पादकतेचे म्हणून नोंदवलेले वस्तुनिर्माण क्षेत्र हे उच्च अभिवृद्धी निर्माण करण्यासाठी परिवर्तनीय क्षेत्र बनण्याची क्षमता असलेले क्षेत्र आहे हे नमूद करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत क्षेत्राची उत्पादकता ही अनोंदणीकृत वस्तुनिर्माण क्षेत्राच्या उत्पादकतेपेक्षा ७.२ टक्क्यांनी अधिक आहे (आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५).


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, East Block-IV, Level-VII, R.K. Puram, New Delhi 110 066. Tel. : 011-2610 0207, 011-2610 5590; Fax : 011-2617 5516**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022 2757 0686 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

## वस्तुनिर्माण क्षेत्रामधील अडथळे

वस्तुनिर्माण क्षेत्र हे अद्यापही भूमिसंपादन, पुनर्वसन, पालन करावयाचे अनेक नियम व कायदे, उद्योजकांसाठी स्पष्टतेचा अभाव, कारखाना उभारण्यासाठी प्राप्त करावयाच्या नाना प्रकारच्या क्लिष्ट परवानग्या, विपणन रणनीती व निर्याताभिमुखता यांचा अभाव, वीज व पाण्यासारख्या पायाभूत सुविधांचा अभाव या समस्यांनी ग्रस्त आहेत. आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५ मध्ये म्हटल्याप्रमाणे गेल्या काही काळांमध्ये वस्तुनिर्माण क्षेत्र हे सर्वाधिक स्थगित प्रकल्प असलेले एक क्षेत्र आहे. सर्वाधिक स्थगित प्रकल्प हे पोलाद, सिमेंट, प्रक्रिया केलेले अन्न यासंबंधीचे आहे. पैकी २०२ वस्तुनिर्माण प्रकल्प हे निधीचा व मागणीचा तुटवडा आणि बाजाराची प्रतिकूल परिस्थिती यामुळे स्थगित आहेत.

## वस्तुनिर्माण क्षेत्राला उत्तेजन देण्यासाठी धोरणे

वस्तुनिर्माण क्षेत्र हे उद्योजक व कामगार या दोन महत्त्वाच्या सहभागीदारांभोवती फिरते. या दोहोंच्या मध्ये त्यांचे संतुलन करण्यासाठी, या दोन घटकांचा परस्पर संवाद सुकर करण्यासाठी आणि यंत्रणा सुरळीत चालावी यासाठी दोन्ही बाजूंना सुविधा पुरविण्यासाठी सरकार यांच्यामध्ये येते. शासनाने तयार केलेले धोरणे व कार्यक्रम हे संपूर्ण वस्तुनिर्माण क्षेत्रामध्ये उत्प्रेरक म्हणून कार्य करतात.

## 'मेक इन इंडिया' कशासाठी?

'मेक इन इंडिया' हा भारताला वैश्विक वस्तुनिर्माण केंद्रामध्ये रूपांतरित करण्यासाठी हाती घेतलेला एक तात्कालिक धोरणात्मक उपक्रम आहे. नवीन गुंतवणुकी आकर्षित करून वस्तुनिर्माणास प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम, अनेक प्रकारे हस्तक्षेप करून वस्तुनिर्माण क्षेत्रास संबोधित करतो.

## प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी उपाययोजना :

उद्योगांच्या लायसन्ससाठी अर्ज करण्याची प्रक्रिया अवलंबविण्याच्या दृष्टीने ज्या काही महत्त्वाच्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत, त्यापैकी इ- बिझ पोर्टल हे एक आहे, ज्यामुळे लायसन्ससाठी २४X७ अर्ज करणे शक्य होईल. पर्यावरण विभागाची मंजुरी मिळवण्याची प्रक्रिया महाजालाशी जोडली आहे. एका खिडकीतून संमती देण्याची सुविधा जेथे पुरवली जाईल अशा राष्ट्रीय गुंतवणूक व वस्तुनिर्माण क्षेत्रालाही धोरणाने संमती दिली आहे.

## नवीन बाजार निर्माण करून कुशल कामगार तयार करणे :

नवीन स्मार्ट शहरे, औद्योगिक मार्गिका हे मागचे व पुढचे दुवे जोडण्यास तसेच विभिन्न पातळ्यांवर वस्तुनिर्माणाच्या प्रगत तंत्रांना चालना देण्यास सक्षम आहेत. कंबोडिया, म्यानमार, लाओस व व्हिएतनाम ह्या देशांमध्ये वस्तुनिर्माण केंद्रे उभारणे सुकर करण्याच्या दृष्टीने प्रकल्प विकास कंपन्यांच्या मार्फत भारतीय वस्तुनिर्माणकारांसाठी जगभरात बाजारपेठ तयार करणे हेही एक उद्दिष्ट आहे. त्याशिवाय ह्या उपक्रमामध्ये नवतरुणांवर लक्ष केंद्रित करणारे कार्यक्रम व कौशल्य विकासाच्या संस्था ह्याचाही समावेश करण्यात आला आहे. एक चांगला बदल असा आहे की कौशल्य विकास व उद्योजकता ह्यांसाठी नवीन मंत्रालय स्थापन करण्यात आले असून ते तरुणांसाठी कौशल्यविकासाची नवीन तंत्रे आत्मसात करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ आणि राष्ट्रीय कौशल्य विकास अभिकरण ह्यांच्या मार्फत संपूर्ण जगाशी जोडलेले आहे. भारतीय कौशल्य उपक्रमाने भारतातील तरुणांना कातडी कमावणे, वस्त्रनिर्माण, अन्न-प्रक्रिया, ताग, रेशीम उद्योग, हस्तकला इ. कष्टसाध्य कौशल्ये शिकवावीत अशी अपेक्षा आहे. कौशल्य विकासामध्येदेखील प्रमुख भर हा भारतीय चामडे उद्योग विकास कार्यक्रमाअंतर्गत दर वर्षी १,४४,००० युवकांना प्रशिक्षण देण्यावर आहे. वस्तुनिर्माणास चालना देण्याच्या व २०२२ पर्यंत शंभर दशलक्षांसाठी अतिरिक्त रोजगार निर्माण करण्याच्या दृष्टीने इ.स. २०११ मध्ये सुरू करण्यात आलेले राष्ट्रीय वस्तुनिर्माण धोरण, वैश्विकदृष्ट्या स्पर्धात्मक वस्तुनिर्माण होणे सुनिश्चित करील.

## उच्च मूल्याच्या औद्योगिक क्षेत्रास चालना :

वैश्विक सहभागित्वाला अधिक मोठ्या प्रमाणावर उत्तेजन देण्यासाठी उच्च मूल्याच्या औद्योगिक क्षेत्रासाठी गुंतवणुकीच्या मर्यादा व नियंत्रणे सैल करण्यात आली आहेत. संरक्षण क्षेत्रातही थेट परकीय गुंतवणुकीची मर्यादा २६ टक्क्यांवरून ४९ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे. संरक्षण क्षेत्रातील रोखेरूपी गुंतवणूक स्वाभाविक मार्गाने २४ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे. संरक्षण क्षेत्रात आधुनिक व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात १००

टक्के परकीय थेट गुंतवणूकीला विशिष्ट बाबतीत संमती देण्यात येईल. रेल्वेमध्ये नियतक्रम प्रेषणा अंतर्गत, विनिर्दिष्ट रेल्वे पायाभूत प्रकल्पांमधील बांधकाम, कार्यचालन व देखभाल ह्या कामांमध्ये १०० टक्के थेट गुंतवणूक करण्यास मुभा देण्यात आली आहे. ही क्षेत्रे भारतास उच्च मूल्य वस्तुनिर्माणात विशेषज्ञता प्राप्त करण्यास मदत करतील.

**कामगार व श्रमिक ह्यांच्याशी संबंधित सुधार:**

सर्व विना- जोखीम व विना-धोका व्यवसायांमधील स्व-प्रमाणन पद्धती ही लहान उद्योजकांना त्यांचा स्वत:चा उद्योग उभारण्यास मदत करील. आपल्या पाच टक्क्यांहून कमी संभाव्य कामगारांना औपचारिक कौशल्याचे प्रशिक्षण मिळते, ह्या पार्श्वभूमीवर दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना स्थापन करण्याचा शासनाचा उपक्रम ग्रामीण युवकांसाठी बदल घडवून आणील. त्याशिवाय, वित्तमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात म्हटल्याप्रमाणे, अनेकविध मंत्रालयांमध्ये पसरलेले कौशल्य विकास कार्यक्रमांचे राष्ट्रीय कौशल्य मिशनमध्ये एकत्रित करणेही आवश्यक आहे.

**मेक इन इंडियामधील सूक्ष्म, लहान व मध्यम उद्योग मंत्रालया (सू ल म उ मं) ची भूमिका:**

रोजगार निर्मिती, स्थूल देशीय उत्पादामधील वस्तुनिर्माणाचा भाग वाढविणे आणि निर्यातीस चालना देणे ह्यासारख्या मुद्द्यांना संबोधित करून सूक्ष्म, लहान व मध्यम उद्योग मंत्रालय 'मेक इन इंडिया' बळकट करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. आधीपासूनच हे क्षेत्र, एकूण वस्तुनिर्माण उत्पादनामध्ये ४५ टक्के व देशाच्या एकूण निर्यातीमध्ये ४० टक्के अंशदान करते.

**सूक्ष्म, लहान व मध्यम उद्योग मंत्रालयाची अभिवृद्धी**

| वर्ष | सू ल म उ मं मधील एकूण वस्तुनिर्माण उत्पादनामधील टक्केवारीचा भाग | सू ल म उ मं मधील रोजगार (आकडे लाखांत) | एकूण स्थूल देशीय उत्पादामधील सू ल म उ मंची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 2006-7 | 42.02 | 805.23 | 7.73 |
| 2007-8 | 41.98 | 842.00 | 7.81 |
| 2008-9 | 40.79 | 880.84 | 7.52 |
| 2009-10 | 39.63 | 921.79 | 7.49 |
| 2010-11 | 38.48 | 965.15 | 7.42 |
| 2011-12 | 37.52 | 1011.80 | 7.28 |

स्रोत - सू ल म उ मंत्रालयाचा २०१३-१४ चा वार्षिक अहवाल, सू ल म उ मंत्रालय

एकूणच अर्थव्यवस्थेत, विशेषत: वस्तुनिर्मिती क्षेत्रात मंदी असतानाही सू ल म उ चे उत्पादन व रोजगार ह्या दोन्ही क्षेत्रात लक्षणीय योगदान राहिले आहे. परंतु, ह्या क्षेत्राला बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागले, उदा., भांडवल व पत सुविधापर्यंत असणारी मर्यादित पोहोच, तंत्रज्ञानविषयक माहितीचा अभाव, जागतिक बाजारपेठेशी असणारी मर्यादित

पोहोच व आंतर क्रिया व त्याविषयीची मर्यादित जागरुकता, रस्ते, पाणी व ऊर्जेसारख्या संरचनेची अपर्याप्तता, कामगारविषयक कायद्यांमधील विभिन्नता, वस्तू उत्पादन व विपणन क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाचा अभाव इ.

ह्या क्षेत्राला साह्य करण्यासाठी सरकार विविध योजना राबवते. उदा., राष्ट्रीय वास्तुनिर्माण स्पर्धा कार्यक्रम, पत हमी योजना, ग्रामसमूह विकास इ. नुकतीच जाहीर करण्यात आलेल्या व रु. २०,००० कोटींचा कॉर्पस निधी असणाऱ्या मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट रीफायनान्स एजन्सी (मुद्रा) बँकेची घोषणा हे ह्या क्षेत्राच्या 'मेक इन इंडिया' साठी असणाऱ्या योगदानाला अधिक मजबूत बनविण्यासाठी उचलण्यात आलेले एक स्वागतार्ह पाऊल आहे. सू ल म उ च्या वस्तुनिर्माणक्षेत्राला ॲप्रेण्टिस प्रोत्साहन योजनेमुळे नक्कीच बळ मिळेल. राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाने साह्य केलेल्या www.msmeshopping.com ह्या संकेतस्थळावरून आता स्वस्त व मस्त सू ल म उ उत्पादनांची विक्री करणे शक्य होणार आहे.

**उद्योग करण्याची सुलभता आणि 'मेक इन इंडिया' :**

जागतिक बँकेच्या २०१५च्या उद्योग करण्याच्या सुलभता निर्देशांकानुसार भारताचा क्रमांक १८९ देशात १४२ वा आहे. उद्योग करण्याच्या सुलभतेच्या बाबतीत आजच्या स्पर्धात्मक जगात भारत इतका मागे पडावा ही चिंतेची बाब आहे. 'मेक इन इंडिया'ने उद्योगास प्रोत्साहन देण्याची विशेष काळजी घेतली आहे. नव्याने ह्या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या गुंतवणूकदारांना मार्गदर्शन व साह्य करण्यासाठी विशेष चमुंची स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उद्योगांसाठी 'एक खिडकी योजना' ही सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे वस्तुनिर्माणात गुंतवणूक वाढण्यास नक्कीच मदत होईल. त्याचप्रमाणे सोपी, स्पष्ट व अप्रतिपक्षिय कर योजना लागू करण्यावर बराच भर दिला जात आहे. लौकरच अस्तित्वात येऊ घातलेल्या वस्तू व सेवा दरामुळे (जी एस टी) उद्योग करण्याचे तंत्रच बदलून जाणार आहे.

**वस्तूनिर्माण क्षेत्राची भावी दिशा :**

सर्व जगात सध्या हरित निर्मितीची लाट उसळली आहे. त्यात सामील होवून भारतीय वस्तूनिर्मात्यांना स्थानिक वस्त्रे, ज्यूट उत्पादने ह्यांच्या प्रचालनासाठी त्याचा लाभ घेता येईल. त्याचप्रमाणे पवन ऊर्जा व सौर ऊर्जेच्या निर्मितीसाठी उपकरणे निर्माण करण्यासही त्यामुळे उत्तेजन मिळेल.

देशांर्तागत व देशाबाहेर जोडण्यांचे जाळे मजबूत करणे अत्यावश्यक झाले आहे. रस्ते, रेल्वे व जलमार्गाच्या जोडण्या वाढविल्याने, तसेच भारताला लाभलेल्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्याचा योग्य वापर केल्याने भारतातील वस्तूनिर्मितीउद्योगाचा पाया मजबूत होऊ शकेल. माल वाहतूक व औद्योगिक मार्गीकेसाठी राखून ठेवलेल्या जागांविषयीचे काम जलद गतीने करणे आवश्यक आहे, कारण त्यातून वस्तुनिर्मितीच्या दोन्ही अंगांना मागणी व पुरवठ्याला - अनेक पातळ्यांवर बळ मिळू शकते. त्यातून वस्तुनिर्माण स्थायी बनविणारे मागणीचे चक्र निर्माण होऊ शकेल.


एतद्देशीय संस्कृती व परंपरा ह्यांमुळे रोजगार निर्मिती व वस्तूनिर्मितीला उत्तेजन मिळू शकते. स्थानिक पातळीवरील विविध कला व हस्तोद्योगांविषयक ज्ञानाचे संरक्षण, उत्तेजन व संवर्धन करून त्याला उत्तम विपणन कौशल्याची जोड देऊन ही उत्पादने स्थानिक तसेच परदेशातील ग्राहकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. काश्मीरची लोकरी उत्पादने, पंजाबची फुलकारी, आंध्र प्रदेशची पोचमपल्ली, बंगालची जामदानी व तंत, उ.प्र.मधील बनारसी अशांसारखे अनेक वस्त्रप्रकार प्रदर्शने, जत्रा व कला महोत्सवांच्या माध्यमातून सातत्याने ग्राहकांसमोर आणल्यास जगभर लोकप्रिय होऊ शकतात. सध्याची पिढी ही 'ऑनलाईन' खरेदीची भक्त आहे. त्यामुळे अनेक ऑनलाईन विपणन कंपन्यांच्या माध्यमांच्या द्वारे अशा सर्व उत्पादनांचे विपणन करावे लागेल. त्यातून युवकांसाठी नवे रोजगार निर्माण होतील. अशा उत्पादनांचे गुणवत्ता नियंत्रण व त्यांच्या विक्रीत साह्य ह्याद्वारे सरकार ग्रामीण भागातील घराघरातून करण्यातून रोजगार निर्मिती करू शकेल. ह्या सर्व प्रक्रियेतून लोकसंख्या लाभांशाच्या कथित कल्पनेच्या लाभांचे सुयोग्य वितरण होण्यास मदत होईल.

*(**कस्तुरी चक्रवर्ती** हे भारतीय आर्थिक सेवेचे अधिकारी असुन सध्या निती आयोग नवी दिल्ली येथे संशोधन अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. तर **मनिष मिश्रा** हे भारतीय राजस्व सेवेचे अधिकारी असुन रोहटेक येथिल केंद्रीय सिमा व सेवा शुल्क कर विभागात सहाय्यक कमिशनर आहेत.)*

***संपर्कासाठी ईमेल -*** kasturic9@gmail.com - manishmishrairs@gmail.com

# राष्ट्रीय लेखा मालिका- सुधारित पायाभूत वर्ष व आकडेवारीत उत्पादन क्षेत्राची कामगिरी चांगली का ?

**- जितेंदर सिंह**




**राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने अलिकडेच एनएसओ चे पायाभूत वर्ष २००४-०५ बदलुन २०११-१२ केले यामुळे अनेक पद्धतीमध्ये सर्वकष बदल घडून आला. एनएसओ चे कार्य आणि तिची नव्याने ओळख देण्याची आवश्यकता नसली तरी पायाभुत वर्ष बदलाची माहिती संबंधित खात्यांना दिली असती तर गोंधळ झाला नसता. सांख्यिकी आकडेवारी ठरवितांना जुन्या व नवीन पद्धतींचा ताळमेळ घातल्यास अनेक आकडेवारी नव्याने पुढयात येईल जसे असंघटीत कृषी कामगारांची आकडेवारी गोळा करण्यासाठी अवलंबिण्यात आलेली पद्धत यामुळे मुल्यवर्धनाचा अभ्यास करता येतो.**

देशातील आर्थिक उलाढाली या उत्पादनाचे स्वरूप व मागणी यानुसार बदलत आल्या आहेत. उत्पादन क्षेत्रात उत्पादनाच्या नमुन्यांमधील बदल हा तंत्रज्ञान व नवप्रवर्तनामुळे होत असतो व या प्रक्रियेत काही उत्पादने कालबाह्य ठरतात तर इतर लोकप्रिय होत असतात. मागणीच्या बाजूने एखाद्या वस्तूच्या वापराचे नमुनेही बदलत असतात. तुलनात्मक दर हे त्या वस्तूंचा वापर व उत्पादनाचे पर्याय यांच्यातील बदलांना प्रेरणा देत असतात. त्यामुळे रचनात्मक बदल व सुधारित किंमती विचारात घेतांना काही काळानंतर आपण ज्याचा मूलाधार या सगळ्या प्रक्रियेसाठी घेत आहोत तो बदलावा लागतो. राष्ट्रीय लेखा खात्याचा तुलनात्मक पाया बदलतांना म्हणजे नवीन पायाभूत आकडेवारीचा वापर करतांना आर्थिक रचनेतील बदलाबाबत बरीच नवीन माहिती मिळत असते व त्यानंतर आपण नवीन आधारभूत किंमतींकडे वळतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे मूल्यमापन करता येते, अर्थव्यवस्थेचा आकारही वाढतो व पायाभूत बदलांमुळे अर्थव्यवस्थेतील इतर तुलनात्मक अशा इतर घटकांचे महत्व नव्याने पटते.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (सीएसओ) राष्ट्रीय सांख्यिकी खात्याचे पायाभूत वर्ष २००४-२००५ ऐवजी २०११-१२ केले आहे. या सुधारणेमुळे अनेक पद्धतींमध्ये बदल घडून आले कारण पायाभूत वर्ष २००४-०५ हे बदलण्यात आले होते. खरेतर हा बदल सर्वंकष असूनही त्याबाबतचे प्रसिद्धी पत्रक अनेक लोकांना या बदलाचे स्पष्टीकरण करून देण्यात अपयशी ठरला व त्यामुळे गोंधळ वाढला. प्रत्यक्ष जनतेला आर्थिक आकडे पाहून आश्चर्य वाटले, त्यांना वाढीचे हे आकडे अपेक्षित नव्हते. अनेक जणांना त्याबाबत शंका होत्या त्यामुळे त्यांनी या धोरणात्मक दृष्टीने महत्वाच्या असलेल्या वाढीच्या आकड्यांबाबत सावध भूमिका घेतली. नवीन राष्ट्रीय खात्याच्या मालिकेत २००४-०५ च्या तुलनेत बरीच सुधारणा झाली होती. ती विशेष करून कंपनी क्षेत्र व सरकारी कामे याबाबतच्या आकडयां संबंधित होती. हे आकडे राष्ट्रीय नमुने सर्वेक्षण संस्थेने तयार केले होते त्यामुळे मूल्यमापन, आर्थिक कामकाज, नवीन संकल्पना व संस्थांचे नव्याने वर्गीकरण याबाबत काही बदल घडून आले.

उद्योग क्षेत्रात एनआयसी २००८ चा अंतर्भाव केल्यामुळे उद्योग क्षेत्रात समायोजन दिसून आले. नवीन मालिकेत पूर्वीच्या ८ उद्योगांऐवजी ११ उद्योगांचा समावेश करण्यात आला. इतर तीन उद्योगांचे फेरवर्गीकरण सेवा क्षेत्रात करण्यात आले त्यात वाहतूक,साठवण, संदेशवहन व प्रसारणाशी निगडित सेवांचा तसेच स्थावर मालमत्ता मालकी व व्यावसायिक सेवा व इतर सेवा यांचा समावेश होता. उद्योगाच्या व्याख्येतही बदल करण्यात आला. पूर्वी सामुदायिक सेवा सार्वजनिक प्रशासन व संरक्षण म्हणून मानल्या जात होत्या.

मूळ किंमतीच्या पातळीवर एकूण मूल्यवर्धन (जीव्हीए) समाविष्ट करण्यात आले. काही जुन्या संकल्पना आता दिसणार नाहीत त्यात यापुढे एकूण देशांतर्गत उत्पन्न हे खर्चाच्या तुलनेत धरले जाणार नाही. एकूण मूल्यवर्धित किंमती या एकूण राष्ट्रीय उत्पनाशी खर्च व निव्वळ उत्पादन कर व अनुदाने यांच्याशी निगडित राहतील. मूल्यवर्धित एकूण मूल्याची तुलना एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी (जीडीपी) किंमतीच्या आधारावर होईल त्यामुळे विविध क्षेत्रात या किंमती वेगळ्या असतील.उदाहरणार्थ निव्वळ उत्पादन कर हा उत्पादनात अधिक म्हणजे पॉझिटिव्ह राहील, त्यामुळे जीव्हीएचा आकडा जीडीपीपेक्षा अधिक असेल. नवीन वाढीचे आकडे हे जीव्हीएसाठी मूळ किंमतीच्या तुलनेत असतील, त्यामुळे कर व अनुदाने ही जीडीपीच्या आकड्यात समाविष्ट नाही हा समज जीडीपी घटक मूल्याच्या संदर्भात होता तो दूर होईल.


उत्पादकता कर हा उत्पादन करापेक्षा वेगळा आहे, स्वतंत्र आहे, किती उत्पादन केले यापासून तो अलिप्त आहे दुसरे म्हणजे उत्पादकता कर हा उत्पादन करापेक्षा वेगळा आहे. हाच फरक उत्पादन व उत्पादन अनुदानात आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे बाजारपेठ मूल्यानुसार मोजले जात होते ते आता नुसते एकूण राष्ट्रीय उत्पन्न म्हणून ओळखले जाईल व ते निव्वळ जीव्हीएमधील मूलभूत किंमतींच्या आधारे असलेला उत्पादन कर व उत्पादन अनुदानांच्या बेरजेतून काढता येईल.

नवीन प्रभावी कामगार पद्धतीचा वापर युनिकार्पोरेटेड मॅन्युफॅक्चरिंग अँड सर्व्हिसेसने स्वीकारला आहे त्यातून असंघटित अकृषी कामगारांचा अंदाज गोळा करता येतो. या पद्धतीने विविध प्रकारच्या म्हणजे उत्पादकतेशी संबंधित व इतर प्रकारच्या कामगारांना आकड्यांच्या स्वरूपात किती प्रमाणात गृहित धरायचे याचा अंदाज करता येतो. पूर्वीच्या पद्धतीत प्रत्येक कामगारांना सारख्याच प्रमाणात गृहित धरले जात होते मग त्यांचे कौशल्य व उत्पादकता यांचा विचार केला जात नसे. नवीन पद्धत स्वीकारल्याने असंघटित अकृषी क्षेत्रातील मूल्यवर्धनाचा अंदाज करता येतो.

जुन्या व नव्या आधारभूत आकडेवारीतील सांख्यिकीय फरक

नव्या म्हणजे २०११-१२ या आधारभूत वर्षात जीव्हीएची वाढ ही स्थिर किंमतींना २०१२-१३ मध्ये ४.९ टक्के होती २००४-०५ हे जुने आधारभूत वर्ष पाहिले तर त्यावेळी ती जीडीपीच्या ४.५ टक्के होती २०१३-१४ मध्ये जीव्हीए नवीन पायाभूत वर्षाप्रमाणे ६.६ टक्के होता व तो जुन्या वर्षाच्या आधारे केवळ ४.७ टक्के होता. जीव्हीएची वाढ ही उत्पादन क्षेत्रात २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये लक्षणीय होती ती सुधारित आकड्यानुसार व पायाभूत वर्षानुसार अनुक्रमे ६.२ टक्के व ५.३ टक्के होती. पूर्वीचे आधारभूत वर्ष बघितले तर ती अनुक्रमे १.१ टक्का व ऋण ०.७ टक्के होती. उत्पादनासाठी जुन्या २०११-१२ या आधारभूत वर्षात उत्पादनशीलता १४.१ टक्के होती तर २०१२-१३ या आधारभूत वर्षाप्रमाणे ती १७.९ टक्के आहे. या दोन्हीत फरक जाणवण्याची कारणे म्हणजे प्रत्येक क्षेत्राला दिलेले वेगळे महत्व तसेच त्याची योग्य प्रमाणात घेतलेली दखल ही आहेत, त्याचबरोबर काही संकल्पना व वर्गीकरणे बदललेली आहेत. जीव्हीएमध्ये वेगवेगळी वर्गवारी कशी आहे व त्यातील स्थान नेमके किती आहे हे समजून घेणे गरजेचे आहे.

## किमती स्थिर असताना जुन्या व नव्या आधारभूत वर्ष व वर्गवारीप्रमाणे वेगवेगळ्या क्षेत्रात झालेली वाढ




२०० ४-०५ या वर्षातील अंदाज हे जीव्हीएच्या घटक किंमतीवरून काढले आहेत तर २०११-१२ या आधारभूत वर्षात ते मूलभूत किंमतीला असलेल्या जीव्हीएतून काढण्यात आले आहेत

स्थिर किंमतीला नवीन व जुन्या किंमतींच्या आधारे आर्थिक वाढीत इतर घटक सारखेच राहणार असतील तर त्यात दोन्ही पद्धतीं वापरूनही फरक पडत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर पायाभूत वर्षात बदल केला म्हणून आर्थिक वाढीच्या आकड्यात बदल झाला असे म्हणता येत नाही. जर आलेखात प्रत्येक क्षेत्रानुसार वाढ दोन्ही पायाभूत वर्षांच्या तुलनेत बघितली तर त्यात काय फरक दिसतो ते दाखवले आहे. नवीन मालिकेत आर्थिक घडामोडींचे योग्य प्रतिनिधीत्व आले आहे असे गृहित धरता दोन पायाभूत आर्थिक वर्षातील फरकामध्ये आर्थिक वाढीच्या आकड्यांचे अतिरंजित चित्र दिसून येते. एकूणच आर्थिक वाढ ही २०१३-१४ हे जुने पायाभूत वर्ष मानले तर दोन टक्क्यांनी कमी दिसते. यात असा फरक दिसण्याचे म्हणजे रचनात्मक बदल यापुरतीच ही आकडेवारी मर्यादित नाही तर त्यात संकल्पनात्मक बदल व सुधारित मूल्यात्मक बदल, सर्व घटकांचा समावेश यामुळे ही पद्धत सर्वसमावेशक आहे. जुन्या मालिकेतील घटकांमध्ये खाणकाम, उत्पादन, व्यापार, दुरूस्ती व हॉटेल्स, वाहतूक, साठवण व सामुदायिक सेवा यांचा समावेश आहे पण त्यावर फार भर दिलेला नाही. कृषी व संलग्न तसेच आर्थिक , स्थावर मालमत्ता व व्यापार सेवा यावर जास्त भर दिला आहे.

सुधारित पद्धतीनुसार उत्पादन क्षेत्रात वाढ जास्त दिसते कारण रचनात्मकता हा त्याचा पाया आहे व संकलन पद्धती बदलेली आहे, पद्धतींमध्ये बदल केल्याने दृष्टिकोनात बदल, सर्वसमावेशकता, नवीन मूल्यांकन पद्धती या नवीन संकल्पना आल्या, त्यातील काहींची माहिती प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

१) व्यवस्था दृष्टिकोनातुन उद्यमशील दृष्टिकोनाकडे दृष्टिकोनाचा वापर उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणासाठी केला जात होता त्यामुळे उत्पादन करणाऱ्या युनिटशिवाय इतर ठिकाणी होणाऱ्या उत्पादन क्रियांचा वेध घेता येत नव्हता प्रत्यक्ष उत्पादनशीलतेबरोबर उद्योजकता व इतर उत्पादक कृती या उत्पादन प्रक्रियेत पूरक म्हणून घडत असतात. आता नवीन दृष्टिकोनानुसार या उत्पादन प्रक्रियांशी पूरक कृतींचाही विचार केला गेला आहे. उद्यमशीलतेचा दृष्टिकोन हा कंपनी कामकाज मंत्रालयाच्या एमसीए २१ बाबत माहितीनुसार सुलभ झाला आहे. त्यामुळे उत्पादन क्षेत्रातील नोंदणीकृत आस्थापनांची दखल जास्त प्रमाणात घेतली गेली आहे.

२) **एनएसएसओ सर्वेक्षणांच्या निष्कर्षांचा समावेश-** एनएसएसची सर्वेक्षणे, समावेश न केलेल्या आस्थापनांचे सर्वेक्षण (२०१०-११) व रोजगार व बेरोजगारी सर्वेक्षण २०११-१२ आता उपलब्ध आहेत त्यांचा नवीन मालिकेत समावेश करण्यात आला आहे. असंघटित क्षेत्रातील उत्पादक घडामोडींचा समावेश त्यात केला आहे. त्यामुळे त्यांचे प्रतिनिधीत्व वाढले आहे.

३) **कामगार समावेश पद्धतीत बदल-** नवीन मालिकेत कामगारांचा विचार अनोंदणीकृत उत्पादन व सेवा आस्थापने यांच्यात वेगळ्या पद्धतीने केला आहे. आधीच्या पद्धतीत सर्व प्रकारच्या कामगारांना सारखेच गणले जात होते आता नवीन पद्धतीत त्यांचा समावेश उत्पादकतेच्या आधारावर करण्यात आला आहे

४) **अनुदान वगळून उत्पादकता करांचा समावेश-** निव्वळ उत्पादन कर व उत्पादन अनुदान हे उत्पादकतेत धन आकड्याने गणले जाते तर कृषी व संलग्न उद्योगात किंवा उर्जा व वायू क्षेत्रात ते ऋण संख्येत गणले जाते. त्यामुळे धन (पॉझिटिव्ह) निव्वळ उत्पादन करामुळे त्या क्षेत्रातील निव्वळ जीव्हीएमध्ये इतर क्षेत्रांच्या तुलनेत वाढ दिसून येते जर ढोबळ पद्धतीने उत्पादन कर व अनुदाने एकत्र गणली तर त्याचा परिणाम हा आर्थिक वाढीच्या दरात प्रतिबिंबित होण्याची शक्यता असते.

*__जितेंद्र सिंग__ हे भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रलयाच्या औद्योगिक धोरण व संवर्धन विभागातील आर्थिक सल्लागार कार्यालयात उपसंचालक म्हणुन कार्यरत आहे.*

# उत्पादन क्षेत्र : आर्थिक विकासाचे इंजिन

- डॉ.उमेश भा.घोडेस्वार




**भारतामध्ये मेक इन इंडिया अंतर्गत निर्माण क्षेत्राला विशेष प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये विनिर्माण क्षेत्राची भूमिका अनन्यसाधारण आहे. विनिर्माण क्षेत्रालाच, उत्पादन क्षेत्र, कारखानदारी क्षेत्र सूध्दा म्हटले जाते.टेक्सटाईल्स, रासायनिक उत्पादने, फार्मासिटीकल्स, मूलभूत धातू, मशीनरी आणि संसाधने, ईलेक्ट्रानिक वस्तू इत्यादी वस्तूला जागतिक बाजारामध्ये मागणी निर्माण होत आहे.एकूण जीडीपीमध्ये १६ टक्के हिस्सा विनिर्माण क्षेत्राचा आहे. हा हिस्सा २५ टक्केपर्यंत जाण्याचे संकेत आहेत. तर एकूण रोजगारामध्ये १२ टक्के रोजगार हया क्षेत्रातून प्राप्त होतो. उत्पादन क्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी ध्येये व धोरणांची कसून अंमलबजावणी केल्यास आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून उत्पादन क्षेत्रे आपली भूमिका बजावू शकतात.**

गेल्या दोन दशकामध्ये भारताने एक अपारंपारिक विकासाचा मार्ग म्हणुन निर्मिती क्षेत्राला आपलेसे केले आहे. त्यामुळेच जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये भारतीय अर्थव्यवस्था झपाटयाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून पुढे येत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण दिसून येते. उत्पादन क्षेत्रालाच विनिर्माण क्षेत्र, कारखानदारी क्षेत्र असे देखील म्हटले जाते. विकसित देशात उत्पादन क्षेत्राच्या वाढीमुळे विकास झपाटयाने होतांना दिसून आला तर त्यातुलनेत भारतातील उत्पादन क्षेत्राच्या विकासाची गाथा याविरुध्द दिसून येते. सेवा क्षेत्राची गतिमानता लक्षात घेता त्या तुलनेत उत्पादन क्षेत्र कमी विकसित दिसून येते. जीडीपी मध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा स्थिर दिसून येतो. तर विकसित देशातील गेल्या तीन दशकात उत्पादन क्षेत्रामध्ये मोठी वाढ दिसून येते. त्याठिकाणी जीडीपीपेक्षा उत्पादन क्षेत्राची वृध्दी जास्त दिसून येते. परंतु भारतात उत्पादन क्षेत्राचा जीडीपीमधील वाटा स्थिर दिसून येतो. त्यामुळेच भारतीय जीडीपीमध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा १६ टक्के इतका स्थिर दिसून येतो. भारतीय विकास व्यूहनीतीमध्ये उत्पादन क्षेत्राकडे विशेषत: पुरेशा रोजगारनिर्मितीचे केंद्र म्हणून पाहले जाते. जीडीपीमधील उत्पादन क्षेत्राचा हिस्याचा विचार करता १९९९-०० ते २००४-०५ मध्ये २५ टक्के ने वाढ दिसून आली. तर २००४-०५ आणि २००९-१० मध्ये ९ टक्क्यांनी उत्पादन क्षेत्राचा वाटा कमी झाला. जागतिक वित्तीय संकटाचे पडसाद भारतीय अर्थव्यवस्थेवर पडले. २००७-१२ या अकराव्या पंचवार्षिक योजना काळात वित्तीय क्षेत्रामध्ये अरिष्ट निर्माण झाले. अरिष्टाचे परिणाम २०११ पर्यंत जाणवू लागले. जागतिक मागणित घट, अस्थिर विनिमय दर, आर्थिक व व्यापारी अनिश्चितता यामुळे उत्पादन क्षेत्रावर परिणाम होवून उत्पादन क्षेत्राच्या वृध्दीदरामध्ये घट दिसून आली. २००९-१० मध्ये उत्पादन क्षेत्रामध्ये संक्रमण काळ दिसून आला. उत्पादन क्षेत्रातील काही उपक्षेत्रामध्ये भरभराटी येऊ लागली. यामध्ये ऍटोमोटीव्ह क्षेत्र, कापड उद्योग, टेक्सटाईल उद्योग, लेदर उद्योग, फुड प्रॉडक्ट्स या उद्योगामध्ये वाढ दिसून आली. परंतु तरीदेखील जीडीपीमध्ये व रोजगारामध्ये मोठा वाटा प्रदान करण्यात उत्पादन क्षेत्राला पाहिजे तसे योगदान देता आले नाही. २०१०-११ मध्ये उत्पादन क्षेत्राचा जीडीपीमधील वाटा ९.७ टक्क्यावरुन कमी होवून २.७ टक्के इतका कमी झाला. २०१२-१३

मध्ये १ टक्याने आणखी कमी झाला. असे असूनही उत्पादन क्षेत्रामध्ये मोठया संभाव्यता आहेत ज्यामुळे जीडीपीमध्ये या क्षेत्राचा वाटा तर वाढतच जाईल शिवाय रोजगार निर्मितीमध्ये देखील हे क्षेत्र आपले चांगले योगदान देवू शकते.

**उत्पादन क्षेत्राच्या संभाव्यता :**

२०२५ पर्यंत भारतीय उत्पादन क्षेत्र मोठी झेप घेवू शकते. १ लाख कोटी डॉलर पर्यंत या क्षेत्राचे उत्पादन जावू शकते. तर २५ ते ३० टक्यांपर्यत जीडीपीमध्ये आपले योगदान देण्याची संभाव्यता उत्पादन क्षेत्रामध्ये आहे. तसेच ४० दशलक्ष इतका रोजगार उत्पादन क्षेत्रातून प्राप्त होण्याचे संकेत आहेत. चिन, जर्मनी, जपान आणि युएस या देशामध्ये उत्पादन क्षेत्राचा जीडीपीमधील वाटा अधिक असून तो २५ ते ३० टक्क्यांच्या दरम्यान आहे. त्यामुळे हे प्रमाण भारतात देखील असू शकते. २०१२ मध्ये भारतातून १८६.८ अब्ज किंमतीच्या उत्पादनाची निर्यात झाली तर याच वर्षी भारतातील एकूण निर्यातीत ६१.२ टक्के वाटा उत्पादन क्षेत्रातातील निर्यातीचा होता. इतर देशांच्या तुलनेत भारताच्या उत्पादन क्षेत्राचा जीडीपीमधील वाटा वाढविणे आवश्यक आहे. जागतिक एकूण उत्पादन क्षेत्राच्या जीडीपीमध्ये वाटयाचा विचार करता भारताचा वाटा केवळ २.२ टक्के इतका कमी असून तो युके व फ्रान्सच्या सममूल्य आहे.

| **क्षेत्र** | **क्षेत्राचा वाटा (करोड रु.)** | |
|---|---|---|
| | **२०१४** | **२०२५ (अपेक्षित)** |
| औद्योगिक उत्पादन | ७,००० | २९,५८४ |
| रसायने उद्योग | १,१६८ | ३,६८१ |
| ऍटोमोटीव्ह उद्योग | ३,९८१ | १०,२७३ |
| अभियांत्रिकी उद्योग | २,७७२ | ६,४६३ |
| धातू आणि खाण उद्योग | १,८७० | ३,५५५ |


**संदर्भ : केंद्रीय सांख्यिकीय कार्यालय**

उत्पादन क्षेत्राच्या अपेक्षित वृध्दीदर :

२००८-११ च्या वित्तीय क्षेत्रातील अरिष्टामुळे उत्पादन क्षेत्रावर प्रभाव जाणवला. तरीसूध्दा उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी नव्या सरकारव्दारे मोठया अपेक्षा आहेत. या क्षेत्राचा अपेक्षित वृध्दीदर पुढीलप्रमाणे नियोजन आयोगाने वर्तविला आहे.

**१- धातू आणि खाण क्षेत्र :** भारतात एकूण खनिज उत्पादनामध्ये २०१२ व २०१३ मध्ये ४३.१ अब्ज डॉलर इतक्या मूल्याचे खनिजे उत्पादित करण्यात आली. तर ६.६ अब्ज डॉलर इतक्या खनिजे मूल्याची निर्यात करण्यात आली. तर १९७ अब्ज डॉलरची आयात करण्यात आली. म्हणजे निर्यातीपेक्षा आयातच जास्त होती. २०२० पर्यंत धातू व खाण क्षेत्राचा जीडीपीमधील वाटा १५० अब्ज डॉलरपर्यंत जावू शकतो. २०१३ मध्ये ३१०८ इतक्या खाणी होत्या यामध्ये नैसर्गिक वायू व खाणी, कच्चे पेट्रोलीयम, लहान खाणी इ.चा समावेश होता. २०१५ मध्ये जगात स्टील उद्योगामध्ये दुसऱ्या क्रमांकावर येवू शकतो. धातू व खाण क्षेत्रामध्ये सरकारने १०० एफडीआय ला स्वचंचलित मार्गाने परवानगी दिली आहे.

**२- ऍटोमोबाईल/वाहन क्षेत्र :** भारतामध्ये ऍटोमोबाईल क्षेत्र हे देखील एक मोठे क्षेत्र आहे. भारतीय जीडीपीतील उत्पादन क्षेत्राच्या वाटयामध्ये २२ टक्के वाटा हा ऍटोमोबाईल क्षेत्राचा आहे. २०१६ मध्ये हया क्षेत्राचे उत्पादन ११० अब्ज रुपये राहण्याचा अंदाज आहे. या क्षेत्रामध्ये १०० टक्के एफडीआय ला मंजूरी देण्याची तयारी सरकारने दर्शविली




**संदर्भ -१२वीं पंचवार्षिक योजना (२००७-१२), नियोजन आयोग २०१३ विश्लेषण**

आहे. जवळपास १९ अब्ज लोकांना रोजगार पुरविण्याची कुवत ऍटोमोबाईल क्षेत्रात आहे. २०२२ पर्यंत ३५ दशलक्ष रोजगारनिर्मिती या क्षेत्रातून होण्याचा अंदाज आहे.

**३- जड उद्योग व बांधकाम उपकरणे** : २०१३ मध्ये ६.४ अब्ज डॉलर इतके मूल्याचे उत्पादन बांधकाम उपकरण क्षेत्राने केले. २०१५ पर्यंत ९.९ अब्ज तर २०२० पर्यंत २२.२ अब्ज रुपयाच्या मूल्याचे उत्पादन या क्षेत्रातून होवू शकते. बांधकाम उपकरणाची देशांतर्गत मागणी वाढण्याची संभाव्यता आहे. जड उद्योग क्षेत्र दोन भागात वर्गिकृत केले जाते. एक भांडवली वस्तू, मशीनरी व उपकरणे तर दुसरे म्हणजे रेल्वे, उर्जा व आधारभूत संरचना होय. भारतातील जड उद्योगामध्ये कौशल्यपूर्ण व कमी खर्चाचा श्रमपुरवठा यामुळे विदेशी कंपन्या आकर्षित होण्याचे संकेत आहेत.

**४- रसायन क्षेत्र** : भारत आशियातील तीसरा सर्वात मोठा रसायन निर्माण करणारा देश आहे. तर जगात १२ व्या क्रमांकावर आहे. जागतिक रसायन उत्पादन निर्मितीत ७ टक्के रसायन निर्मिती भारतातून होते. २०१७ पर्यंत २९० अब्ज डॉलर इतक्या मूल्याच्या रसायनांची निर्मिती भारतातून होण्याची शक्यता आहे. व ही वाढ प्रतिवर्ष १५ टक्के इतकी राहू शकते. सिंगापूर, जर्मनी, युएस व चिन या निर्यात भागीदार देशाचा समावेश आहे तर चीन, सौदी अरब, सिंगापूर व यूएस हे रसायनांचे आयात भागीदार देश आहेत. शासनाने रसायन उद्योगामध्ये १०० टक्के एफडीआयला मंजूरी दिली आहे.

**५- इलेक्ट्रानिक क्षेत्र** : भारतात इलेक्ट्रानिक क्षेत्रामध्ये विद्युतरोधक, इलेक्ट्रानिक टयूबची निर्मिती मोठया प्रमाणात केली जाते. २०१३ मध्ये ६८.१ अब्ज रुपये इतकी मागणी या क्षेत्रातील वस्तूंची होती. एकूण उत्पादन क्षेत्राच्या मागणीमध्ये ४० टक्के मागणी इलेक्ट्रानिक क्षेत्रातील होती.

**६- सीमेंट उद्योग** : भारतात सीमेंट उद्योग क्षेत्रामध्ये उच्च वाहतूक खर्च ही मुख्य समस्या आहे. भारतात १६७ मोठे प्रकल्प असून ९५ टक्के प्रकल्पामध्ये स्थापित क्षमता आहे. तर उर्वरित प्रकल्प हे छोटे प्रकल्प आहेत. सीमेंट उद्योग क्षेत्र भौगोलिकदृष्टया ५ क्षेत्रात आहेत. दक्षिणी-उत्तर-पूर्व-पश्चिम व मध्य. या प्रत्येक प्रदेशामध्ये चुनखडी व्याप्त क्षेत्र आहे जे सीमेंटचे प्रमुख उत्पादन केंद्र म्हणून कार्य करीत आहेत.

## उत्पादन क्षेत्राचा विकास :

उत्पादन क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी पुढील बाबींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**१- व्यापार करण्यासाठी कमी व्यापार अटी** : भारतीय बहूराष्ट्रीय कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी व त्यांना भारतात उत्पादन केंद्रे स्थापित करण्यासाठी व्यापार अटींमध्ये सुधारण करणे आवश्यक आहे.

**२- नियमांमध्ये शिथिलता** : भारत हा चिनच्या उत्पादनाला एक व्यवहार्य पर्याय होण्यासाठी लक्ष देणे आवश्यक आहे. बहूराष्ट्रीय कंपन्या हया विशेषत: भूमी, उर्जा, प्रवेश नियम इत्यादीबाबत नियमामध्ये शिथीलता आणणे आवश्यक आहे.

**३- आधारभूत संरचनांचा विकास** : भारतामध्ये उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी रेल्वे व रस्ते यांचा विकास होणे आवश्यक आहे. देशांतर्गत व्यापारासाठी आधारभूत संरचनेचा पाहिजे तीतका विकास झालेला नाही. त्यामुळे उत्पादन क्षेत्राच्या विकासामध्ये व्यत्यय येतो.

**४- बौध्दिक संपदेची सुरक्षितता** : उद्योग व हायटेक परिसरामध्ये आकर्षित करण्यासाठी सरकारव्दारे तंत्रज्ञानाच्या बौध्दिक संपदेच्या सुरक्षिततेची हमी सरकारव्दारे देणे आवश्यक आहे.

**५- श्रम सुधारणा** : श्रम सुधारणा अनेक सरकारचा प्रलंबित मुददा आहे. त्यामुळे देखील उत्पादन क्षेत्र अविकसित आहे. भारतात उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी श्रम सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने श्रम कायदे, अटी यामध्ये पारदर्शकता आणणे आवश्यक आहे.

**६- कौशल्य विकास** : भारतामध्ये कौशल्य विकासामध्ये जागतिक गुंतवणूक होण्याच्या दृष्टीने शासन गंभिर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन भारतात कौशल्य आहे व त्याचा उपयोग आपल्याला घेता येवू शकतो ही धारणा परदेशी गुंतवणूकदारांची होईल.

**७- उत्कृष्टतेचे केंद्र** : भारत हा विविध उत्पादनाबाबत एक जागतिक केंद्र बनण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. वस्तूंचा दर्जा, प्रत याबाबत गुणवत्ता आणणे आवश्यक आहे. जेणेकरुन भारतीय वस्तूंची जागतिक मागणी वाढेल.

**८- राष्ट्रीय विनिर्माण धोरण** : उत्पादन क्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी राष्ट्रीय स्तरावर धोरणाची कसून अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

## उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी धोरणे व सूधारणा :

राष्ट्रीय उत्पादन धोरण हे भारतात उत्पादन क्षेत्राच्या विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावते. या धोरणाअंतर्गत सरकारने NIMZ-National Investment & Manufacturing दहो उभारले आहेत. ज्याअंतर्गत भारतातील उत्पादन निर्माण क्षेत्राचे कार्य चालते. हे क्षेत्र ५००० हेक्टरच्या आकाराचे असते. तसेच ३० टक्के जागा ही प्रक्रिया निर्माणासाठी असते. NIMZ अंतर्गत श्रम, पर्यावरणासंबंधी अटी शिथील करण्यासंदर्भात महत्वाचे कार्य करते. तसेच विशेष सवलती देखील दिल्या जातात. तांत्रिक अधिग्रहण व विकास निधी देखील पुरविला जातो. उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी सरकारव्दारे दिल्या जाणाऱ्या सवलती पुढीलप्रमाणे-

१- भारी व जड उद्योग, बांधकाम उपकरण उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी १५ टक्के करामध्ये सवलत दिली जाते.

२- भांडवली वस्तूंवर प्रशुल्क तसेच सीमा शुल्क देखील कमी केले जाते.

३- उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी सरकारव्दारे SEZ ची संख्या वाढविण्यावर भर दिला जातो.

४- NMP-National Manufacturing Policy अंतर्गत जीडीपी मध्ये २५ टक्के वाटा उत्पादन क्षेत्राचा व्हावा व २०२२ पर्यंत १०० दशलक्ष रोजगार निर्माण होण्याच्या दृष्टीने भर दिला जात आहे.

## मेक इन इंडीया व उत्पादन क्षेत्र :

नव्या सरकारव्दारे मेक इन इंडीया ही मोहिम उत्पादन क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने उशिरा उचलेले महत्वपूर्ण पाऊल आहे. या मोहिमेअंतर्गत विविध वस्तू व उत्पादने देशातच बनविण्याचे सूतोवाच केले आहे. त्यामुळे ही मोहिम उत्पादन क्षेत्राला मोठया उंचीवर नेण्याची अपेक्षा वाढली आहे. या मोहिमेअंतर्गत उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी पुढील महत्वपूर्ण शिफारसी केलेल्या दिसून येतात.

१- संशोधन आणि विकासामध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा वाढविण्यासाठी विविध उद्योगांना अनुदाने व उद्योगप्रवृत बाबींवर विशेष भर दिला आहे.

२- रासायनिक क्षेत्रातील अनेक संचित कायदे निकाली काढून एकात्मिक विकास राबविण्याची शिफारस या मोहिमेमध्ये केली आहे.

३- कर व शुल्कामध्ये विशेष सूट देण्याची तरतूद केली आहे. रसायन उद्योगांना व तद्संबंधित उत्पादनांना यामध्ये विशेष सूट देण्यात येणार आहे.

४- एकात्मिक विकास प्रकल्पाअंतर्गत विविध उद्योगांना चालना देण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी शेती व उद्योगांसंबधित विशेष धोरणे व योजना लागू करण्यात येणार आहेत.

५- भारतात विदेशी गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने एफडीआय ला सुलभ अटी लागू करण्यात येणार आहेत.

६- रेल्वे, रस्ते यासारख्या मूलभूत आधारभूत संरचनेचा विकास करण्यात येणार आहे.

७- नव्या प्रकल्पांना कर व शुल्क सवलती देवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे. विशेषत: कोळसा उद्योगांना विशेष सवलती देण्यात येतील. ?

८- धातू व खाण उद्योगाच्या विकासामध्ये येणाऱ्या अडचणींचा निपटारा करुन या उद्योगाच्या विकासावर भर दिला जाणार आहे.

९- खाण उद्योगाच्या शाश्वत विकासासाठी नवे उपक्रम व धोरणांची अंमलबजावणी करण्याची शिफारस या मोहिमेअंतर्गत केली आहे.

१०- जड उद्योग/हेवी इंजीनिअरिंग आणि बांधकाम उपकरणे क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमीका व कामगारांना विशेष प्रशिक्षण देण्याच्या सूचना मेक इन इंडीया मोहिमेमध्ये करण्यात आली आहे.

११- झीरो डीफेक्ट आणि झीरो इफेक्ट निर्यात करण्यासाठी या मोहिमेअंतर्गत विशेष तरतूदी केल्या आहेत.

१२- कौशल्यपूर्ण मानव विकास करण्यावर भर दिला जाणार आहे.

१३- मानवी संसाधनांच्या मागणी व पुरवठयातील अंतर कमी करण्यात येणार आहे.

१४- भारतीय वस्तूंना आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त होण्यासाठी विशेष धोरण अंमलात येणार आहेत.

१५- तांत्रिक अद्यावतता आणण्यासाठी पुरेशा निधी मेक इन इंडीया अंतर्गत स्थापित करण्यात येणार नाही.

**संदर्भ :**


१- वार्षिक अहवाल २०१२-१३, खाण मंत्रालय

२- नियोजन आयोग, १२ वी पंचवार्षिक योजना

३- Automotive Manufacturing in India, Market Line Industry, May 2013 via Thomson Research, accessed August 2014.

४- Human Resource and Skill Requirments of the Auto and Auto Components Sector, NSDC.

५- www.kpmg.com.../BBC-Manufacturingsectorofindia.

६- www.ibef.org/Indian-Manufacturing

७- www.makeinindia.com

८- www.wap.business-standard.com



*(**प्राध्यापक उमेश घोडेस्वार** हे अकोला येथिल श्री शिवाजी महाविद्यालयात, अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक असुन त्यांनी अनेक मासिके वृतपत्रांमध्ये आर्थिक विषयांवर लिखाण केले आहे व निरंतर चालु आहे.)*

*संपर्कासाठी ईमेल : ghodeswar123@gmail.com*

# “मेक इन इंडिया” साठी जागतिक उत्पादन साखळीत भारताचा सहभाग

- सी वीरमणी, इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था, मुंबई.



**उत्पादन क्षेत्र हे असे क्षेत्र आहे की जर या क्षेत्राच्या विकासासाठी सर्वंकष प्रयत्नांवर जोर दिल्यास इतर संबंधित क्षेत्रांचा विकासाला अनाहुतपणे चालना मिळेल. निर्मिती क्षेत्राचा जीडीपी मधिल वाटा नेहमीच उल्लेखनीय राहिला आहे. परंतु इथे फक्त देशांतर्गत निर्मितीचा प्रश्न नाही तर जागतिक उत्पादन साखळीतील एक कडी म्हणुन भारताला विकसीत व्हायचे असल्यास इतर देशांच्या निर्मिती क्षेत्राचा अभ्यास रचना आणि विकासावर ही लक्ष केंद्रीत करावे लागेल तेव्हाचं भारताचा जागतिक निर्मिती साखळीतील नगण्य सहभाग वाढविता येईल.**

भारताच्या आर्थिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट उत्पादन क्षेत्रात जलद गतीने आणि मोठी वाढ करणे हे आहे. अगदी दुसरी पंचवार्षिक योजना सुरु झाल्यापासून म्हणजे १९५६ पासून ते आताच्या ‘मेक इन इंडिया’ घोषणेपर्यंत प्रत्येक वेळी धोरण निर्मितीकारांनी भारताचे उत्पादन वाढविण्यावर भर दिला आहे. ह्या विषयी साहजिकच एक प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे उत्पादन क्षेत्रच का? तर जगाच्या विविध भागांचा इतिहास पहिला असता वेगवेगळ्या देशांच्या आर्थिक प्रगतीत औद्योगीकाराणाचा असलेला सिंहाचा वाटा आपल्याला दिसतो. त्यामुळेच उत्पादन क्षेत्र वधविन्याविशयीचा आग्रह लक्षात येऊ शकतो. विशेषत: पूर्व आशियाई देशांमध्ये आलेल्या अनुभवावरून असे लक्षात आले आहे की शाश्वत रोजगार निर्मिती आणि दारिद्य्र निर्मुलनासाठी निर्यातक्षम औद्योगीकरण महत्वाचे आहे. भारतासारख्या देशांमध्ये कामगार पूरक असलेल्या उत्पादन क्षेत्रात वाढ झाली तर अकुशल कामगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकेल.

१९८० पासून भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनावर आधारित विकास दरात आमुलाग्र बदल झाला आहे. मात्र तरीही या संदर्भातला रचनात्मक बदल म्हणजेच कृषी क्षेत्राशी निगडीत अतिरिक्त कामगारांना अकृषक क्षेत्रांकडे वळवून पर्यायी रोजगार उपलब्ध करून देण्याचे प्रमाण अतिशय धीमं आहे. २०११ ते २०१३ ह्या काळात भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात कृषी क्षेत्राचा वाटा १८.१% एवढा होता. मात्र २०११ साली कृषी क्षेत्रातल्या रोजगाराचं प्रमाण तब्बल ४८.९% एवढं होतं. (आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५) कृषी क्षेत्रामध्ये असलेली ही अतिरिक्त गर्दी आणि भर लक्षात घेतला तर भारतात अजूनही दारिद्र्याचे इतका प्रमाण का ह्याचे उत्तर आपल्याला मिळू शकेल. चीन आणि इतर पूर्व आशियाई देशांमध्ये कृषी क्षेत्रातल्या कामगारांना इतर उत्पादन क्षेत्राकडे वळविण्याचा पारंपारिक मार्ग अनुसरला गेला. मात्र, भारतात ह्या विरुध्द चित्र दिसतं. कृषी कडून औद्योगीकरणाचा मध्यम स्तर गाठण्यापेक्षा आपण या कामगारांना थेट पुढच्या म्हणजे सेवा क्षेत्रात ढकलण्याचा प्रयत्न करतो आहोत.

## भारताच्या उत्पादन क्षेत्राची रचना आणि विकास यांतील विसंगती

भारताच्या विकास दराचे यश हे सेवा निर्माण करणाऱ्या उद्योगांवर अवलंबून आहे. अशा बहुतांश उद्योगांमध्ये कुशल कामगार शक्तीलाच रोजगार मिळू शकतो. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात २०११-२०१३ या काळात उत्पादन

क्षेत्राचा सरासरी वाटा १७.८% इतका कमी होता. (आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५). आंतरराष्ट्रीय क्षेत्राशी तुलना केली असता सकल राष्ट्रीय उत्पादनाताला उत्पादन क्षेत्राचा वाटा हा अंदाजापेक्षा बराच कमी आहे तर चीन सारख्या देशांमध्ये परिस्थिती ह्याच्या उलट आहे. (ADB २००७) भारताच्या व्यापारी निर्यातक्षम वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण १९९२ साली ७३.५% होतं. ते २०१२ मध्ये ६५% पर्यंत घसरले या उलट चीन मध्ये २०१२ साली उत्पादन क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पादनातला वाटा ३२% पर्यंत पोचला तर, व्यापारी निर्यातक्षम वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण ९४% झाले. १९९२ ते २०१२ ह्या काळात उत्पादन क्षेत्रातल्या जागतिक निर्यातीचा चीनचा वाटा २.५% वरून १६.८% पर्यंत वाढत गेला तर याच कालावधीत भारतातील वस्तूंच्या निर्यातीचे प्रमाण ०.६% वरून केवळ १.६% एवढेच वाढले.

केवळ उत्पादन क्षेत्राचा विचार केला असता भारतात या क्षेत्रात तुलनेनं कुशल आणि भांडवल पूरक उत्पादनावर भर दिला जातो. (कोचर २००६, आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५). देशातल्या ज्या निर्यातक्षम वस्तूंच्या उत्पादनात झपाटयाने वाढ होत आहे त्या एकतर कुशल मनुष्यबळ आवश्यक असलेल्या (औषधे आणि रसायने) किंवा भांडवल आवश्यक असणाऱ्या (म्हणजे वाहने किंवा त्यांचे सुटे भाग) वस्तू आहेत. १९९३ ते २०१० या काळात भांडवल पूरक उत्पादनांच्या प्रमाणात जवळपास दुप्पट म्हणजे २५% पासून तर ५४% पर्यंत वाढ झाली. मात्र दुसरीकडे अकुशल कामगार पूरक उत्पादनांचे प्रमाण ३०% वरून १५%वर म्हणजे अर्ध्यावर आलं. (वीरमणी २०१२). चीनच्या रोजगार पूरक विकासाच्या तुलनेत भारतीय उत्पादन विकासाने भांडवल पूरक मार्गाचा अवलंब केलेला दिसतो. ह्या आकडेवारीवरून विकासाच्या संपूर्ण चित्रातली विसंगती हेच अधोरेखित करते की, भारताचा खरा विकास अकुशल कामगार पूरक उत्पादन क्षेत्रांना बळकटी देण्यातच दडला आहे.

तळटीप १ समभागांच्या किंमतीचा अंदाज बांधतांना उत्पादन क्षेत्रातल्या समभागांचा दरडोई सकल राष्ट्रीय उत्पादनातला वाटा आणि देशांमध्ये त्यात होणारी घसरण याचं गणित मांडून केला जातो. यात देशाची लोकसंख्या, सकल राष्ट्रीय उत्पादनातला परकीय व्यापाराचा वाट इत्यादींचाही विचार केला जातो. वर्ष २००० मध्ये या समभागांचा अंदाज भारत आणि चीन साठी अनुक्रमे २० आणि २७% एवढा होता. तर, समभागांची प्रत्यक्षात किंमत भारतात १६% तर चीन मध्ये ३५% एवढी होती.

२. भारताची उद्योग क्षेत्रतील वाढ ही भांडवली अतिदक्ष संबंधित मार्ग अवलंविला आहे. अत्यंत कमी वृद्धी दर असलेला रोजगार हा एक एव्हीडंट असुन हा मुल्याधारित भांडवली स्टॉक पेक्षाही कमी आहे. १९७३ ते २००३ दरम्यान दरवर्षी १.३% रोजगार वाढ झाल्याचे नोंदले आहे. जेव्हा की भाग भाडंवलात दरवर्षी ७.३% जलद गतीने वाढ नोंदविण्यात आली. मुल्याधारित निर्मिती क्षेत्राची वाढ ६% आहे. (गुप्ता २००८)

## जागतिक उत्पादन क्षेत्राचे वाढते जाळे

जागतिक पातळीवर विविध शुल्क आणि तंत्रज्ञानाच्या किंमती खाली घसरल्यामुळे तसेचं वाहतूक आणि दळणवळणाचे दरही कमी झाल्यामुळे अनेक देशांमध्ये निर्मिती क्षेत्राचा विकास होऊन विविध उद्योग सुरु झाले. विशेषत: १९८० नंतर आंतराराष्ट्रीय स्तरावर झालेल्या घडामोडींमुळे वैश्विक व्यापाराचा चेहरा आणि पध्दती यात महत्वाचे बदल झाले आहेत. अनेक देशांनी एखादे तयार उत्पादन किंवा वस्तू यांचा व्यापार करण्यापेक्षा त्या वस्तूसाठी लागणऱ्या कच्च्या मालाची निर्मिती करण्यात प्राविण्य मिळवलं असून त्या आधारे व्यापार वाढवला आहे. एखाद्या तयार उत्पादनाचा व्यापार करण्यापेक्षा त्यासाठी लागणाऱ्या सुट्या भागांचा किंवा कच्च्या पदार्थांचा व्यापार हा अधिक जलद गतीने होऊ शकतो कारण हा व्यापार तयार वस्तूच्या निर्यातीला लागणाऱ्या वेळेपेक्षा अधिक वेळा होऊ शकतो. अशा प्रकारच्या व्यापारात मालाच्या उत्पादनाची प्रक्रिया क्रमबद्ध आणि अनेक देशांमध्ये व्यापाराची साखळीच निर्माण करणारी असते. अशा प्रकारच्या व्यापाराला विखंडीत व्यापार, मध्यम उत्पादनांचा व्यापार विभागवार अशा विविध नावांनी ओळखला जातो.

जागतिक उत्पादनाचे जाळे ही संकल्पना विकसित करतांना एक उत्पादन तयार करणारी कंपनी आणि त्या

उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या वस्तूचे पुरवठादार देश यांच्यातली गुंतागुंतीच्या साखळीचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. उत्पादन क्षेत्राचा वैश्विक अभ्यास करतांना आपल्या लक्षात येतं की, हे क्षेत्रं केवळ तयार वस्तूंच्या आयात निर्याती पुरते मर्यादित नसून त्यासाठी लागणारे सुटे भाग आणि कच्च्या वस्तूंच्या देवघेवीचा आहे. प्रत्येक देशाचे कच्चे उत्पादन तयार करण्यात प्राविण्य असू शकतं. त्यासाठी त्या देशातल्या स्त्रोताच्या आधारावर वस्तूच्या उत्पादनाचा खर्च ठरतो. तुलनात्मक दृष्ट्या पाहिले तर प्रत्येक देशात तयार झालेले सुटे भाग मिळून तयार झालेलं अंतिम उत्पादनाची किंमत निश्चित होत असते.

काही उद्योगांमध्ये जसे इलेक्ट्रॉनिक आणि वाहन उद्योग क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे विविध स्तरांवर उत्पादन प्रक्रिया विभाजित होणं शक्य होते. अशा वेगवेगळ्या भागांचे उत्पादन करतांना उद्योजक त्या भागांच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल स्वस्त दारात आणि मुबलक उपलब्ध असणऱ्या देशांना प्राधान्य देतात. अशा रचनेमुळे विखंडीत व्यापाराला प्रोत्साहन मिळते. ज्या देशात विपुल कामगार आहेत अशा (कारखाना आधारित अर्थव्यवस्था) चीन सारख्या देशांमध्ये वस्तूंच्या उत्पादनात लागणाऱ्या अकुशल कामगारांच्या सहभागातून तयार होणारे भाग बनवले जातात. तर भांडवल आणि कुशल मनुष्यबळ असलेल्या देशांमध्ये (मुख्यालय असलेल्या अर्थव्यवस्था) अंतिम उत्पादन केले जाते. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय कंपन्या एखाद्या उत्पादनाच्या अंतिम टप्प्यात विकसित आणि श्रीमंत देशांमध्ये व्यापार प्रस्थापित करू शकतात (उदा. अमेरिका, युरोप, जपान), मात्र या उत्पादनासाठी लागणाऱ्या सुट्या भागांचे उत्पादन रोजगाराचे दर कमी असणाऱ्या चीन आणि व्हिएतनाम सारख्या देशांमध्ये करू शकतात.

उत्पादन क्षेत्राचे जाळ जगभर पसरले असले तरी त्यातही पूर्व आशिया आणि चीन या देशांत झालेला त्याचा विकास लक्षणीय आहे. या बाबतीत अनुभवांच्या आधारे केलेल्या अध्ययनावरून असे सिद्ध झाले आहे की विखंडीत व्यापार पध्दतीवर आधारित आयात निर्यातीमुळे पूर्व आशियाई देशांमध्ये निर्यात व्यापाराला मोठं यश आणि चालना मिळाली आहे. चीनने १९९० पासून आपल्या निर्यात धोरणात बदल करत देशी उद्योगांना मोठ्या खुबीने जागतिक उत्पादन क्षेत्राशी जोडले आहे. पूर्व आशियाच्या तुलनेत छोटं असलेलं उत्पादन क्षेत्राचं जाळ आपल्याला युरोप आणि उत्तर अमेरीकेतल्या काही देशांमध्येही दिसून येतं.

चीन मधून निर्यात होणारे यंत्रांचे विविध भाग हे त्या देशाच्या जागतिक उत्पादन क्षेत्रातील सहभागाच्या प्रसिद्धीचे मुख्य कारण आहे. वर्ष २०१० मध्ये चीनच्या एकूण निर्यातीत यंत्रे आणि दळणवळण साहित्याचा ५२% वाटा होता जो ह्या प्रवर्गातील जागतिक निर्यातीच्या २०% होता. अंतर्गत आणि जागतिक उत्पादन क्षेत्राचे उच्च कोटी एकात्मीकरण ह्यामुळे चीनच्या यंत्र निर्यात व्यवसायाची जोमाने वाढ झाली. (अथुकोराला, २०१२)

विशेषत्वाने, आयातीत सुट्या भागांवर आधारित व्यवसायामुळे चीन हा इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल वस्तूंच्या जोडणी चे जागतिक केंद्र म्हणून उदयास आला आहे. विशेष करून चीन पूर्व आशीया च्या विविध देशांमधून सुटे भाग आयात करून अमेरिका आणि युरोप ला तयार मालाची निर्यात करतो. ह्या कार्यपद्धतीत सुट्या भागांची आयात करणे आणि त्यापासून तयार केलेल्या मालाची निर्यात करणे हा मुख्य भाग असतो, त्यामुळे निर्यात केलेल्या उत्पादनात प्रती भाग निव्वळ स्वदेशी मूल्यवृद्धी सामान्यपणे फार कमी असते. मात्र, सामान्यपणे अशा कामांची व्याप्ती फार जास्त असल्याने, एकूण स्वदेशी मूल्यवृद्धी चीन मधल्या स्थलांतरित कामगारांसाठी रोजगार निर्मितीत ह्याचा फार मोठा वाटा असतो.

## जागतिक उत्पादन जाळ्यात भारताचा सहभाग

चीनच्या उलट, गुणवत्ता आधारित उत्पादन क्षेत्रात व्यक्ती केंद्रित विशेषत: असल्याने भारत उत्पादन उद्योगाच्या प्रादेशिक आणि जागतिक पुरवठा साखळीच्या बाहेर राहिला आहे. पूर्व आशयाई देशांच्या अनुभवातून एक गोष्ट लक्षात येते की जागतिक उत्पादन जाळ्यात भारताची निस्तेज कामगिरी हे त्याचे जागतिक उत्पादन जाळ्यात सहभागी नसण्याचे मुख्य कारण आहे.

क्रुगर (२०१०, पृष्ठ क्र ४२४) म्हणतो, ''....पूर्व आणि दक्षिण पूर्व आशियाई देशांनी अकुशल कामगार

आधारित उद्योगांसाठी निर्यातिचे व्यासपीठ म्हणून आपल्या देशात आकृष्ट केलेल्या गुंतवणूकदारांना भारत आपल्या कडे आकृष्ट करू शकला नाही.'' अथुकोराला (२०१४) म्हणतो चीन आणि इतर पूर्व आशियाई देशांमध्ये निर्यातीला भरीव चालना देणाऱ्या इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल उत्पादनांच्या जागतिक निर्मिती जाळ्यात स्वत:ची जागा निर्माण करू शकलेला नाही. अनेक बहुराष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल कंपन्यांनी भारतात आपले कारखाने सुरु केले आहेत. मात्र तेथे घरगुती बाजारपेठेसाठीच उत्पादन होते. मात्र, वाहन उद्योग क्षेत्राच्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, भारत जागतिक उत्पादन जाळ्यात भक्कम पणे आपली जागा निर्माण करतो आहे. (तिवारी, वीरमणी आणि सिंग, २०१५; अथुकोराला २०१४). अनेक मोठ्या वाहन उत्पादक कंपन्यांनी भारतात आपले कारखाने सुरु केले आहेत आणि काहींनी त्या कारखान्यांचा निर्यात तळ म्हणून उपयोग करायला सुरवात केली आहे. वर्ष २००० च्या सुरवातीपासून भारतातून तयार गाड्यांची निर्यात, वाहनांच्या सुट्या भागांच्या निर्यातीपेक्षा जास्त वेगाने वाढली आहे. (अथुकोराला, २०१४). जरी भारतातून तयार गाड्यांची निर्यात वाढली असली तरी, इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल वस्तूंचा विखंडीत व्यापारातील भारत हा एक मोठा खेळाडू आहे.

जागतिक उत्पादन जाळ्यातील भारताच्या असमाधानकारक सहभागाचे स्पष्टीकरण कशावरून होते ?

भारतातील व्यापार नीती कामगार विरोधी प्रोत्साहन देत नसल्यामुळे जागतिक उत्पादन साखळीत आशियातील वेगाने विकसित होणाऱ्या देशांपेक्षा भारत मागे राहिला आहे. भारताच्या आयात विकल्प नीती चा भांडवल आणि कौशल्य आधारित उत्पादनाकडे कल होता व त्यानुसार प्रोत्साहन दिले गेले. आणि १९९१ पासून आलेल्या सुधारणा देखील यात फारसा बदल करू शकलेल्या नाहीत. जरी, १९९१ नंतरच्या नीतीगट सुधारणांमुळे प्रवेशांतील अडथळे दूर करून बाजार उदारीकरणाच्या दिशेने महत्वाची प्रगती केली, तरी कामगार आणि जमीन अधिग्रहण नीती मध्ये अनेक विपर्यास आणि नीतीगत ताठरपणा आहे. विशेषत: भारताचे प्राचीन कामगार कायदे हा मोठ्या उद्योगांसाठी फार मोठा अडथळा आहे. त्यामुळे ते उद्योग कामगार प्रोत्साहन कार्यक्रम आणि तंत्रज्ञान निवडण्यापासून परावृत्त होतात. (क्रुगर २०१०; कोचर ईटी एएल. २००६; पंगारिया २००७). कामगार क्षेत्रात सरकारच्या हस्तक्षेपामुळे नकळतपणे कामगार-प्रोत्साहन आधारित निर्मिती क्षेत्रा विषयी भेद निर्माण झाला.

थेट परकीय गुंतवणूक हे चीनच्या उत्पादन क्षेत्राच्या जागतिक उत्पादन साखळीत एकीकृत होण्याचे मुख्य कारण आहे. चीन मध्ये होणाऱ्या जागतिक थेट गुंतवणुकीचा मोठा भाग निर्यात वाढीला चालना देणारा होता, जो बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादन प्रक्रियेचा जागतिक विखंडनाचे प्रातिनिधिक स्वरूप आहे. त्याउलट, भारतातील थेट परकीय गुंतवणूक ही निर्यात केंद्रित नसून मुख्यत्वे करून बाजार केंद्रित आहे. भारतात होणारी थेट परकीय गुंतवणुक ही बाजार केंद्रित असणे आणि चीन मध्ये ती निर्यात केंद्रित असणे हे कशावरून स्पष्ट होते ? सर्वप्रथम, चीन मध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांना निर्यात केंद्रित उद्योगांसाठी विविध कर भांडवल, भाडे याबाबत निर्णय घेण्याची मुभा होती हेचं चीनच्या घवघवीत यशाची किल्ली आहे.

### जागतिक उत्पादन नेटवर्कींगमध्ये भारताचा सहभाग

चीनच्या उलट, गुणवत्ता आधारित उत्पादन क्षेत्रात व्यक्ती केंद्रित विशेषता असल्याने भारत उत्पादन उद्योगाच्या प्रादेशिक आणि जागतिक पुरवठा साखळीच्या बाहेर राहिला आहे. पूर्व आशयाई देशांच्या अनुभवातून एक गोष्ट लक्षात येते की, जागतिक उत्पादन जाळ्यात भारताची अउल्लेखनीय कामगिरी हे त्याचे जागतिक उत्पादन जाळ्यात सहभागी नसण्याचे मुख्य कारण आहे.

क्रुगर (२०१०, पृष्ठ क्र ४२४) म्हणतो, ''....पूर्व आणि दक्षिण पूर्व आशियाई देशांनी अकुशल कामगार आधारित उद्योगांसाठी निर्यातिचे व्यासपीठ म्हणून आपल्या देशात आकृष्ट केलेल्या गुंतवणूकदारांना भारत आपल्याकडे आकृष्ट करू शकला नाही.'' अथुकोराला (२०१४) म्हणतो चीन आणि इतर पूर्व आशियाई देशांमध्ये निर्यातीला भरीव चालना देणाऱ्या इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल उत्पादनांच्या जागतिक

निर्मिती जाळ्यात स्वत:ची जागा निर्माण करू शकलेला नाही. अनेक बहुराष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल कंपन्यांनी भारतात आपले कारखाने सुरु केले आहेत. मात्र तेथे घरगुती बाजारपेठेसाठीच उत्पादन होते. मात्र, वाहन उद्योग क्षेत्राच्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, भारत जागतिक उत्पादन जाळ्यात भक्कम पणे आपली जागा निर्माण करतो आहे. (तिवारी, वीरमणी आणि सिंग, २०१५; अथुकोराला २०१४). अनेक मोठ्या वाहन उत्पादक कंपन्यांनी भारतात आपले कारखाने सुरु केले आहेत आणि काहींनी त्या कारखान्यांचा निर्यात तळ म्हणून उपयोग करायला सुरवात केली आहे. वर्ष २००० च्या सुरवातीपासून भारतातून तयार गाड्यांची निर्यात, वाहनांच्या सुट्या भागांच्या निर्यातीपेक्षा जास्त वेगाने वाढली आहे. (अथुकोराला, २०१४). जरी भारतातून तयार गाड्यांची निर्यात वाढली असली तरी, इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल वस्तूंचा विखंडीत व्यापारातील भारत हा एक मोठा खेळाडू आहे.

### जागतिक उत्पादन जाळ्यातील भारताच्या असमाधानकारक सहभागाचे स्पष्टीकरण कशावरून होते ?

भारतातील व्यापार नीती कामगार विरोधी प्रोत्साहन देत नसल्यामुळे जागतिक उत्पादन साखळीत आशियातील वेगाने विकसित होणऱ्या देशांपेक्षा भारत मागे राहिला आहे. भारताच्या आयात विकल्प नीती चा भांडवल आणि कौशल्य आधारित उत्पादनाकडे कल होता व त्यानुसार प्रोत्साहन दिले गेले. आणि १९९१ पासून झालेल्या सुधारणा देखील यात फारसा बदल करू शकलेल्या नाहीत. जरी, १९९१ नंतरच्या नीतीगट सुधारणांमुळे प्रवेशांतील अडथळे दूर करून बाजार उदारीकरणाच्या दिशेने महत्वाची प्रगती केली, तरी कामगार आणि जमीन अधिग्रहण नीती मध्ये अनेक विपर्यास आणि नीतीगत ताठरपणा आहे. विशेषत: भारताचे ''प्राचीन कामगार कायदे'' हा मोठ्या उद्योगांसाठी फार मोठा अडथळा आहे. त्यामुळे ते उद्योग कामगार प्रोत्साहन कार्यक्रम आणि तंत्रज्ञान निवडण्यापासून परावृत्त होतात. (क्रुगर २०१०; कोचर ईटी एएल. २००६; पंगारिया २००७). कामगार क्षेत्रात सरकारच्या हस्तक्षेपामुळे नकळतपणे कामगार-प्रोत्साहन आधारित निर्मिती क्षेत्रा विषयी भेद निर्माण झाला.


१. एडीबी (२००७) आशियन विकास आऊटलुक, मनिला : आशियन विकास बँक

२. अथुकोराला, प्रेम चंद्रा (२०१२) 'आशियन व्यापार स्त्रोत: दृष्टीकोन, पद्धत आणि भविष्य, जपान आणि ३ जागतिक अर्थव्यवस्था २४ (२) : १५०-१६२

(३) मिनु तिवारी, सी. विरामणी मनजीता सिंग (२०१५), विभागीय उत्पादन नेटवर्क मध्ये भारताचा सहभाग वाढविण्यासाठी संभाव्यता : भारत आणि आशिया मधिल समांतर विशेष व्यापार पद्धती, आसीआरआयईआर वर्कींग पेपर २९२.

(४) क्रुरएगर ॲने ओ. (२०१०) भारताचा जागतिक पातळीवर बाजार - आढाव्या आणि भवितव्य - शंकर आचार्य आणि राकेश मोहन, भारतीय अर्थव्यवस्था - कामगिरी आणि आव्हाने : नवी दिल्ली - ऑक्सफर्ड युनिर्व्हीसिटी प्रेस ३९९-४२९



*(**सी. विरामणी** हे इंदिरा गांधी संशोधन विकास संस्था, मुंबई (आय जी आय डी आर) येथे ''आंतरराष्ट्रीय व्यापार'' विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणुन काम बघतात. यापुर्वी त्यांनी आयआयटी मुंबई आणि आयसीआरआयईआर नवी दिल्ली येथे काम केले आहे. त्यांना २००३ चा एक्झिम बँक आंतरराष्ट्रीय आर्थिक विकास संशोधन पुरस्कार मिळाला असुन त्यांनी विविध इंग्रजी पेपर्स मधुन लेखन केले आहे.)*

***संपर्कासाठी ईमेल -*** **veeramani@igidr.ac.in**


## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी खाली नमूद केलेल्या फॉन्ट पैकी कोणत्याही एका फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत.

KRUTI DEV or APS or Mangal or DVTT or SHIVAJI or SHREE LIPI, हे नम्र आवाहन.

# लोकसंख्याविषयक लाभासाठी आशादायी केंद्रीय अर्थसंकल्प

- प्रा. डॉ. रूपा शहा



**वर्ष २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात भू-संपादन कायद्यात करणयात आलेले बदल, शेतकरीभिमुख नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर विविध शेतकरी संघटनां तर्फे झालेला विरोध लक्षात घेतल्यास भू-संपादन कायदा आणि शेतकरी पुर्नवसन हा किती महत्वाचा, गंभीर विषय आहे हे लक्षात येईल.**

**वर्ष २०२२ पर्यंत भारतातील सरासरी वय आणि त्याची कार्यक्षमता, देशाची लोकसंख्या तिचे तरूण वर्गाशी असलेल प्रमाण हे सर्व लक्षात घेतल्यास सध्याचा हा काळ देशविकासासाठी 'सुवर्ण संधीचा, काळ आहे. 'डेमोग्राफिक डिव्हीडंड' म्हणजेच ''लोकशाही लाभांश'' मिळविण्याचा काळ आहे. लोकशाही लाभांश ही जरी नवी संकल्पना असली तरी भारतात दृढ व्हायला वेळ लागणार नाही.**

दरवर्षी अर्थसंकल्प सादर होतो तेव्हा सत्ताधारी वर्ग त्याची भलावण करतो, तर विरोधात असणारे अर्थसंकल्प कसा सर्वसामान्य माणसांविरुद्ध आहे, अशी टीका करतात. वर्षानुवर्षे हे घडत आलेलं आहे. यावर्षीही हेच घडलं; पण सत्तेमध्ये असणारे पक्ष बदललेले असल्याने इ. स. २०१५-१६ या वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या भूमिकेबद्दल आणि त्याच्या बर्या-वाईट परिणामांबद्दल अधिक तपशिलात जाणून घेणे ही बाब आवश्यक ठरते. राष्ट्रीय पातळीवरच्या नव्या भूसंपादनविषयक कायद्याच्या अनुषंगाने चर्चा, वादविवाद आणि संघर्ष सुरू असताना हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांच्याकडून प्रत्यक्ष अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या अनुषंगाने आपले विचार मांडताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांकडून होणाऱ्या सर्व प्रकारच्या टीकेचा यथायोग्य समाचार घेत आपल्या सरकारच्या वाटचालीची दिशा स्पष्ट केली. भूसंपादनविषयक कायद्यात देशामध्ये जवळपास सव्वाशे वर्षे काही बदलच झालेला नव्हता आणि तो करणे आवश्यक बनल्यानंतर काँग्रेसप्रणीत आघाडीचे सरकार सत्तेत असताना या कायद्यात बदलाची भूमिका सरकारने घेतली तेव्हा भारतीय जनता पक्षाने तिला विरोध केला नव्हता, असे सांगून श्री. मोदी यांनी देशातील गुंतवणूक वाढायची, उद्योग क्षेत्राला चांगले दिवस यायचे व रोजगार निर्मिती व्हायची तर नव्या भूसंपादन कायद्याची गरज असल्याचे रोखठोकपणे सांगितले. नव्या कायद्यामध्ये एकही तरतूद शेतकरीविरोधी असेल तर ती बदलण्याची आपली तयारी असल्याचे श्री. मोदी म्हणाले. दरम्यान, या कायद्याला ज्यांचा विरोध आहे त्यांची भूमिका अशी की, नव्या कायद्यात ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित केली जाईल त्यांना चौपट मोबदला देण्यासारखी तरतूद असली तरी त्या शेतकऱ्याच्या पुनर्वसनाबाबत कोणतीही स्पष्टता नाही आणि त्यापेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे पूर्वी जमीन संपादन करताना ८० टक्के शेतकऱ्यांची मान्यता आवश्यक असे; पण नव्या कायद्यात शेतकऱ्यांच्या मान्यतेशिवाय त्यांची जमीन सरकार काढून घेऊ शकणार आहे आणि ही तरतूद अत्यंत घातक व शेतकरीविरोधी आहे.

नव्या भूसंपादन कायद्याबाबत असे रणकंदन करण्याची केंद्र सरकारला का गरज भासते आहे? नव्या वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात कार्पोरेट क्षेत्रासाठी व उद्योजकांसाठी पायघड्या घालण्याची आवश्यकता का आहे? या प्रश्नांची उत्तरे सध्या केंद्रात सत्तेमध्ये असलेल्या सरकारसमोरच्या आव्हानांमध्ये दडलेली आहेत. ही आव्हाने नेमकी समजून घ्यायची तर त्यासाठी डेमोग्राफिक डिव्हीडंड ही संकल्पना आणि देश विकासात व आर्थिक

विकासात एक मोठी झेप घेण्याच्या दृष्टीने डेमोग्राफिक डिव्हीडंडचा लाभ उठवायचा तर त्यासाठी काय करणे आवश्यक आहे या बाबी जाणून घ्यायला हव्यात.

## सुवर्णसंधी

इ. स. २०२२ मध्ये भारतीय व्यक्तींचे सरासरी वय २९, चीन व अमेरिकेतील व्यक्तींचे सरासरी वय ३७ आणि पश्चिम युरोपमधील व्यक्तींचे सरासरी वय ४५ च्या घरात असेल. याचाच अर्थ असा की, जगभरातील देशातील तरुण व कार्यक्षम व्यक्तींच्या प्रमाणात भारतातील तरुण व कार्यक्षम व्यक्तींची संख्या निश्चितपणे कितीतरी अधिक असेल. कोणत्याही देशाच्या लोकसंख्येचा विकास होत असताना हा विकास वेगवेगळ्या कारणांनी एका अशा टप्प्यावर पोहोचतो जेव्हा देशातील इतरांवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या ही उत्पादक वयोगटातील लोकसंख्येच्या तुलनेत कमी असते. अशी स्थिती साधारणपणे देशाच्या वाटचालीत २० ते ३० वर्षे राहू शकते. लोकसंख्येच्या विभागणीतील अशी स्थिती म्हणजे देशाच्या आर्थिक प्रगतीसाठीची सुवर्णसंधी मानली जाते, याला डेमोग्राफिक डिव्हीडंड मिळू शकण्याचा काळ म्हणून देशाच्या वाटचालीत अत्यंतिक महत्त्व आहे. चीन, अमेरिका यासारखे देश आता अशा सुवर्णसंधीच्या काळाच्या अखेरच्या टप्प्यात आहेत, तर भारतासारखा देश अशा काळाच्या दिशेने वाटचाल करतो आहे आणि साधारण इ. स. २०४५ पर्यंतचा काळ हा भारतासाठी डेमोग्राफिक डिव्हीडंडचा लाभ उठवण्याचा काळ असणार आहे, असे अभ्यासकांचे मत आहे.

भारत अशा काळाच्या दिशेने वाटचाल करीत असल्याची जाणीव १९८० पासून विविध वयोगटातील लोकसंख्येचा जो अभ्यास इंटरनॅशनल मॉनिटरी फंडाकडून करण्यात येत होता त्यातून अधिक स्पष्टपणे झाली. इ. स. २०११ मध्ये याबाबतचा पेपर इंटरनॅशनल मॉनिटरी फंडाकडून प्रसिद्ध करण्यात आला. यु. एस. सेन्सस ब्युरोनेदेखील इ. स. २०२५ पर्यंत कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्येच्या बाबतीत भारत चीनला मागे टाकेल, असा कयास व्यक्त केलेला आहे. याचा योग्य पद्धतीने लाभ उठवला गेला तर भारतातील दरडोई उत्पन्नात दरवर्षी किमान २ टक्के वाढ केली जाऊ शकते. अर्थात हे करत असताना भविष्यात म्हणजे इ. स. २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या १६९ कोटीवर जाऊ शकते हे लक्षात घेऊन त्यावेळी या लोकसंख्येची अन्न, पाणी व ऊर्जाविषयक गरज योग्य पद्धतीने भागवण्याच्या दृष्टीने नियोजनाची गरज आहे.

## लाभ मिळविण्यातील आव्हाने

डेमोग्राफिक डिव्हीडंड मिळू शकण्याच्या काळाचा जास्तीत जास्त लाभ भारत कसा उठवू शकतो आणि त्यासाठीची आव्हाने पेलण्याची क्षमता भारतासारख्या देशात आहे का? हा आज एक कळीचा प्रश्न आहे. डेमोग्राफिक डिव्हीडंडचा लाभ उठवायचा तर त्यासाठी मोठ्या प्रमाणावर उद्योग क्षेत्रात गुंतवणुकीला प्रोत्साहन, कुशल मनुष्यबळाची निर्मिती, राष्ट्रीय पातळीवर बचतीच्या दरात मोठी वाढ करण्याची गरज, काळ्या पैशावर व जन्मदरावर नियंत्रण (जेणेकरून कुटुंबांवरचा आर्थिक ताण कमी होईल तसेच आरोग्यसंपन्नता वाढण्यास मदत होईल) अशा बाबींवर कसोशीने भर द्यावा लागणार आहे.

## 'मेक इन इंडिया' आणि प्रश्न

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या देश-विदेशात दौरे करून 'मेक इन इंडिया'चा नारा देत आहेत. देशांतर्गत उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढ हा ही घोषणा देण्यामागचा उद्देश आहे. उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक व्हावी यादृष्टीने बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी पायघड्या घालण्यात येत आहेत. नव्याने उभारल्या जाणाऱ्या उद्योगांसाठी बिझनेस कॉरिडॉर्स निर्माण करणे, सेझचे शक्य तितक्या ठिकाणी पुनरूज्जीवन करणे आणि त्यासाठी गतिमानपणे भूसंपादन प्रक्रिया राबवणे अशी पावले उचलण्यात येत आहेत. आज भारतातील कुशल मनुष्यबळ हे ३.४ दशलक्ष इतके आहे आणि इंडियन लेबर ऑर्गनायझेशनच्या अंदाजानुसार इ. स. २०२२ मध्ये भारतात ५०० दशलक्ष इतक्या कुशल कामगारांची गरज भासणार आहे. केवळ ७ वर्षांच्या मुदतीत कुशल कामगारांची संख्या इतक्या प्रमाणात वाढवणे हे आव्हान न पेलणारे आहे. मान्य आहे की, केंद्र शासनाने व्होकेशनल एज्युकेशन आणि ट्रेनिंगवर भर देत कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर एक धोरण निश्चित केले आहे. आगामी दहा वर्षांसाठी व्यावसायिक कौशल्य विकास याला राष्ट्रीय पातळीवर अग्रक्रम देण्यात आला आहे आणि ११ व्या पंचवार्षिक योजनेत यादृष्टीने तरतूद करण्यात आली आहे. या पलीकडे जाऊन देशात नव्याने १५०० आय.टी.आय. व ५ हजार कौशल्य विकास केंद्रे सुरू केली जात आहेत. इतके सगळे केले तरीही

उद्योगांसाठी व स्मार्ट सिटी विकासासाठी भूसंपादनातून निर्माण होणारे प्रश्न आणि आवश्यक कुशल मनुष्यबळाची परिपूर्ती होऊ शकेल का? याची उत्तरे पूर्णतया मिळू शकतील याची खात्री आज तरी देता येत नाही. अर्थात प्रयत्न न करताच हार मानण्यापेक्षा शक्य ते सर्व प्रयत्न करून डेमोग्राफिक डिव्हीडंडचा जितका लाभ उठवता येणे शक्य होईल तितका उठवणे हीच बाब देशहिताची आहे, असे सध्या केंद्रात सत्तेत असलेल्या मोदी सरकारला वाटत असेल तर ती बाब चुकीची नाही किंबहुना याचेच प्रतिबिंब २०१५-१६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात पडलेले पहायला मिळते.

## कार्पोरेट क्षेत्राला सवलती

केंद्रीय अर्थसंकल्पात कार्पोरेट क्षेत्राला अनेक सवलती देण्याची घोषणा करण्यात आली आहे. उदा. पुढील ४ वर्षांसाठी कंपनी कर ५ टक्क्यांनी कमी केला आहे. त्याचबरोबर संपत्ती कर रद्द करून त्याऐवजी श्रीमंत नागरिकांकरिता २ टक्के अतिरिक्त अधिभार लावण्यात आला आहे. बचतीला प्रोत्साहन मिळावे म्हणून ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६ ते १० लाख रुपयांच्या घरात आहे त्यांना योग्य बचत करून ४ लाख ४४ हजार २०० रुपयांची कर वजावट मिळवता येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे. एकूण उत्पन्नावर मिळणारी अडीच लाखांची वजावट, पेन्शन फंडातील गुंतवणूक ५० हजारांनी वाढवल्यास ८० सी अंतर्गत दीड लाखांची वजावट, आरोग्य विम्याची प्रिमीयमची १५ हजारांची मर्यादा १० हजारांनी वाढवल्यास ८० डी अंतर्गत वाढवलेली २५ हजार रुपयांची वजावट, दरमहा ८०० रुपयांचा प्रवास भत्ता १६०० रुपये केल्याने वर्षाकाठी मिळणारी १९,२०० रुपयांची वजावट अशी एकूण ४ लाख ४४ हजार २०० रुपयांची कर वजावटीची वाढीव मर्यादा ही मध्यमवर्गीय कुटुंबांना बचतीसाठी प्रवृत्त करण्यासाठीच आहे.

## कुशल मनुष्यबळासाठी

कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि देशातील प्रत्येक व्यक्तीला इ. स. २०२२ पर्यंत रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य करता यावे म्हणून आयटी उद्योगासाठी 'सेतू' योजना आखून त्याकरिता १ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रासाठी एकूण ६८ हजार ९६८ कोटी रुपयांची तरतूद आहे आणि वेगवेगळ्या राज्यात शिक्षणासाठीच्या सार्वजनिक संस्थांच्या माध्यमातून प्रत्येक पात्र व्यक्तीसाठी शिक्षणावर भर दिला गेला आहे. नवे उद्योग स्थापणाऱ्या तरुणांसाठी सेतू म्हणजेच सेल्फ एम्प्लॉयमेंट अँड टॅलेंट ॲक्विझिशन प्रोग्राम सादर करण्यात आला आहे. ३१ सेक्टर्समधील प्रक्रियांचे आणि त्यांच्या परिणामांचे प्रमाणीकरण करण्याचा फायदा पायाभूत सुविधांचा विकास योग्य दिशेने होण्यासाठी होऊ शकेल. दीनदयाळ उपाध्याय योजनेंतर्गत १५०० कोटी रुपये रकमेची तरतूद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही रक्कम थेट विद्यार्थ्यांपर्यंत डिजीटल व्हाऊचरच्या माध्यमातून पोहोचणार आहे. नवीन 'एम्स', 'आयआयएम' आणि 'आयआयटी' स्थापण होणे ही बाबही तरुणांसाठी लाभदायक ठरणारी आहे.

## काळ्या पैशावर नियंत्रण

कुशल मनुष्यबळ, गुंतवणूक तसेच बचतीला प्रोत्साहन याच्या जोडीला पायाभूत विकास या अर्थसंकल्पात महत्त्वाचा मानण्यात आला आहे. परदेशात असलेला काळा पैसा भारतात आणण्यासाठी नवे विधेयक मांडण्याची घोषणा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्र्यांनी केली आहे. खरे उत्पन्न लपवल्यास तसेच परदेशातील मालमत्तेबाबत करचुकवेगिरी केल्यास दहा वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा तसेच ३०० टक्के दंडाची आकारणी अशा कठोर तरतुदींबाबत सुतोवाच करून काळ्या पैशांवर नियंत्रण आणण्याचा आपला इरादा सरकारने स्पष्ट केला आहे. २० हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेचा व्यवहार करताना पॅन कार्ड आवश्यक ठरवणे, १ लाख रुपयांपेक्षा जास्ती रकमेचा व्यवहार रोखीत न करण्याबाबतचा नियम या बाबीही काळ्या पैशाला रोखण्यासाठीच अर्थसंकल्पात नमूद आहेत.

## सामाजिक सुरक्षा योजना

अटल पेन्शन योजना, पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना, जनसुरक्षा योजना यासारख्या योजनांच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकासाठी सामाजिक सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. १८ ते ५० वर्षे वयोगटातील नागरिक दरवर्षी केवळ ३३० रुपयांचा प्रीमियम भरून २ लाख रुपयांच्या पंतप्रधान जीवनज्योती विमा योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत. पंतप्रधान जनधन योजनेचा भाग म्हणून समोर आणलेल्या पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचा लाभ दरवर्षी केवळ १२ रुपये भरून घेता येऊ

शकणार आहे. याखेरीज अटल पेन्शन योजनेद्वारे ठराविक मुदतीसाठी ठराविक ठेवी असलेल्यांना पूर्वनिश्चित निवृत्ती वेतन पुरवण्यात येणार आहे. या योजनेत ५० टक्के वाटा केंद्र सरकारचा तर ५० टक्के रक्कम योजनाधारकाला भरावी लागणार आहे. या योजनेमध्ये देशातील खूप मोठा वर्ग निवृत्ती वेतनाच्या कक्षेत येणार आहे. लघुउद्योग क्षेत्रात भांडवल उभारणी आणि बाजाराची उपलब्धता यासारख्या ज्या अडचणी येतात त्या सोडविण्यासाठी 'मुद्रा' बँक म्हणजे मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट रिफायनान्स एजन्सी निर्माण करून त्यासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली गेली आहे.

### महागाईचा फटका बड्यांनाच अधिक

केंद्रीय अर्थसंकल्पामुळे सिगारेट, गुटखा, चिरुट, पानमसाला व अन्य तंबाखूजन्य पदार्थ, हॉटेलमधील खानपान, केबल आणि डीटीएच सेवा, ब्युटीपार्लरमधील सेवा, कुरिअर सेवा, क्रेडिट व डेबीट कार्डाशी संबंधित सेवा, आयात केलेली व्यापारी उद्योगाची वाहने, सोडायुक्त शीतपेये, बाटलीबंद पाणी, प्लास्टिक पिशव्या आणि सॅक, दारू, संगीताचे कार्यक्रम, विमा सेवा, ऍम्युझमेंट आणि थीम पार्कना भेटी अशा बाबींचे दर वाढण्याची शक्यता आहे, कारण सेवा कर वाढवण्यात आला आहे. यापैकी हॉटेलमधील खानपान व कुरिअर सेवेसारख्या सेवेचे दर वाढण्याचा थोडासा फटका मध्यमर्गियांना बसू शकतो, पण इतर तरतुदी या एक तर बड्या माणसांसाठी जाचक आहेत किंवा सर्वसामान्य माणसाला चैनीपासून व व्यसनापासून परावृत्त करणार्या आहेत.

### राज्यांना करमहसुलातील अधिक वाटा

यावर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या अर्थसंकल्पाने देशातील विविध राज्यांचा करमहसुलातील वाटा ३२ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांवर नेण्यात आला आहे. परिणामी देशातील राज्यांना १.७८ लाख कोटी रुपये अधिक मिळणार आहेत. याबाबतची शिफारस रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. वाय. बी. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने १४ व्या वित्त आयोगाला केली होती. ती मान्य करण्यात आली आहे. महसुली तूट सहन करणार्या राज्यांना ४८ हजार ९०६ कोटी रुपये देण्याची आयोगाची शिफारसही मान्य करण्यात आली आहे. याचा लाभ ११ राज्यांना मिळणार आहे. दरम्यान, राज्यांना अधिक सक्षम करण्यासाठी उचलण्यात आलेल्या या क्रांतिकारी पावलावर महाराष्ट्राचे माजी प्रधान अर्थसचिव व अर्थशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक माधव गोडबोले यांची प्रतिक्रिया समजावून घेण्यासारखी आहे. ते म्हणतात, 'केंद्रीय अर्थसंकल्पात अनेक चांगल्या बाबींचा समावेश आहे आणि त्याच्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांची छाप दिसते आहे. तथापि, या अर्थसंकल्पातून काही प्रश्न निर्माण होतात. उदा. यापुढे वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्रीय करातील ६२ टक्के महसूल राज्यांना दिला जाणार आहे. त्यामुळे राज्यांची जबाबदारी व काम वाढणार आहे. कोळसा खाणीच्या लिलावातूनही राज्यांना निधी मिळणार आहे. राज्यांनी त्यांना मिळणार्या या वाढीव निधीचा वापर अनुत्पादक पद्धतीने केला तर? राज्यांना मिळालेल्या पैशांचा वापर कसा करायचा याचा निर्णय केंद्र व राज्य यांनी एकत्रितपणे केला पाहिजे.'

### संरक्षणविषयक तरतुदीत वाढ

देश संरक्षणासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २ लाख ४६ हजार ७२७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीची हीच तरतूद २ लाख २२ हजार ३७० कोटी रुपये इतकी होती. ऊर्जा प्रकल्पांसाठीही देशाच्या विविध भागात १ लाख कोटी रुपयांची तरतूद केली गेली आहे. खते आणि पेट्रोलियमवरील अनुदान काहीसे घटवण्यात आले आहे.


### मुंबईपेक्षा गुजरातला महत्त्व?

केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्राला किती अधिक पैसे मिळतील याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तर केवळ १४ व्या वित्त आयोगाची शिफारस मान्य केल्याने महाराष्ट्राला १० हजार ६८२ कोटी रुपये अधिक मिळू शकणार आहेत. निधी वाढवून मिळणार असला तरी महाराष्ट्राचे माजी अर्थमंत्री जयंत पाटील यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर टीकास्त्रच सोडले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्थसंकल्पात मायक्रो इरिगेशन योजनांसाठी ५ हजार कोटींपेक्षा अधिक तरतूद करण्यात आली असली तरी ती कमी आहे, कारण केवळ महाराष्ट्रात यासाठी ८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त मदतीची गरज आहे. युपीए सरकारने मुंबईचा आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र म्हणून विकास करण्यावर भर दिला होता. मोदी सरकारने मात्र गुजरात इंटरनॅशनल फायनान्स टेक सिटी प्रकल्पाला झुकते माप दिल्याचे दिसते.

केंद्रीय अर्थसंकल्पात ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्यापैकी सोने,




## RUPEE COMES FROM




Notes: Total receipts are inclusive of States' share of taxes and duties

हिरे आणि दागिन्यावरील कस्टम ड्युटीत जी सुट देण्यात आली आहे त्यावर पी. साईनाथ यांच्या सारख्या ज्येष्ठ पत्रकारांनी टिकेची झोड उठवलेली आहे. कार्पोरेट क्षेत्रातील दिलेल्या सवलती वरही कमी-अधिक प्रमाणातील टिकास्त्र सोडले जात आहे, पण परदेशातही गुंवणूकदारांना भारतातील गुंतवणूकीमध्ये स्वारस्य निर्माण व्हायचे असेल तर हा मार्ग चोखाळायला हवा अशी नियोजन कर्त्यांची भूमिका आहे. अनिवासी भारतीयांचे पैसे मोठ्या प्रमाणावर भारतात गुंतवले जावे यासाठी याचा उपयोग होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी Make in India हे अव्हान केलेले आहे, त्याचाशी सुसंगत अर्थसंकल्पाचे वर्णन करावे लागते.

महाराष्ट्रसारख्या राज्यांने आपला अर्थसंकल्प सादर करताना याचीच री ओढण्याचा प्रयत्न केलेला आहे. एप्रिल २०१४ ते नोव्हेंबर २०१४ या कालावधीत भारताने जेवढी थेट परदेशी गुंतवणूक झाली त्याच्यापैकी जवळपास ३० टक्के गुंतवणूक केवळ महाराष्ट्रात झाली. बंदरे, विमानतळ, महामार्ग यांच्या विकासासाठीही थेट परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रानेही चीन इतक्या वेगानेच औद्योगिक प्रगती साधण्याचा इरादा दावोस येथे नुकत्याच झालेल्या World Economic Foram च्या परिषदेत स्पष्ट केलेले आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या कालावधीत पाच लाख कोटी रूपयाच्या औद्योगिक क्षेत्रांतील गुंतवणूकीचे लक्ष्य महाराष्ट्राने आपल्या डोळ्यासमोर ठेवले आहे. यातून राज्यातील २० लाख लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा अशी अपेक्षा आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुंतवणूकीबाबतची स्थिती भारत सरकारने भारतात थेट परदेशी गुंतवणूक वाढवावी म्हणून जाणीवपूर्वक सुरू ठेवलेले प्रयत्न आणि महाराष्ट्र सारख्या राज्यातील त्याच विचारांचे सरकार सत्तेत असणे याचा महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधा व औद्योगिक विकासासाठी नक्कीच मोठ्या प्रमाणावर लाभ होवू शकणार आहे.

**अर्थसंकल्प : आव्हाने पेलण्यासाठीच**

एकूण अर्थसंकल्पातील तरतुदींच्या अनुषंगाने बऱ्या वाईट अशा दोन्ही प्रकारच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेक प्रतिक्रिया राजकीय स्वरूपाच्या आहेत, तर काही प्रतिक्रिया केवळ आपापल्या क्षेत्राच्या हितसंबंधाशी निगडित स्वरूपाच्या आहेत. अर्थसंकल्पाचा सर्वंकष पद्धतीने विचार केला तर मात्र हा अर्थसंकल्प पायाभूत विकासाला महत्त्व देणारा, सर्वसामान्य माणूस व मध्यमवर्गीयांना बचत व गुंतवणुकीकडे वळवत सामाजिक सुरक्षा देऊ पाहणारा, राज्यांची आर्थिक सक्षमता वाढवणारा आणि डेमोग्राफिक डिव्हीडंडचा लाभ उठवण्यासाठी ज्या आव्हानांना ठराविक कालावधीत सामोरे जावे लागणार आहे त्या दिशेने शर्थीचे प्रयत्न करणारा आहे.

*(**प्रा. डॉ. रुपा शहा** या महावीर कॉलेज, कोल्हापुर येथे असोसिएट प्रोफेसर आहेत.)*

**संपर्कासाठी ईमेल -**

rupashasha2955@yahoo.com

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके (हिंदी)

१. भारतीय दुर्ग- ₹ ४८५.००

२. जाने अपने जिगर की ₹ २०५/-

३. माऊंट एव्हरेस्ट की गाथा ₹ ११५/-

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

## अन्य काही पुस्तके

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

इथेच होते करिअरची स्वप्नपूर्ती...

राजपथ ॲकॅडमी
MPSC ★ UPSC
Login to Excellence & Success

प्रा. मीता चौधरी
(संस्थापक-संचालिका, राजपथ ॲकॅडमी, पुणे )

- CAREER GUIDANCE
- CREATION
- PUBLICATION
- DISTRIBUTION

# UPSC • MPSC


## IAS/IPS/IFS/ IRS/DC/Dy.SP/ ACP/ DDR/Dy.CEO/ACST

| UPSC | MPSC | PSI/STI/ASST | UPSC/MPSC (फाऊंडेशन कोर्स) |
|---|---|---|---|
| • फाऊंडेशन कोर्स<br>• पूर्व व मुख्य परीक्षा<br>• सामान्य अध्ययन व निबंध<br>• वैकल्पिक विषय-भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास<br>• बॅच सुरू: २५ मार्च, ६ एप्रिल,२५ एप्रिल, ११ मे | • राज्यसेवा एकत्रित बॅच<br>• पूर्व, मुख्य, मुलाखत<br>• सामान्य अध्ययन, CSAT, इंग्रजी,मराठी, सामान्य अध्ययन पेपर क्र.१ ते ४<br>• बॅच सुरू: ६ एप्रिल, १५ एप्रिल, ११ मे | • एकत्रित बॅच<br>• पूर्व, मुख्य, मुलाखत, शारीरिक चाचणी<br>• इंग्रजी, मराठी व सामान्य अध्ययन<br>• बॅच सुरू: २५ मार्च, ६ एप्रिल, २५ एप्रिल, ११ मे | • कालावधी - १ महिना<br>• विविध स्पर्धा परीक्षांची बेसिक तयारी कशी करावी, याचे दिशादर्शन देणारा कोर्स<br>• १२ वी व पदवीला असणाऱ्यांना उपयुक्त कोर्स<br>• बॅच सुरू: २५ मार्च, ४ मे |

### राजपथ ॲकॅडमीची वैशिष्टये

१. प्रा.मीता चौधरी मॅडम (संस्थापक-संचालिका, राजपथ ॲकॅडमी) यांची लेक्चर्स व प्रत्येक विद्यार्थ्यांशी सुसंवाद.
२. अनुभवी, तज्ज्ञ, तळमळीने शिकविणारे विषय प्राध्यापक.
३. दर्जेदार छापील व क्लासरूम नोट्स.
४. नियमित सराव परीक्षा.
५. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन दोन भागात करणे.
६. विद्यार्थ्यांसाठी अभिरूप मुलाखतींच्या चर्चासत्राचे नियोजन.
७. विद्यार्थ्यांचे प्रगती पुस्तक व त्याचा पालकांना अहवाल.
८. गृहपाठासह शाळेच्या शिस्तीत विद्यार्थ्यांचा अभ्यास.
९. विविध दर्जेदार संदर्भ ग्रंथ व मासिकांचे परिपूर्ण वाचनालय.
१०. स्वच्छ, हवेशीर व शांत अभ्यासिका.

✻ 'राजपथ ॲकॅडमी' प्रकाशनाची परीक्षाभिमुख, दर्जेदार पुस्तके ✻




**आगामी पुस्तके:**
✻ संपूर्ण भूगोल ✻ संपूर्ण इंग्रजी ✻ अंकगणित

राजपथ ॲकॅडमी
MPSC ★ UPSC
Login to Excellence & Success

## राजपथ ॲकॅडमी

**मुख्य कार्यालय :**
२६, आप्पा बळवंत चौक,
अनमोल पुस्तकालयासमोर, पुणे.

**शाखा :**
लोकमान्य टिळकभवन, बी-विंग दुसरा मजला,
५६८ नारायण पेठ, केसरीवाड्याजवळ, पुणे.

**फोन नं. :**
०२०-३२४२ २२२१,
०२०-३०२० ८८०३/८००७९०९१६०

www.rajpathacademy.com Email : info@rajpathacademy.com Joint with facebook - rajpath academy

Yojana Marathi (Monthly) April 2015
RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. G/NMD/137/2013-15
Published Date : 12th Apr., 2015
Date of Posting : 16th Apr., 2015




Editor - **Bhavana Gokhale**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.